# बालभारती

## आठवणीतील कविता

संकलक
सुरेश शिरोडकर

साहित्य प्रतिष्ठान

# बालभारती-आठवणीतील कविता

द्वितीय आवृत्ती : २६ जानेवारी २०१२

**संकल्प, संकल्पना, संशोधन व संकलन:**
**सुरेश शिरोडकर**
http://sureshshirodkar.blogspot.com

*मांडणी व सजावट :*
*आनंद माने*

प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान
जी ११०२, इटर्निटी
ठाणे, 400604
www.esahity.com

©2011 : ई साहित्य प्रतिष्ठान

©या पुस्तकातील कविता आणि चित्रे यांचे हक्क त्या त्या व्यक्ती वा वारसांकडे सुरक्षित आहेत.

संपर्क :

esahity@gmail.com

9869674820

**अधिक माहितीसाठी या लिंक्सना भेट द्या -**

www.facebook.com/esahity Marathi kavita काव्यांजली

www.esahity.com

# संकलकाचे शब्द

***'गोष्टी घराकडील मी वदता गड्या रे***
***झाले पहा कितीक हे विपरीत सारे...'***

*"केशवसुतांच्या" कवितेतील या ओळींप्रमाणे शाळेतल्या कविता आठवता आठवता असंच काहीतरी विपरीत झालं आणि "बालभारती आठवणीतील कविता" हा उपक्रम सुरु झाला. बालभारती - आठवणीतील कविता म्हटले कि, सर्वात पहिली आपल्याला बालकवींची "श्रावण मासी" आठवल्याशिवाय रहात नाही. नुसतीच आठवत नाही तर, श्रावणातल्या रिमझिम पावसाप्रमाणे सूर धरून लगेच आपण ती गुणगुणायला लागतो. माझ्याही या अल्पस्वल्प कार्यास बालकवींची हीच कविता खरी कारणीभूत ठरली आहे.*

*खरं तर कॉलेज सोडल्यानंतर पुढील वीस-पंचवीस वर्षांच्या काळात मुंबईच्या दगदगीच्या जीवनात;*

***'सकाळी उठोनी चहा-कॉफी घ्यावी,***
***तशीच गाठावी वीज गाडी....'***

*या मर्ढेकरांच्या कवितेप्रमाणेच काहीसं चाललेलं होतं. 'बालभारतीतील' कविता दूरच पण अगदी अलीकडच्या काळातील कविता सुद्धा दूरस्थ वाटत होत्या. शहरी यंत्रयुगात मी एक यंत्रमानव बनून केशवकुमारांच्या "आजीच्या घड्याळ" सारखा नुसता 'टकटक' करत होतो.*

*साधारणत: २००६ साली माझा इंटरनेटशी आणि पर्यायाने ऑर्कुटशी संबंध आला. पुढे "मराठी कविता" व "काव्यांजली" या दोन संपूर्ण मराठी कवितेला वाहून घेतलेल्या ऑर्कुटवरील समुदायांशी जोडला गेलो. या समुदायांशी जोडला गेल्यावर, बालपणीची कवितेचे ओढ पुन्हा पल्लवित झाली. त्याच सुमारास माझ्या एका कवीमित्राने बालकवींची ती "श्रावण मासी" मला स्क्रॅप केली. माझ्या स्क्रेपवर जणू काय नभो मंडपीच्या मंगल तोरणासारखी ती झळाळत होती. ती कविता वाचत असताना शाळेतले ते बालपणीचे दिवस, कविता पाठ न*

झाल्यामुळे शाळेला मारलेली दांडी, बालभारती पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील ते बहिण भावाचे चित्र सगळी चित्रफित वेगाने पुढेपुढे सरकत होती. नजरेसमोर ते चित्र दिसत असले तरी डोक्यात काहीतरी वेगळे विचारचक्र सुरु होते. बालवयात गुणगुणलेली ती कविता आज डोक्यात भुणभुणत होती.

***'कुरुवाळीत येतील मजला,***
***श्रावणातील जलधारा***
***सळसळून भिजली पाने,***
***मज करतील सजल इशारा...'***

पाडगांवकरांच्या ह्या ओळींप्रमाणे बालकवींची ती "श्रावण मासी" काहीतरी इशारे नक्कीच करत होती. डोक्यात विचारचक्र सुरु असताना ऑर्कुटवरच्या काव्यांजली या कम्म्युनिटीवर कुणीतरी 'बालभारती - आठवणीतील कविता असा एक धागा टाकल्याचे आठवले. लगेच तो धागा शोधला आणि 'श्रावण मासी' तिथे पोस्ट केली. याआधी त्या धाग्यावर फक्त तीन-चार कविता वगळता बाकी सर्व राष्ट्रगीतापासून ते शरद घर बघ... आणि अटक मटक चणे चटक... असं काहीसं पोस्ट झालेलं होतं. मी तिथे एक कविता पोस्ट केल्यावर वाचकांना आणखी काही कविता वाचायला हव्या होत्या. असं अजून एक, अजून एक करता-करता मनाशी खुणगाठ बांधली कि, आता हा उपक्रम चालूच ठेवायचा. पुढे मराठी कविता आणि काव्यांजली अशा दोन्ही ठिकाणी हा धागा समांतर सुरु ठेवला. वाचकांचाही भरभरून प्रतिसाद मिळत होता. काहीजण कवितेच्या ओळी किंवा नांव सुचवायचे आणि मी ती कविता शोधून पोस्ट करायचो. अधून मधून काही इतर सभासदही काही कविता पोस्ट करत होते.

अशा या बालभारतीतील कविता सर्व रसिक, अभ्यासक, समीक्षकांना एकत्र वाचायला मिळाव्यात या उद्देशाने पुढे " बालभारती" हा स्वतंत्र ब्लॉग सुरु केला. इथेही वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. काही वाचक नुसत्या चुका किंवा त्रुटीच निदर्शनास आणून देत नाहीत, तर पूर्ण सुधारित कविता ब्लॉगवर किंवा मेलद्वारे पोस्ट करतात. वाचकांचे प्रतिसाद वाचल्यावर खूप समाधान मिळते. कुसुमाग्रजांची "कणा" वाचल्यावर सध्या परदेशात वास्तव्याला असलेल्या एका मुलीने असे लिहेले आहे कि;

***'शाळेत असतांना ही कविता ऐकली होती तेव्हा पहिल्यांदा डोळ्यात पाणी आले होते. त्यानंतर देश***

***सोडला आणि परदेश पकडला. पंचवीस-तीस वर्षानंतर आज ही कविता वाचून पुन्हा एकदा डोळ्यात पाणी आले.'***

*शांताबाईंची "पैठणी' वाचताना मी माझ्या आजीच्या डोळ्यांत पाणी आल्याचे पाहिले असेही एक नात लिहिते. कुणाला सकाळी सकाळी इंदिरा संत यांची काटेरी "बाभळी" वाचून सुद्धा सकाळ रम्य वाटते. कुणाला आपल्या दिवंगत आईची आवडती कविता वाचून नतमस्तक व्हायला होते तर कुणाची आई इतक्या सर्व कविता एकत्र पाहिल्यावर दोन मिनिटे स्तब्ध होते. कुणाला सहपरिवार कविता वाचताना शाळेतले ते दिवस, ते सवंगडी तर कुणाला मराठीचे ते शिक्षक आठवतात.*

*काहीजणांना ह्या कविता म्हणजे टाईम मशीनमध्ये बसून बालपणीचा प्रवास केल्यासारखे वाटते. माझे एक ६५ वर्षांचे कविमित्र लिहितात कि, 'ह्या कविता वाचतांना मी ५-६ वर्षांचा शाळकरी मुलगा होतो'. काही वयस्क वाचक आपला निवांत वेळ या कविता वाचण्यात घालवत असल्याचे लिहितात. विशेष म्हणजे एका नातवाला आपल्या आजोबांची कविता इथे वाचून कृतकृत्य वाटले.*

*इथे मला सर्वांचा उल्लेख करणे शक्य नसले तरी ज्यांनी ह्या उपक्रमास हातभार लावला ते श्री मिलिंद जोशी, सौरभ वाजपे, कुमार मोकाशी, ज्ञानेश, श्रीकांत, उन्मेष, श्रीमती आसावरी, अनुजा, किरण राजे, उन्मेष इनामदार, सागर पालकर, सुनिल देवरा, प्रकाश बाक्रे, प्रभाकर मेहंदळे, श्री. वसंत जोशी, गौरी बार्गी, कांचन कराई, नीता आंबेगांवकर या सर्वांचे मी आभार मानले तर त्यांना राग येईल हे मी जाणतो. पण हा कवितांचा खजिना जमवणं हे एकट्यादुकट्याचं काम नव्हतंच मुळी. अजून एका व्यक्तीचा मला उल्लेख करायला हवा तो म्हणजे माझा कार्यालयीन मित्र श्री राजाराम म्हापदी. बऱ्याच कविता त्याला तोंडपाठ असल्यामुळे मला त्याची खूप मदत झाली.*

*अशा या बालभारतीतील कविता नुसत्या कविता नाहीत तर लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी एक विलक्षण चेतनाशक्ती आहे. साधारणतः केशवसुतांच्या काळापासून ते आतापर्यंत म्हणजेच गेल्या १२५ वर्षातल्या या आधुनिक मराठी कवितांचा ठेवा वेगवेगळ्या कवितासंग्रहातून विखुरलेला आहे. त्यापूर्वीच्या संतांच्या रचना अभंगवाणी सारख्या*

पुस्तकातून एकत्र वाचायला मिळतात. पण ह्या आधुनिक मराठी कविता मात्र एकत्र वाचायला मिळत नाहीत. केवळ बालभारतीतीलच नव्हे तर अशा सर्व जुन्या कवितांचा हा खजिना भविष्यात कुठेतरी एकत्र वाचायला मिळेल अशी काहीतरी तजविज व्हायला हवी. धर्मग्रंथ, गाथा, पोथी सारखे अशा जुन्या कवितांचे नुसते कवितासंग्रह नाहीत तर भलेमोठे ग्रंथ बनावेत असे मला वाटते.

शेवटी श्री. दि. इनामदार यांच्या ह्या ओळी इथे उद्धृत करून इतकेच म्हणेन कि, माझ्या मायमराठीसाठी माझंही आयुष्य कारणी लागो हीच इच्छा!

***मेल्यावर तुझे ठायी,***
***पुन्हा एकदा रुजू दे.***
***माझ्या कातडयाचे जोडे,***
***तुझ्या पायात वाजू दे.***

सुरेश शिरोडकर
skarsuresh@gmail.com
भ्रमणध्वनी : ९९२०६१२८६८
http://sureshshirodkar.blogspot.com



# निमित्त दुसऱ्या आवृत्तीचे:

*“शाळेमध्ये ज्या मराठी कवितेने तोंडचे पाणी पळवले तीच कविता वाचताना आज डोळे पाणावले”. अदिस-अबाबा मध्ये सेटल झालेल्या एका मराठी गृहस्थांनी लिहिलं. बालभारतीच्या पहिल्या आवृत्तीवर आलेल्या पत्रांच्या वर्षावापैकी एक पत्र त्यांचं. पुढे त्यांनी लिहीलं होतं , “पण माझ्या आवडत्या कवितेत शुद्धलेखनाची चूक बघून खुप वाईट वाटलं. आमच्या बाईंनी या प्रकाशकाच्या हातावर पट्टी मारली असती”. अगदी खरं. दुसऱ्या एका वाचकाच्या भाषेत सांगायचं तर “या चुका बघून बासमती भात खाताना दातात खडा आल्यासारखं वाटतं”.*

*“बालभारती-आठवणीतल्या कविता” च्या पहिल्या आवृत्तीवर लोकांनी खूप खूप प्रेम केलं. कित्येक वाचकांच्या डोळ्यांत अश्रू तरारले. कितीतरी वाचक भावविवश झाले. परदेशातल्या किती तरी मुलांना आपल्या आई बाबांची प्रकर्षाने आठवण झाली. तर किती तरी ज्येष्ठ नागरिकांना आपल्या बालमित्रांना भेटण्याची भावना अनावर झाली. या कवितांनी हजारो लोकांना पुन्हा एकदा शाळेत नेलं. शेकडो लोकांनी हे पुस्तक आपल्या बालमित्रांना फ़ॉरवर्ड केलं. एकाने तर या पुस्तकाच्या प्रिंट काढून आपल्या शाळेतल्या गुरुजनांना भेट केल्या. किती तरी लोकांनी प्रिंट मागवली. या पुस्तकाच्या प्रिंटेड आवृत्तीचा आग्रह धरला. पण ई प्रकाशन हाच आमचा आग्रह असल्यामुळे आम्ही हे करणार नसल्याचं त्यांना सांगितलं.*

*वाचकांनी प्रेमापोटी अनेक सूचना केल्या. काही कविता सुचवल्या. या सर्व कविता मिळवण्याचा प्रयत्न केला. आणि जेवढ्या मिळाल्या त्या चाळीसेक कविता या आवृत्तीत जमा केल्या. तसेच आधीच्या*

कवितांतल्या शुद्ध लेखनाच्या चुकाही सुधारायचा प्रयत्न केला आहे.
मराठी कविता हा मोठा खजिना आहे. इंग्रजी भाषेचा जन्मही झाला नव्हता तेव्हा संससाहित्याच्या रुपाने मराठीत काव्याला बहर आला होता. आणि हा बहराचा काळ अजूनही सुरूच आहे. मराठी भाषेचा सुवर्णकाळ आता कुठे सुरू होतो आहे असं आम्ही मानतो.
अशा वेळी इंग्रजीत जसा गोल्डन ट्रेझरी नांवाचा एक सुंदर प्रकार आहे तसाच मराठीत या निमित्ताने निर्माण करण्याचा ई साहित्य प्रतिष्ठानचा संकल्प आहे.
या वाटचालीत तुमची मदत गृहित धरतो.
धरू ना ?

## ई साहित्य प्रतिष्ठान

# अनुक्रमणिका


अ आ आई - मधुसूदन कालेलकर

अजाण आम्ही तुझी लेकरें : अज्ञात

अनंत - बालकवी

अनाम वीरा - कुसुमाग्रज

अमर हुतात्मे : वि म कुलकर्णी

अरे खोप्यामधी खोपा - बहीणाबाई

अरे, संसार संसार - बहिणाबाई

असाच - ना. घ. देशपांडे

अस्मान कडाडून गेला- मनमोहन नातू

आई - फ. मु. शिंदे

आई म्हणोनी कोणी - यशवंत

आईपणाची भीती - पद्मा गोळे

आकाशवेडी - पद्मा गोळे

आजारीपण (पडुं आजारी) - भानुदास

आजीचे घड्याळ - केशवकुमार

आतां उठवू सारे रान- साने गुरुजी

आनंदी आनंद गडे - बालकवी

आभाळाची आम्ही लेकरे - वसंत बापट

आमची मांजरी - बाळकृष्ण अनंत भिडे

आम्ही कोण? - केशवसुत

आम्ही कोण? (विडंबन) - प्र. के. अत्रे

आला क्षण! - केशवसुत

आली बघ गाई गाई - इंदिरा संत

आवडतो मज अफ़ाट सागर - कुसुमाग्रज

आव्हान : अशोक थोरात

इंजिनदादा (बालगीत) - अज्ञात

उगवले नारायण - बहिणाबाई

उघड उघड पाकळी - ना. घ. देशपांडे

उठ मुला (निजलेल्या मुलास) - बालकवी

उठा उठा चिऊताई - कुसुमाग्रज

उत्तुंग आमुची उत्तर सीमा - वसंत बापट

उषा - ग.त्र्यं.माडखोलकर

ऋण - श्री. दि. इनामदार

ऋणाईत : केशव मेश्राम

एक खेडें - केशवसुत

एखाद्याचे नशीब - गोविंदाग्रज

औदुंबर - बालकवी

कणा - कुसुमाग्रज

कशासाठी ? पोटासाठी - माधव ज्यूलियन

कादरखां - केशवकुमार

किती तरी दिवसांत - बा. सी. मर्ढेकर

केकावली (निवडक) - मोरोपंत

केवढे हे क्रौर्य! - ना.वा.टिळक

केवळ माझा सह्यकडा - वसंत बापट

कोकिलान्योक्ति - कृष्णशास्त्री चिपळूणकर

कोठुनि येते मला कळेना - बालकवी

कोलंबसचे गर्वगीत - कुसुमाग्रज

कोळयाचा प्रयत्न - अज्ञात

क्रूस - कुसुमाग्रज

खंड्या : अज्ञात

खबरदार जर टाच मारुनी - वा. भा. पाठक

खरा तो एकची धर्म - साने गुरुजी

खेळणी : अनिल

गणपत वाणी - बा.सी. मर्ढेकर

गदड निळे - बा. भ. बोरकर

गवतफुला - इंदिरा संत

गवताचं पातं - कुसुमाग्रज

गाऊ त्यांना आरती : यशवंत

गे मायभू - सुरेश भट

गोष्टी घराकडिल : केशवसुत

घननीळ - विद्याधर करंदीकर

घरटा - बालकवी

घाटातील वाट - सरिता पदकी

घाल घाल पिंगा वाऱ्या - कृ. ब. निकुंब

चढवू गगनी निशाण - बा. भ. बोरकर

चाड चातुर्यातें जिणें (विवेकसिंधु)- मुकुंदराज

चाफ़ा बोलेना : कवी बी

चिंतातुर जंतू : गोविंदाग्रज

चित्रवीणा - बा. भ. बोरकर

चैत्र पाडवा : मंगला गोखले

जन पळभर : भा रा तांबे

जय जवान, जय किसान! - ग. दि. माडगुळकर

जयोऽस्तुते - वि. दा. सावरकर

जरा अस्मान झुकले - ना. धों. महानोर

जाग जाग भारता- यशवंत देव

जिंकू किंवा मरू - ग. दि. माडगूळकर

जिकडेतिकडे पाणीच पाणी - शंकर वैद्य

जीर्ण पाचोळा - कुसुमाग्रज

जे उरात उरते : शेख गुरुजी

जोगिया - ग. दि. माडगुळकर

ज्योत - वि. म. कुलकर्णी

झाडाखाली बघुनी सावली : अज्ञात

झाल्या तिन्हीसांजा - यशवंत

झिनि झिनि वाजे बीन : बा भ बोरकर

झुक झुक झुक अगिन गाडी - ग. दि. माडगूळकर

झुक झुक झुक गाडी : वि म कुलकर्णी

झुळुक - दामोदर कारे

टप टप टाकित टापा - शांता शेळके

टप टप पडती अंगावरती - मंगेश पाडगावकर

ठिगळं - संदिप खरे

डरांव डरांव - ग. ह. पाटील

डरांव डरांव (बालगीत) - अज्ञात

तयास मानव म्हणावे का ? -- सावित्रीबाई फुले

तळ्याकाठी - अनिल

तुतारी - केशवसुत

तूं तर चाफेकळी! -- बालकवी

तेथे कर माझे जुळती - बा. भ. बोरकर

थांब जरासा बाळ !- राम गणेश गडकरी

थोर तुझे उपकार - भास्कर दामोदर पाळन्दे

दगडाची पार्थिव भिंत - मनमोहन नातू

दिन दिन दिवाळी - अज्ञात

दुपार - सदानंद रेगे

देणाऱ्याने देत जावे - विंदा करंदीकर

देवा, तुझे किती - ग. ह. पाटील

देवाचे घर - ग दि माडगुळकर

देवाजीनें करुणा केली (भाताचा हंगाम)-- बा. सी मर्ढेकर

दोन दिवस - नारायण सुर्वे

धमाल सुट्टी आली - प्रवीण दवणे

नको नको रे पावसा - इंदिरा संत

नदी आणि कवी- विनायक

नलराजा आणि हंस – रघुनाथ पंडित

नसती उठाठेव - अज्ञात

निज नीज माझ्या बाळा- दत्तात्रय कोंडो घाटे

निर्झरास - बालकवी

निवडुंगाच्या शीर्‌ण फुलाचे - इंदिरा संत

नीतिशतकांतील वेंचे : १ - वामन पंडित

पतंग उडवूं चला - अ.ज्ञा.पुराणिक

परमेश्वराची प्रार्थना : अज्ञात

पसायदान - संत ज्ञानेश्वर

पाऊस कधीचा पडतो -कवी ग्रेस

पाणपोई- यशवंत

पारवा - बालकवी

पावसाच्या धारा - शांता शेळके

पिंपळाचे पान - वि. म. कुलकर्णी

पितात सारे गोड हिवाळा - बा. सी. मर्ढेकर

पिपांत मेले ओल्या उंदिर - बा.सी.मर्ढेकर

पिवळे तांबूस ऊन कोवळे - भा. रा. तांबे

पृथ्वीचे प्रेमगीत - कुसुमाग्रज

पैठणी - शांता शेळके

पोटापुरता पसा पाहिजे – ग दि माडगुळकर

प्रेम कर भिल्लासारखं - कुसुमाग्रज

प्रेमस्वरूप आई - माधव ज्यूलियन

प्रेमाचा गुलकंद - प्र. के. अत्रे

फुंकर- वसंत बापट

फुलपांखरू – केशवसुत

फुलपाखरू - ग.ह.पाटील

फुलपाखरे - अ. ज्ञा. पुराणिक

फुलराणी - बालकवी

फुलात न्हाली पहाट ओली - ना. धों. महानोर

बघ आई आकाशात : शांता शेळके

बापुजींची प्राणज्योती :मनमोहन नातू

बाभळी - इंदिरा संत

बाभळीविषयीं अन्योक्ति - कृष्णशास्त्री चिपळूणकर

बाभुळझाड - वसंत बापट

बाळ चाललासे रणा - पद्मा गोळे

बाळ जातो दूर देशा - गोपीनाथ

साहित्य प्रतिष्ठान ®

बिकट वाट वहिवाट नसावी - अनंतफंदी

भंगु दे काठिण्य माझे - बा. सी. मर्ढेकर

भय इथले संपत नाही... - कवि ग्रेस

मंथर नाग - कुसुमाग्रज

मधुघट - भा. रा. तांबे

मन - बहीणाबाई

मयूरान्योक्ति - कृष्णशास्त्री चिपळूणकर

मराठी - सुरेश भट

महाराष्ट्र गीत - श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

महाराष्ट्रगीत - गोविंदाग्रज

माझा गाव - बा. भ. बोरकर

माझी कन्या : कवी बी

माझी बाहुली (अज्ञात कवी)

माझ्या गोव्याच्या भूमीत - बा. भ. बोरकर

माझ्या छकुलीचे डोळे - वि. भि. कोलते

माझ्या मराठीची गोडी -वि. म. कुलकर्णी

माणूस - राम मोरे

माधुकरी - श्रीधर बाळकृष्ण रानडे

मामाची गाडी - ग. ह. पाटील

मी फूल तृणातिल इवले - मंगेश पाडगावकर

मीच माझा एककल्ली - ना. धों. महानोर

मृग- ग. दि. माडगुळकर

या झोपडीत माझ्या - संत तुकडोजी महाराज

या नभाने या भुईला दान द्यावे - ना. धों. महानोर

या बालांनो - भा. रा. तांबे

राजहंस - ग.दि.माडगुळकर

रानात एकटेच पडलेले फूल - ना. वा. टिळक

रुद्रास आवाहन - भा. रा. तांबे

लतांनो सांगू का तुम्हां ! - वा. गो. मायदेव

लहान माझी बाहुली (बालगीत) - अज्ञात

लाडकी बाहुली - शांता शेळके
लाला टांगेवाला - नारायण गोविंद शुक्ल
लेझिम - श्रीधर बाळकृष्ण रानडे
वनसुधा - वामन पंडित
वाट - आ. रा. देशपांडे (अनिल)
विद्याप्रशंसा - कृष्णशास्त्री चिपळूणकर
विद्यार्थ्याप्रत - केशवसुत
विमान - गोपीनाथ
शतकानंतर आज पाहिली - वसंत बापट
शतदा प्रेम करावे -मंगेश पाडगांवकर
शहाणी बाहुली - दत्तात्रय कोंडो घाटे
शुकान्योक्ति - कृष्णशास्त्री चिपळूणकर
शूर आम्ही सरदार अम्हाला : शांता शेळके
श्रावण बाळ - ग. ह. पाटील
श्रावणमास - बालकवी
संथ निळे हे पाणी - मंगेश पाडगांवकर
सतारीचे बोल - केशवसुत
समाधी - ना.घ.देशपांडे
सर्वात्मका शिवसुंदरा - कुसुमाग्रज
सहानभूती - कुसुमाग्रज
सांग मला रे सांग मला - ग.दि.माडगूळकर
सांग सांग भोलानाथ - मंगेश पाडगांवकर
सांगा कस जगायचं? - मंगेश पाडगांवकर
सागरास - स्वा. वि.दा.सावरकर
सुर्यान्योक्ती - कृष्णशास्त्री चिपळूणकर
सैनिकाप्रत - वसंत बापट
सैन्य चालले पुढे - वसंत बापट
स्वर्ग - ग.ल. ठोकळ
हरिणान्योक्ति - कृष्णशास्त्री चिपळूणकर
हिंदबांधवा - भा. रा. तांबे

साहित्य प्रतिष्ठान ®

हिरकणी - अज्ञात

हिरवें तळकोंकण - माधव

हिरिताचं देनं घेनं : बहिणाबाई

हे राष्ट्र देवतांचे - ग.दि.माडगुळकर

साहित्य प्रतिष्ठान ®

# फुलपांखरूं

*फुलपांखरूं !*
*छान किती दिसतें । फुलपांखरूं*

*या वेलीवर । फुलांबरोबर*
*गोड किती हसतें । फुलपांखरूं*

*पंख चिमुकलें । निळेजांभळे*
*हालवुनी झुलतें । फुलपांखरूं*

*डोळे बारीक । करिती लुकलुक*
*गोल मणी जणुं ते । फुलपांखरूं*

*मी धरुं जाता । येई न हाता*
*दूरच तें उडते । फुलपांखरूं*

**- ग.ह.पाटील**

# टप टप टाकित टापा

*टपटप टपटप टाकित टापा चाले माझा घोडा*
*पाठीवरती जीन मखमली पायी रुपेरी तोडा !*

*उंच उभारी दोन्ही कान*
*ऐटित वळवी मान-कमान*
*मधेच केव्हा दुडकत दुडकत चाले थोडा थोडा !*

*घोडा माझा घाली रिंगण*
*उखडुन टाकी सारे अंगण*
*कोणी त्याला अडवत नाही, नदी असो कि ओढा!*

*घोडा माझा फार हुशार*
*पाठीवर मी होता स्वार*
*नुसता त्याला पुरे इषारा, कशास चाबुक ओढा !*

*सात अरण्ये, समुद्र सात*
*ओलांडिल हा एक दमात*
*आला आला माझा घोडा, सोडा रस्ता सोडा !*

**- शांता शेळके**

# गवतफुला

रंगरंगुल्या, सानसानुल्या,
गवतफुला रे गवतफुला;
असा कसा रे मला लागला,
सांग मला रे तुझा लळा.

मित्रासंगे माळावरती,
पतंग उडवित फिरताना;
तुला पाहिले गवतावरती,
झुलता झुलता हसताना.

विसरुनी गेलो, पतंग नभीचा,
विसरून गेलो मित्राला;
पाहून तुजला हरवून गेलो,
अशा तुझ्या रे रंगकळा.

हिरवी नाजुक, रेशिम पाती,
दोन बाजुला सळसळती;
नीळ निळुली एक पाकळी,
पराग पिवळे झगमगती.

तळी पुन्हा अन गोजिरवाणी,
लाल पाकळी फुलते रे;
उन्हामध्ये हे रंग पाहता,
भानच हरपुनी गेले रे

पहाटवेळी आभाळ येते,
लहान होउनी तुझ्याहुनी;
तुला भरविते निळ्या करांनी,
दवमोत्यांची कणी कणी.

वारा घेवूनी रूप सानुले,
खेळ खेळतो झोपाळा;
रात्रही इवली होऊन म्हणते
अंगाईचे गीत तुला.

गोजिरवाणा हो रवीचा कण
छाया होते इवलीशी;
रात्रही इवली होउन म्हणते,
अंगाईचे गीत तूला.

तुझी गोजिरी, शिकून भाषा,
गोष्टी तुजला सांगाव्या;
तुझे शिकावे खेळ आणखी,
जादू तुजला शिकवाव्या.

आभाळाशी हट्ट करावा
खाऊ खावा तुझ्यासवे;
तुझे घालुनी रंगीत कपडे,
फुलपाखरां फसवावे.

मलाही वाटे लहान व्हावे
तुझ्याहूनही लहान रे;
तुझ्या संगती सदा रहावे,
विसरुनी शाळा घर सारे.

- इंदिरा संत

# देवा तुझे किती

देवा, तुझे किती, सुंदर आकाश
सुंदर प्रकाश सूर्य देतो .

सुंदर चांदण्या, चंद्र हा सुंदर
चांदणे सुंदर पडे त्याचे

सुंदर ही झाडे, सुंदर पांखरे
किती गोड बरे गाणे गाती.

सुंदर वेलींची सुंदर ही फुले
तशी आम्ही मुले देवा तुझी.

इतुके सुंदर जग तुझे जर
किती तू सुंदर असशील!!

ग. ह. पाटील

# इंजिनदादा - बालगीत

इंजिनदादा, इंजिनदादा,
काय करता?
डबे मी जोडतो, तुम्हांला नेतो,
गावाला जातो नव्या नव्या

इंजिनदादा, इंजिनदादा,
काय करता?
पाणी मी पितो, वाफ मी सोडतो,
गावाला जातो नव्या नव्या

इंजिनदादा, इंजिनदादा,
काय करता?
कोळसा मी खातो, धुर मी सोडतो,
गावाला जातो नव्या नव्या

इंजिनदादा, इंजिनदादा,
काय करता?
हिरवे निशाण बघतो, चालायला लागतो,
गावाला जातो नव्या नव्या

इंजिनदादा, इंजिनदादा,
काय करता?
शिट्टी मी फुंकतो, गर्दी हटवतो,
गावाला जातो नव्या नव्या

इंजिनदादा, इंजिनदादा,
काय करता?
लाल निशाण बघतो, उभा मी राहतो,
गावाला जातो नव्या नव्या

इंजिनदादा, इंजिनदादा,
काय करता?
झुकझुक मी करतो, तुम्हाला घेतो,
गावाला जातो नव्या नव्या

कवी : अज्ञात

साहित्य प्रतिष्ठान ®

# डरांव डरांव - बालगीत

*आभाळ वाजलं धडामधूम*
*वारा सुटला सूं सूं सूं*
*वीज चमकली चक चक चक*
*जिकडे तिकडे लख लख लख*
*पाऊस आला धो धो धो*
*पाणी वाहिले सो सो सो*
*पाण्यात बोट सोडली, सोडली*
*हातभर जाऊन बुडली, बुडली.*
*बोटीवर बसले बेडूकराव*
*बेडूक म्हणाला डरांव डरांव.*

कवी : अज्ञात

# उठा उठा चिऊताई

*उठा उठा चिऊताई*
*सारीकडे उजाडलें*
*डोळे तरी मिटलेले*
*अजुनही*

*सोनेरी हे दूत आले*
*घरटयाच्या दारापाशी*
*डोळयांवर झोप कशी*
*अजुनही*

*लगबग पांखरे हीं*
*गात गात गोड गाणे*
*टिपतात बघा दाणे*
*चोहींकडे*

*झोपलेल्या अशा तुम्ही*
*आणायाचें मग कोणी*
*बाळासाठी चारा पाणी*
*चिमुकल्या*

*बाळाचें नी घेतां नांव*
*जागी झाली चिऊताई*
*उडोनीया दूर जाई*
*भूर भूर*

**- कुसुमाग्रज**

# आली बघ गाई गाई

आली बघ गाई गाई शेजारच्या अंगणात
फुललासे निशिगंध, घोटाळली ताटव्यांत

आली बघ गाई गाई, चांदण्यांचे पायी चाळ
लाविले का अवधान ऐकावया त्यांचा ताल

आली बघ गाई गाई, लावी करांगुली गाली
म्हणुन का हसलीस, उमटली गोड खळी

आली बघ गाई गाई, लोचनांचे घेई पापे
म्हणून का भारावले, डोळे माझ्या लाडकीचे

आली बघ गाई गाई काढितसे लांब झोका
दमलीस खेळूनिया, झाक मोतियांच्या शिंपा

- इंदिरा संत

# देवाचे घर

इवल्या इवल्याशा, टिकल्या-टिकल्यांचे
देवाचे घर बाई, उंचावरी
ऐक मजा तर ऐक खरी

निळी निळी वाट, निळे निळे घाट
निळ्या निळ्या पाण्याचे झुळझुळ पाट
निळ्या निळ्या डोंगरात निळी निळी दरी

चांदीच्या झाडांना सोन्याची पाने
सोनेरी मैनेचे सोनेरी गाणे
सोन्याची केळी, सोन्याचा पेरू
सोनेरी आंब्याला सोन्याची कैरी

देवाच्या घरात गुलाबाची लादी
मऊ मऊ ढगांची अंथरली गादी
चांदण्यांची हंडी, चांदण्यांची भांडी
चांदोबाचा दिवा मोठा लावला वरी

- ग. दि. माडगूळकर

# टप टप पडती अंगावरती

टप टप पडती अंगावरती प्राजक्ताची फुले
भिर भिर भिर भिर त्या तालावर गाणे अमुचे जुळे!

कुरणावरती, झाडांखाली
ऊन-सावली विणते जाळी
येतो वारा पाहा भरारा, गवत खुशीने डुले!

दूर दूर हे सूर वाहती
उन्हात पिवळ्या पहा नाहती
हसते धरती, फांदीवरती हा झोपाळा झुले !

गाणे अमुचे झुळ-झुळ वारा
गाणे अमुचे लुक-लुक तारा
पाऊस, वारा, मोरपिसारा या गाण्यातुन फुले !

फुलांसारखे सर्व फुला रे
सुरात मिसळुनि सूर, चला रे
गाणे गाती तेच शहाणे बाकी सारे खुळे !

- मंगेश पाडगावकर

# पावसाच्या धारा

*पावसाच्या धारा येती झरझरा*
*झाकळले नभ, वाहे सोसाट्याचा वारा*

*रस्त्याने ओहोळ जाती खळखळ*
*जागोजागीं खाचांमध्ये तुडुंबले जळ*

*झळके सतेज, ढगांवर वीज*
*नर्तकीच आली गमे लेवुनिया साज*

*झोंबे अंगा वारे, काया थरथरे*
*घरट्यांत घुसूनिया बसली पाखरें*

*हर्षलासे फार, नाचे वनीं मोर*
*पानांतून हळूं पाहे डोकावून खार*

*पावसाच्या धारा डोईवरी मारा*
*झाडांचिया तळी, गुरे शोधिती निवारा*

*नदीलाही पूर, लोटला अपार*
*फोफावत धावे जणू नागीणच थोर*

*झाडांची पालवी, चित्ताला मोहवी*
*पानोपानी खुलतसें रंगदार छबी*

*थांबला पाऊस, उजळे आकाश*
*सूर्य येई ढगांतून, उधळी प्रकाश*

*किरण कोंवळे भूमीवरी आले*
*सोनेरी त्या तेजामध्यें पक्षीजात खुले*

*पावसात न्हाली, धरणी हासली,*
*देवाजीच्या करणीने, मनी संतोषली*

## कवयित्री - शांता शेळके

# माझी बाहुली

लहान माझी बाहुली
मोठी तिची साऊली
घारे डोळे फिरवीते
लुकूलुकू हि पहाते

नकटे नाक उडवीते
गुबरे गाल फुगविते
दांत काही घासत नाही
अंग काही धूत नाही

भात केला,
करपून गेला !
पोळया केल्या,
कच्च्या झाल्या !
वरण केले
पातळ झाले
तूप सगळे
सांडून गेले

असे भुकेले नक्का जाउं
थांबा करते गोड खाऊ

केळीचे शिकरण करायला गेली
दोनच पडले दांत
आडाचें पाणी काढायला गेली
धपकन पडली आत !

(अज्ञात कवी)

# पतंग उडवूं चला

*पतंग उडवूं चला*
*गडयांनो, पतंग उडवूं चला. धृ.*

*रंग ढगांवर मावळतीचा*
*लाल पिंवळसर किती मजेचा*
*झुळझुळ वारा नदीकांठचा*
*बाजुस डोंगरमळा.*

*करु चला सुरवात बरोबर*
*सोडा सोडा रीळ भराभर*
*पंतग चढवा हे वाऱ्यावर*
*ढगांस भेटायला.*

*मउमउ वाळुंत पाय रोवुनी*
*देउं झटका दोरा ओढुनि*
*पतंग जातिल वर वर चढुनी*
*पंख नको त्यांजला.*

*जशीं पाखंरें आभाळांत*
*पंख पसरुनी तरंगतात*
*दिसतिल तैसे पतंग रंगित*
*खेळ किती चांगला !*

*सूर्य डोंगराआड लपेल*
*काळा बुरखा जग घेईल*
*खेळ तोंवरी हा चालेल*
*मजेदार आपुला.*

अ.ज्ञा.पुराणिक

# सांग सांग भोलानाथ

सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल काय ?
शाळेभोवती तळे साचून, सुटटी मिळेल काय ?

भोलानाथ दुपारी आई झोपेल काय ?
लाडू हळूच घेताना आवाज होईल काय ?

भोलानाथ भोलानाथ, खरं सांग एकदा
आठवडयातनं रविवार, येतील का रे तीनदा

भोलानाथ उद्या आहे, गणिताचा पेपर
पोटात माझ्या कळ येऊन दुखेल का रे ढोपर

मंगेश पाडगांवकर

# लाडकी बाहुली

लाडकी बाहुली होती माझी एक
मिळणार तशी ना शोधूनी दुसऱ्या लाख

किती गोरी गोरी गाल गुलाबचि फुलले
हासती केस ते सुंदर काळे कुरळे

झाकती उघडती निळे हासरे डोळे
अन ओठ जसे की अताच खुदकन हसले

अंगात शोभला झगा रेशमी लाल
केसांवर फुलले लाल फितीचे फुल

कितीतरी बाहुल्या होत्या माझ्याजवळी
पण तीच सोनुली फार मला आवडली

मी गेले तीजसह माळावर खेळाया
मी लपून म्हणते साई सुट्ट्या हो या या

किती शोध शोधली परी कुठे न ती दिसली
परतले घरी मी होउन हिरमुसलेली

स्वप्नात तीने मम रोज एकदा यावे
हलवून मला हळु माळावरती न्यावे

वाटते सारखे जावे त्याच ठिकणी
शोधुनी पहावी पुन्हा पुन्हा ती चिमणी

जाणार कशी पण संतत पाउस धार
खल मुळी न तिजला वारा झोंबे फार

पाऊस उघडता गेले माळावरती
गवतावर ओल्या मजला सापडली ती

कुणी गेली होती गाय तुडवूनी तिजला
पाहूनी दशा ती रडूच आले मजला

*मैत्रिणी म्हणाल्या काय अहा हे ध्यान*
*केसांच्या झिपऱ्या रंगही गेला उडून*

*परी आवडली ती तशीच मजला राणी*
*लाडकी बाहुली होती माझी म्हणुनी*

शांता शेळके

साहित्य प्रतिष्ठान®

# लाला टांगेवाला

लाल टांगा घेऊनी आला, लाला टांगेवाला
ऐका लाला गातो गाणे लल्लल लल्लल ला ला

कुडता लालेलाल त्याची तुमान लालेलाल
टोपी लालेलाल त्याचा गोंडा लालेलाल
लालेलाल गोंडा उडवित आला टांगेवाला
ऐका लाला गातो गाणे लल्लल लल्लल ला ला

टांगा लालेलाल त्याचा घोडा लालेलाल
चाबुक लालेलाल त्याचा लगाम लालेलाल
लालेलाल चाबूक उडवित आला टांगेवाला
ऐका लाला गातो गाणे लल्लल लल्लल ला ला

लाल परकर नेसून आली लीला बोले त्याला
"चल रे लाला, ने रे मला, माझ्या गावाला"
लीला बसली टांग्यामध्ये टांगा सुरू झाला
ऐका लाला गातो गाणे लल्लल लल्लल ला ला

झाडे लालेलाल त्यांची फुले लालेलाल
रस्ता लालेलाल त्याचा धुरळा लालेलाल
लालेलाल धुरळा उडवित गेला टांगेवाला
ऐका लाला गातो गाणे लल्लल लल्लल ला ला

- नारायण गोविंद शुक्ल

# डरांव डरांव!

डरांव डरांव! डरांव डरांव!
का ओरडता उगाच राव?

पत्ता तुमचा नव्हता काल
कोठुनी आला? सांगा नाव
धो धो पाउस पडला फार
तुडुंब भरला पहा तलाव
सुरू जाहली अमुची नाव
आणिक तुमची डरांव डरांव!

बटबटीत डोळ्यांचे ध्यान
विचित्र तुमचे दिसते राव!
सांगा तुमच्या मनात काय?
ही घ्या छत्री, ही घ्या नाव
जा गाठा जा अपुला गाव
आणि थांबवा डरांव डरांव!

**- ग. ह. पाटिल**

# झुक झुक झुक गाडी

गाडी आली, गाडी आली, झुक झुक झुक ।
शिट्टी कशी वाजे बघा, कुक कुक कुक ॥१॥

इंजिनाचा धुर निघे भक भक भक ।
चाके पाहू तपासूनी, ठक ठक ठक ॥२॥

गाडीमध्ये बसा चला, पट पट पट ।
सामानही ठेवा सारे, चट चट चट॥३॥

तिकिटाचे पैसे काढा, छन छन छन ।
गाडीची ही घंटा वाजे, घण घण घण ॥४॥

जायाचे कां तुम्हां कुठे, भूर भूर भूर ।
कोठेही जा, नेई तुम्हां, दूर दूर दूर ॥५॥

नका बघू डोकावून, शुक शुक शुक ।
गाडी आता निघालीच, झुक झुक झुक ॥६॥

वि म कुलकर्णी

साहित्य प्रतिष्ठान ®

# घरटा

*चिव चिव चिव रे*
*तिकडे तू कोण रे?*

*कपिलामावशी कपिलामावशी*
*घरटा मोडून तू का जाशी ?*

*नाही गं बाई मुळीच नाही*
*मऊ गवत देईन तुशी*

*कोंबडीताई कोंबडीताई*
*माझा घरटा पाहिलास बाई ?*

*नाही गं बाई मुळीच नाही*
*तुझा माझा संबंध काही*

*कावळेदादा कावळेदादा*
*माझा घरटा नेलास बाबा ?*

*नाही गं बाई चिमणुताई*
*तुझा घरटा कोण नेई ?*

*आता बाई पाहू कुठे ?*
*जाऊ कुठे ? राहू कुठे ?*

*गरीब बिचाऱ्या चिमणीला*
*सगळे टपले छळण्याला*

*चिमणीला मग पोपट बोले*
*का गं तुझे डोळे ओले?*

*काय सांगू बाबा तुला*
*घरटा माझा कोणी नेला*

*चिऊताई चिऊताई*
*माझ्या घरट्यात येतेस बाई ?*

*पिंजरा किती छान माझा*
*सगळा शीण जाईल तुझा*

*जळो तुझा पिंजरा मेला*
*त्याचे नाव नको मला*

*राहीन मी घरट्याविना*
*चिमणी उडून गेली राना*

- बालकवी

# अरे, संसार संसार

*अरे, संसार संसार, जसा तवा चुल्ह्यावर*
*आधी हाताला चटके तंव्हा मिळते भाकर !*

*अरे, संसार संसार, खोटा कधी म्हनू नहीं*
*राउळाच्या कयसाले, लोटा कधी म्हनू नहीं*

*अरे, संसार संसार, नही रडनं, कुढनं*
*येड्या, गयांतला हार, म्हनू नको रे लोढनं !*

*अरे, संसार संसार, खीरा येलावरचा तोड*
*एक तोंडामधी कडू, बाकी अवघा लागे गोड*

*अरे, संसार संसार, म्हनू नको रे भीलावा*
*त्याले गोड भीमफूल, मधी गोडंब्याचा ठेवा*

*देखा संसार संसार, शेंग वरतून काटे*
*अरे, वरतून काटे, मधी चिकने सागरगोटे*

*ऐका, संसार संसार, दोन्ही जीवांचा इचार*
*देतो सुखाले नकार, अन् दुःखाले होकार*

*देखा, संसार संसार, दोन जीवांचा सुधार*
*कदी नगद उधार, सुखदुःखाचा बेपार !*

*अरे, संसार संसार, असा मोठा जादूगार*
*माझ्या जीवाचा मंतर, त्याच्यावरती मदार*

*असा, संसार संसार, आधी देवाचा ईचार*
*माझ्या देवाचा जोजार, मग जीवाचा आधार !*

- बहिणाबाई चौधरी

# लेझिम

*दिवस सुगीचे सुरु जाहले, ओला चारा बैल माजले,*
*शेतकरी मन प्रफ़ुल्ल झाले..., छनझुन खळझण झिनखळ छिनझुन,*
*लेझिम चाले जोरात !*

*चौघांनी वर पाय ऊचलले, सिंहासनिं त्या ऊभे राहिले,*
*शाहिर दोघे ते डफवाले..., ट्पढुम, ढुमढुम, डफ तो बोले..*
*लेझिम चाले जोरात !*

*दिवटी फुरफुर करु लागली, पटक्यांची वर टोंके डूलली,*
*रंग खेळण्या सज्ज जाहली, छनखळ झुणझिन, ढुमढुम पटढुम्*
*लेझिम चाले जोरात !*

*भरभर डफ तो बोले घुमुनीं, लेझिम चाले मंडल धरुनी,*
*बाजुस-मागें, पुढे वाकुनी..., झणछीन खळखळ, झिनखळ झिनखळ,*
*लेझिम चाले जोरात !*

*डफ तो बोले-लेझिम चाले, वेळाचे त्या भान न ऊरले,*
*नादभराने धुंध नाचले..., छनझुन खळझण झिनखळ छिनझुन,*
*लेझिम गुंगे नादात् !*

*सिंहासन ते डुलु लागले, शाहिर वरती नाचू लागले,*
*गरगर फिरले लेझिमवाले..., छनछन खळखळ, झणझण छनछन,*
*लेझिम गुंगे नादात् !*

*दिनभर शेती श्रमूनी खपले, रात्रीसाठी लेझीम चाले,*
*गवई नलगे, सतारवाले..., छनखळ झुणझिन,रात्र संपली नादात्*
*लेझिम चाले जोरात् !*

*पहाट झाली - तारा थकल्या, डफवाला तो चंद्र ऊतरला,*
*परी न थकला लेझिम मेळां..., छनखळ झुणझिन, लेझिम खाली...*
*चला जाऊया शेतात् ! चला जाऊया शेतात् !!*

**- श्री श्रीधर बाळकृष्ण रानडे**

# खबरदार जर टाच मारुनी

सावळ्या :

खबरदार जर टांच मारुनी जाल पुढे,  चिंधड्या
उडवीन राई राई एवढ्या !
कुण्या गावचे पाटील आपण कुठे चालला असे
शीव ही ओलांडूनि तीरसे ?
लगाम खेचा या घोडीचा राव टांग टाकुनी
असे या तुम्ही खड्या अंगणी !
पोर म्हणूनी हसण्यावारी वेळ नका नेऊ ही
मला का ओळखले हो तुम्ही ?
हा मर्द मराठ्याचा मी बच्चा असे
हे हाडही माझे लेचेपेचे नसे
या नसानसातून हिंमतबाजी वसे
खबरदार जर टांच मारुनी जाल पुढे, चिंधड्या
उडवीन राई राई एवढ्या !

स्वार :

मळ्यात जाऊन मोटेचे ते पाणी भरावे तुवां
कशाला ताठा तुज हा हवा ?
मुठीत ज्याच्या मूठ असे ही खड्‌गाची तो बरे
वीर तू समजलास काय रे ?
थोर मारिसि अशा बढाया पराक्रमाच्या जरी
कुठे तव भाला बरची तरी ?
हे खड्‌गाचे बघ पाते किती चमकते
अणकुचीदार अति भाल्याचे टोक ते
यापुढें तुझी वद हिंमत का राहते ?
खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे, चिंधड्या
उडवीन राई राई एवढ्या !

सावळ्या :

आपण मोठे दाढीवाले अहां वीर बायकी --
किती ते आम्हाला ठाऊकी !
तडफ आमुच्या शिवबाजीची तुम्हां माहिती न का?
दावितां फुशारकी का फुका ?

*तुम्हांसारखे असतील किती लोळविले नरमणी --*
*आमुच्या शिवबाने भररणी*
*मी असे इमानी चेला त्यांचेकडे*
*हुकुमावीण त्यांच्या समजा याचेपुढे*
*देईन न जाऊ शूर वीर फाकडे*
*पुन्हा सांगतो खबरदार जर जाल पुढे, चिंधड्या*
*उडवीन राई राई एवढ्या !*

*लालभडक ते वदन जाहले बाळाचे मग कसे*
*स्वार परि मनी हळू का हसे ?*
*त्या बाळाच्या नयनी चमके पाणी त्वेषामुळे*
*स्वार परि सौम्य दृष्टीने खुले*
*चंद्र दिसे जणू एक, दुसरा तपतो रवि का तर*
*ऐका शिवबाचे हे स्वर --*

*“आहेस इमानी माझा चेला खरा*
*चल इमान घे हा माझा शेला तुला*
*पण बोल सावळ्या बोल पुन्हा एकदा*
*"खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे, चिंधड्या*
*उडवीन राई राई एवढ्या !"”*

वा. भा पाठक

# हिंदबांधवा

रे हिंदबांधवा, थांब या स्थळी अश्रु दोन ढाळी,
ती पराक्रमाची ज्योत मावळे इथे झांशिवाली ॥ध्रु॥

तांबेकुलवीरश्री ती,
नेवाळकरांची कीर्ति,
हिंदभूध्वजा जणु जळती,
मर्दानी राणी लक्ष्मीबाई मूर्त महाकाली ॥ १ ॥

घोडयावर खंद्या स्वार,
हातात नंगि तलवार,
खणखणा करित ती वार,
गोर्‍यांची कोंडी फोडित, पाडीत वीर इथें आली ॥२॥

कडकडा कडाडे बिजली,
शत्रुंची लष्करे थिजलीं,
मग कीर्तिरूप ती उरली,
ती हिंदभूमीच्या, पराक्रमाची इतिश्रीच झाली ॥ ३ ॥

मिळतील इथें शाहीर,
लववितील माना वीर,
तरु, झरे ढाळतील नीर,
ह्या दगडां फुटतील जिभा कथाया कथा सकळ
काळी! ॥ ४ ॥

- भा. रा. तांबे

# अनामवीरा

अनामवीरा, जिथे जाहला तुझा जीवनान्त
स्तंभ तिथे ना कुणी बांधला, पेटली ना वात

धगधगता समराच्या ज्वाला या देशाकाठी
जळावयास्तव संसारातून उठोनिया जाशी

मूकपणाने तमी लोपती संध्येच्या रेषा
मरणामध्ये विलीन होसी, ना भय ना आशा

जनभक्तीचे तुझ्यावरी नच उधाणले भाव
रियासतीवर नसे नोंदले कुणी तुझे नाव

जरी न गातील भाट डफावर तुझे यशोगान
सफल जाहले तुझेच हे रे तुझेच बलिदान

काळोखातूनी विजयाचा ये पहाटचा तारा
प्रणाम माझा पहिला तुजला मृत्युंजय वीरा

- कुसुमाग्रज

साहित्य प्रतिष्ठान ®

# निर्झरास

*गिरिशिखरे, वनमालाही*
*दरीदरी घुमवित येई!*
*कड्यावरुनि घेऊन उड्या,*
*खेळ लतावलयी फुगड्या*

*घे लोळण खडकावरती,*
*फिर गरगर अंगाभवती;*
*जा हळुहळु वळसे घेत*
*लपत-छपत हिरवळीत;*

*पाचूंची हिरवी रानें*
*झुलव गडे, झुळझुळ गाणे!*
*वसंतमंडप-वनराई*
*आंब्याची पुढती येई.*

*श्रमलासी खेळुनि खेळ*
*निज सुखे क्षणभर बाळ !*
*हि पुढची पिवळी शेते*
*सळसळति गाती गीते;*

*निज कोठुनी तुला तरी,*
*हांस लाडक्या! नाच करी.*
*बालझरा तू बालगुणी,*
*बाल्यचि रे! भरिसी भुवनी.*

- बालकवी

साहित्य प्रतिष्ठान®

# जरा अस्मान झुकले

ज़रा अस्मान झुकले
शुभ्र तारकांचे झेले
क्षितिजाचे रंगरेखा
संथ पाण्यात न्हालेले

रान मुकाट झालेले
पक्षी पंखात मिटले
हळु चाहूल घेताना
पाणी दाण्डात हासले

ज़रा अस्मान झुकले
स्वर मेंदित भिजले
उसमळयाच्या गर्दीत
डोळे पाऊल चुकले

अशी लकाकली बोर
अंगभर चंद्रकोर
ऊसमळयाच्या गर्दीत
थोड़े सांडले केशर !

- ना. धो. महानोर

# कोठुनि येते मला कळेना

कोठुनि येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला
काय बोचते ते समजेना
हृदयाच्या अंतर्हृदयाला ।।

येथे नाही तेथे नाही,
काय पाहिजे मिळावयाला?
कुणीकडे हा झुकतो वारा?
हाका मारी जीव कुणाला?

मुक्या मनाचे मुके बोल हे
घरे पाडिती पण हृदयाला
तीव्र वेदना करिती, परि ती
दिव्य औषधी कसली त्याला !

- बालकवी

# आनंदी आनंद गडे

आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिंकडे
वरती खाली मोद भरे, वायूसंगे मोद फिरे
नभांत भरला,
दिशांत फिरला,
जगांत उरला
मोद विहरतो चोहिंकडे

सूर्यकिरण सोनेरी हे, कौमुदि ही हंसते आहे
खुलली संध्या प्रेमाने, आनंदे गाते गाणे
मेघ रंगले,
चित्त दंगले,
गान स्फुरले
इकडे, तिकडे, चोहिंकडे

नीलनभी नक्षत्र कसे, डोकावुनि हे पाहतसे
कुणास बघते ? मोदाला;
मोद भेटला का त्याला ?
तयामधे तो,
सदैव वसतो,
सुखे विहरतो
इकडे, तिकडे, चोहिंकडे

वाहति निर्झर मंदगती, डोलति लतिका वृक्षतटी
पक्षी मनोहर कूजित रे, कोणाला गातात बरे ?
कमल विकसले,
भ्रमर गुंगले,
डोलत वदले
इकडे, तिकडे, चोहिंकडे

स्वार्थाच्या बाजारात, किती पामरे रडतात
त्यांना मोद कसा मिळतो, सोडुनि स्वार्था तो जातो
द्वेष संपला,
मत्सर गेला,
आता उरला
इकडे, तिकडे, चोहिंकडे

**- बालकवी**

# या बाळांनो : पुंगीवाला

या बाळांनो, या रे या !
लवकर भरभर सारे या !
मजा करा रे, मजा मजा !
आज दिवस तुमचा समजा.
स्वस्थ बसे,
तोचि फसे;
नवभूमी
दाविन मी,
या नगराला लागुनिया
सुंदर ती दुसरी दुनिया.
या बाळांनो ! या रे या !
लवकर भरभर सारे या !

खळखळ मंजुळ गाति झरे,
गीत मधुर चहुंबाजु भरे;
जिकडे तिकडे फुलें फळें,
सुवास पसरे, रसहि गळे.
पर ज्यांचे,
सोन्याचे
ते रावे,
हेरावे.
तर मग कामें टाकुनी या
नवी बघाया ही दुनिया !
या बाळांनो, या रे या !
लवकर भरभर सारे या !

पंख पाचुचे मोरांना,
टिपति पांखरें मोत्यांना,
पंख फडकती घोड्यांना,
मौज दिसे ही थोड्यांना.
चपलगती,
हरिण किती !
देखावे
देखावे
तर मग लवकर धावुनी या
नवी बघाया ही दुनिया !
या बाळांनो, या रे या
लवकर भरभर सारे या !

-भा. रा. तांबे

# या जन्मावर, या जगण्यावर

या जन्मावर, या जगण्यावर, शतदा प्रेम करावे

चंचल वारा या जलधारा, भिजली काळी माती
हिरवे हिरवे प्राण तशी ही रुजून आली पाती
फुले लाजरी बघून कुणाचे, हळवे ओठ स्मरावे

रंगांचा उघडूनिया पंखा, सांज कुणी ही केली
काळोखाच्या दारावरती, नक्षत्रांच्या वेली
सहा ऋतूंचे सहा सोहळे, येथे भान हरावे

बाळाच्या चिमण्या ओठांतून, हाक बोबडी येते
वेलीवरती प्रेम प्रियेचे, जन्म फुलांनी घेते
नदीच्या काठी सजणासाठी, गाणे गात झुरावे

या ओठांनी चुंबून घेईन, हजारदा ही माती
अनंत मरणे झेलून घ्यावी, इथल्या जगण्यासाठी
इथल्या पिंपळ पानावरती, अवघे विश्व तरावे

**-मंगेश पाडगांवकर**

# आजीचे घड्याळ

आजीच्या जवळी घड्याळ कसले आहे चमत्कारिक,
देई ठेवुनि तें कुठे अजुनि हे नाही कुणा ठाउक;
त्याची टिक टिक चालते न कधिही, आहे मुके वाटते,
किल्ली देई न त्यास ती कधि, तरी ते सारखे चालते

"अभ्यासास उठीव आज मजला आजी पहाटे तरी,"
जेव्हा मी तिज सांगुनी निजतसे रात्री बिछान्यावरी
साडेपाचही वाजतात न कुठे तो हाक ये नेमकी
"बाळा झांजर जाहले, अरवला तो कोंबडा, उठ की !"

ताईची करण्यास जम्मत, तसे बाबूसवे भांडता
जाई संपुनियां सकाळ न मुळी पत्ता कधी लागता !
"आली ओटिवरी उन्हे बघ!" म्हणे आजी, "दहा वाजले!
जा जा लौकर !" कानि तो घणघणा घंटाध्वनी आदळे.

खेळाच्या अगदी भरांत गढुनी जाता अम्ही अंगणी
हो केव्हा तिन्हिसांज ते न समजे ! आजी परी आंतुनी
बोले, "खेळ पुरे, घरांत परता ! झाली दिवेलागण,
ओळीने बसुनी म्हणा परवचा ओटीवरी येऊन !"

आजीला बिलगून ऐकत बसू जेव्हा भुतांच्या कथा
जाई झोप उडून, रात्र किती हो ध्यानी न ये ऐकता !
“अर्धी रात्र कि रे” म्हणे उलटली, “गोष्टी पुरे ! जा पडा!”
लागे तो धिडधांग पर्वतिवरी वाजावया चौघडा

सांगे वेळ, तशाच वार-तिथीही आजी घड्याळातुनी
थंडी पाऊस ऊनही कळतसे सारें तिला त्यांतुनी
मौजेचे असले घड्याळ दडुनी कोठे तिने ठेविले?
गाठोडे फडताळ शोधुनि तिचे आलो ! तरी ना मिळे !

- केशवकुमार

# मी फुल तृणातील इवले

जरी तुझीया सामर्थ्याने
ढळतील दिशाही दाही
मी फुल तृणातील इवले
उमलणार तरीही नाही.

शक्तीने तुझीया दिपुनी
तुज करतील सारे मुजरे
पण सांग कसे उमलावे
ओठातील गाणे हसरे?

जिंकील मला दंवबिंदु
जिंकील तृणाचे पाते
अन स्वतःस विसरून वारा
जोडील रेशमी नाते

कुरवाळीत येतील मजला
श्रावणातल्या जलधारा
सळसळून भिजली पाने
मज करतील सजल इशारा

रे तुझीया सामर्थ्याने
मी कसे मला विसरावे?
अन रंगांचे गंधांचे
मी गीत कसे गुंफावे?


येशील का संग पहाटे
किरणांच्या छेडीत तारा;
उधळीत स्वरातुनी भवती
हळु सोनेरी अभीसारा?

शोधीत धुक्यातुनी मजला
दवबिंदू होउनी ये तू
कधी भिजलेल्या मातीचा
मृदु सजल सुगंधीत हेतू!

तू तुलाच विसरूनी यावे
मी तुझ्यात मज विसरावे
तू हसत मला फुलवावे
मी नकळत आणि फुलावे

पण तुझीया सामर्थ्याने
ढळतील दीशा जरी दाही
मी फुल तृणातील इवले
उमलणार तरीही नाही

मंगेश पाडगावकर



# निवडुंगाच्या शीर्ण फुलाचे

निवडुंगाच्या शीर्ण फुलाचे
झुबे लालसर ल्यावे कानी ;
जरा शिरावे पदर खोचुनी
करवंदीच्या जाळीमधुनी.

शीळ खोल ये तळरानातून
भणभण वारा चढ़णीवरचा;
गालापाशी झील्मील लाडीक
स्वाद जीभेवर आंबट कच्चा.

नव्हती जाणीव आणि कुणाची
नव्हते स्वप्नही कुणी असावे;
डोंगर चढ़णीवरी एकटे
किती फ़िरावे... उभे रहावे.

पुन्हा कधी न का मिळायचे
ते माझेपण आपले आपण;
झुरते तन मन त्याच्यासाठी
उरते पदरी तीच आठवण ...

नीवडुंगाच्या लाल झुब्याची,
टपोर हिरव्या करवंदाची ...

- इंदीरा संत

साहित्य प्रतिष्ठान®

# औदुंबर

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन
निळा सावळा झरा वाहतो बेटाबेटांतुन

चार घरांचे गांव चिमुकले पैल टेकडीकडे;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गर्दी पुढे

पायवाट पांढरी तयांतुन अडवीतिडवी पडे;
हिरव्या कुरणांमधून चालली काळ्या डोहाकडे

झांकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर;
पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर

- बालकवी

# राजहंस

*एका तळ्यात होती, बदके पिले सुरेख*
*होते कुरूप वेडे, पिल्लू तयांत एक*

*कोणी न त्यास घेई, खेळावयास संगे*
*सर्वांहूनी निराळे ते वेगळे तरंगे*
*दावूनी बोट त्याला, म्हणती हसून लोक*
*आहे कुरूप वेडे, पिल्लू तयांत एक*

*पिल्लास दुःख भारी, भोळे रडे स्वतःशी*
*भावंड ना विचारी, सांगेल ते कुणासी?*
*जे ते तयास टोची, दावी उगाच धाक*
*आहे कुरूप वेडे, पिल्लू तयांत एक*

*एके दिनी परंतु, पिल्लास त्या कळाले*
*भय वेड पार त्याचे, वार्‍यासवे पळाले*
*पाण्यात पाहताना, चोरूनिया क्षणैक*
*त्याचेच त्या कळाले, तो राजहंस एक*

- ग. दि. माडगुळकर

# तुतारी

एक तुतारी द्या मज आणुनि
फुंकिन मी जी स्वप्राणाने
भेदुनि टाकिन सगळी गगनें
दीर्घ जिच्या त्या किंकाळीने
अशी तुतारी द्या मज लागुनी

अवकाशाच्या ओसाडीतले
पडसाद मुके जे आजवरी
होतील ते वाचाल सत्वरी
फुंक मारीता जिला जबरी
कोण तुतारी ती मज देईल?

रुढी, जुलूम यांची भेसूर
संताने राक्षसी तुम्हाला
फाडूनी खाती ही हतवेला
जल्शाची का? पुसा मनाला!
तुतारीने ह्या सावध व्हा तर!

चमत्कार! ते पुराण तेथुनी
सुंदर, सोज्वळ गोड मोठे
अलिकडले ते सगळे खोटे
म्हणती धरुनी ढेरी पोटे
धिक्कार अशा मूर्खांलागुनी

जुने जाऊ द्या मरणालागुनी
जाळुनी किंवा पुरुनी टाका
सडत न एक्या ठायी ठाका
सावध! ऐका पुढल्या हाका
खांद्यास चला खांदा भिडवूनी

प्राप्तकाल हा विशाल भूधर
सुंदर लेणी तयात खोदा
निजनामे त्यावरती नोंदा
बसुनी का वाढविता मेदा?
विक्रम काही करा, चला तर!

धार धरलिया प्यार जीवावर
रडतील रडोत रांडापोरे
गतशतकांची पापे घोरे
क्षालायाला तुमची रुधिरे
पाहिजेत रे! स्त्रैण न व्हा तर!

धर्माचे माजवुनी अवडंबर
नीतीला आणिती अडथळे
विसरुनीया जे जातात खुळे
नीतीचे पद जेथे न ढळे
धर्म होतसे तेथेच स्थिर

हल्ला करण्या तर दंभावर
शूरांनो! या त्वरा करा रे!
समतेचा ध्वज उंच धरा रे!
नीतीची द्वाही पसरा रे!
तुतारीच्या ह्या सुराबरोबर

नियमन मनुजासाठी, मानव
नसे नियमनासाठी, जाणा;
प्रगतीस जर ते हाणी टोणा
झुगारुनी दे देऊनी बाणा
मिरवा नीज ओजाचा अभिनव!

घातक भलत्या प्रतिबंधांवर
हल्ला नेण्या करा त्वरा रे!
उन्नतीचा ध्वज उंच धरा रे!
वीरांनो! तर पुढे सरा रे
आवेशाने गर्जत हर-हर!

पूर्वीपासूनी अजुनी सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती
संप्रति दानव फार माजती
देवावर झेंडा मिरवीती!
देवांच्या मदतीस चला तर!

- केशवसुत

# चित्रवीणा

निळ्या जळावर कमान काळी
कुठे दुधावर आली शेते
थंडाव्याची कारंजिशी
कुठे गर्द बांबूची बेटे

जिकडे तिकडे गवत बागडे
कुठे भिंतिच्या चढे कडेवर
ती म्हातारी थरथर कापे
सुखासवे होउनी अनावर

तारांमधला पतंग कोठे
भुलून गेला गगनमंडला
फणा डोलवित झोंबू पाहे
अस्त-रवीच्या कवचकुंडला

उंचवट्यावर म्हशी गोठल्या
तसेच कोठे काजळ काळे
वर्ख तृप्तीचा पानोपानी
बघून झाले ओले-ओले

कोठे तुटल्या लाल कड्यावर
चपळ धीट बकरीची पोरे
एक त्यातले लुचे आईला
सटीन कान्ती गोरे गोरे

फुलपंखरी फूलथव्यांवर
कुठे सांडली कुंकुमटिंबे
आरसपानी पाण्यावरती
तरत्या बगळ्यांची प्रतिबिंबे

कुठे आवळीवरी कावळा
मावळतीचा शकून सांगे
पूर्वेला राऊळ इंद्राचे
कोरीव संगमरवरी रंगे

घाटामध्ये शिरली गाडी
अन् रात्रीचा पडला पडदा
पण चित्रांची विचित्रवीणा
अजून करते दिडदा दिडदा

- बा. भ. बोरकर

# गणपत वाणी

गणपत वाणी बिडी पिताना
चावायाचा नुसतीच काडी;
म्हणायचा अन मनाशीच की
या जागेवर बांधिन माडी;

मिचकावुनि मग उजवा डोळा
आणि उडवुनी डावी भिवई,
भिरकावुनि ती तशीच द्यायचा
लकेर बेचव जैसा गवई.

गिऱ्हाईकाची कदर राखणे;
जिरे, धणे अन धान्यें गळीत,
खोबरेल अन तेल तिळीचे
विकून बसणे हिशेब कोळीत;

स्वप्नांवरती धूर सांडणे
क्वचित बिडीचा वा पणतीचा
मिणमिण जळत्या; आणि लेटणे
वाचित गाथा श्रीतुकयाचा.

गोणपटावर विटकररंगी
सतरंजी अन उशास पोते;
आडोशाला वास तुपाचा;
असे झोपणे माहित होते.

काडे गणपत वाण्याने ज्या
हाडांची ही ऐशी केली
दुकानातल्या जमीनीस ती
सदैव रुतली आणिक रुतली.

काड्या गणपत वाण्याने ज्या
चावुनि चावुनि फेकुन दिधल्या,
दुकानांतल्या जमीनीस त्या
सदैव रुतल्या आणिक रुतल्या.

गणपत वाणी बिडी बापडा
पितांपितांना मरून गेला;
एक मागता डोळे दोन
देव देतसे जन्मांधाला

- बा.सी. मर्ढेकर

# सहानभूती

*उभे भंवती प्रासाद गगनभेदी*
*पथी लोकांची होय दाट गर्दी*

*प्रभादिपांची फ़ुले अंतराळी*
*दौलतीची नित चालते दिवाळी*

*कोपऱ्याशी गुणगुणत अन अभन्ग*
*उभा केव्हाचा एक तो अपन्ग*

*भोवतीचा अन्धार जो निमाला*
*ह्रदयी त्याच्या जणु जात आश्रयाला*

*जीभ झालेली ओरडूनी शोष*
*चार दिवसांचा त्यात ही उपास*

*नयन थिजले थरथरती हात पाय*
*रुप दैन्याचे उभे मूर्त काय ?*

*कींव यावी पण तयाची कुणाला*
*जात उपहासुनी पसरल्या कराला*

*तोची येइ कुणी परतूनी मजुर*
*बघूनी दीना त्या उभारुनी उर*

*म्हणे राहीन दिन एक मी उपाशी*
*परि लाभु दे दोन घास त्यासी*

*खिसा ओतुनी त्या मुक्या ओन्जळीत*
*चालू लागे तो दीनबन्धू वाट*

*आणि धनिकांची वाहने पथात*
*जात होती ती आपुल्या मदात.*

**- कुसुमाग्रज**

# आम्ही कोण?

*आम्ही कोण म्हणूनि काय पुससी? आम्ही असू लाडके-*
*देवाचे दिधले असे जग तये आम्हांस खेळावया;*
*विश्वी या प्रतिभाबले विचरतो चोहीकडे लीलया,*
*दिक्कालंतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके*
*सारेही बडिवार येथिल पहा! आम्हांपुढे ते फिके;*
*पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया -*
*सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या;*
*फोले पाखडिता तुम्ही, निवडितो ते सत्त्व आम्ही निके!*

*शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरे?*
*पृथ्वीला सुरलोक साम्य झटती आणावया कोण ते?*
*ते आम्हीच, सुधा कृतींमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे;*
*ते आम्हीच शरण्य, मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभते!*

*आम्हांला वगळा - गतप्रभ झणी होतील तारांगणे;*
*आम्हांला वगळा - विकेल कवडीमोलावरी हे जिणे!*

- केशवसुत

# दगडाची पार्थिव भिंत

मी मुक्तामधले मुक्त - तू कैद्यांमधला कैदी।
माझे नि तुझे व्हायाचे - ते सूर कसे संवादी?

माझ्यावर लिहिती गीते - या मंद-समीरण लहरी।
माझ्यावर चित्रित होते - गरूडाची गर्द भरारी।।

जड लंगर तुझिया पायी - तू पीस कसा होणार?
माझ्याहून आहे योग्य - भूमीला प्रश्न विचार।।

आभाळ म्हणाले 'नाही' - भूमिही म्हणाली 'नाही'।
मग विनायकाने त्यांची - आळवणी केली नाही।।

पापण्यांत जळली लंका - लाह्यांपरि आसू झाले।
उच्चारून होण्याआधी - उच्चाटन शब्दां आले।

की जन्म घ्यायच्या वेळी - गंगेस हिमालय नाही।
शाई न स्पर्शली असूनी - हे अभंग नदिच्या
'बाही'।।

दगडाची पार्थिव भिंत - ती पुढे अकल्पित सरली।
'मी कागद झाले आहे - चल लिही' असे ती
वदली।

**- मनमोहन नातू**

# सागरास !

ने मजसी ने परत मातृभूमीला,
सागरा प्राण तळमळला ! //धृ०//

भूमातेच्या चरणतला तूंज धूंता,
मी नित्य पाहिला होता ;
मज वदलासी अन्य देशिं चल जाउं;
सृष्टिची विविधता पाहू .
तैं जननीहृद् विरहशंकितहि झालें,
परि तुवां वचन तिज दिधलें,
'मार्गज्ञ स्वयें मीच पृष्ठीं वाहीन,
त्वरित या परत आणीन !'
विश्वसलों या तव वचनीं, मी,
जगदनुभवयोगें बनुनी, मी,
तव अधिक शक्त ऊद्धरली मी,
"येईन त्वरें" कथुनि सोडिलें तिजला,
सागरा, प्राण तळमळला ! // १ //

शुक पंजरिं वा हरीण शिरावा पाशीं,
ही फसगत झाली तैशी !
भूविरह कसा सतत साहुं यापुढतीं,
दशदिशा तमोमय होती,
गुणसुमनें मी वेंचियली या भावें,
कीं, तिनें सुगंधा घ्यावें !
जरि उद्धरणीं व्यय न तिच्या हो साचा,
हा व्यर्थ भार विद्येचा.
ती आम्रवृक्ष-वत्सलता, रे,
नव कुसुमयुता त्या सुलता, रे,
तो बालगुलाबहि आतां, रे,
फुलबाग मला, हाय! पारखा झाला!
सागरा, प्राण तळमळला ! // २ //

*नभिं नक्षत्रें बहुत, एक परि प्यारा-
मज भरतभूमिचा तारा.
प्रासाद ईथें रम्य; परी मज भारी-
झोपडी आईची प्यारी.
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा
वनवास तिच्या जरी वनिचा.
भुलविणें व्यर्थ हें आता, रे,
बहु जिवलग गमते चित्ता, रे,
तुज सरित्पते, जी सरिता रे,
तद्विरहाची शपथ घालितो तुजला
सागरा, प्राण तळमळला || ३ ||*

*या फेनमिषें हंससि, निर्दया, कैसा,
कं वचन भंगिसी ऐसा ?
त्वस्वामित्वा संप्रति जी मिरवीते,
धकुनि कं आंग्लभूमीतें,
मन्मातेला अबल म्हणुनि फसवीसी ?
मज विवासनेंतें नेसी ?
जरि आंग्लभूमिभयभीता, रे,
अबला न माझी ही माता, रे,
कथिल हें अगस्तिस आतां,रे,
जो आंचमनी एक पळीं तुज प्याला,
सागरा, प्राण तळमळला || ४ ||*

- स्वा. विनायक दामोदर सावरकर

# मृग

*माउलीच्या दुधापरी*
*आले मृगाचे तुषार,*
*भुकेजल्या तान्ह्यासम*
*तोंड पसरी शिवार*

*तुकोबाच्या अभंगाला*
*मंद चिपळ्याची साथ,*
*भरारतो रानवारा*
*तसा झाडाझुडूपांत*

*पिऊनिया रानवारा*
*खोंड धांवे वारेमाप,*
*येतां मातीचा सुगंध*
*स्तब्ध झाले आपोआप*

*अवखळ बाळापरी*
*पक्षी खेळती मातींत,*
*उभारल्या पंखावरी*
*थेंब टपोरे झेलीत*

*धारा वर्षतां वरुन*
*बैल वशिंड हालवी,*
*अवेळीच फुटे पान्हा*
*गाय वत्साला बोलवी*

*गांवानेच उंच केला*
*हात दैवी प्रासादास*
*भिजुनिया चिंब झाला*
*गांवदेवीचा कळस*

**-ग. दि. माडगुळकर**

# नको नको रे पावसा ...!!

नको नको रे पावसा
असा अवेळी धिंगाणा
घर माझे चंद्रमौळी
आणि दारात सायली;

नको नाचूं तडातडा
असा कौलारावरुन,
तांबे सतेलीपातेलीं
आणू भांडी मी कोठून?

नको करु झोंबाझोंबी
माझी नाजूक वेलण,
नको टाकू फुलमाळ
अशी मातीत लोटून;

आडदांडा नको येउं
झेपावत दारांतून,
माझे नेसूचे जुनेर
नको टांकू भिजवून;

किती सोसले मी तुझे
माझे एवढे ऐक ना,
वाटेवरी माझा सखा
त्याला माघारी आण ना;

वेशीपुढे आठ कोस
जा रे आडवा धावत,
विजेबाई, कडाडून
मागे फिरव पांथस्थ;

आणि पावसा राजसा
नीट आण सांभाळून,
घाल कितीही धिंगाणा
मग मुळी न बोलेन;

*पितळेची लोटीवाटी*
*तुझ्यासाठी मी मांडीन,*
*माझ्या सख्याच्या डोळ्यांत*
*तुझ्या विजेला पूजीन;*

*नको नको रे पावसा*
*असा अवेळी धिंगाणा*
*घर माझे चंद्रमौळी*
*आणि दारात सायली....*

- इंदिरा संत

# *किती तरी दिवसांत*

*किती तरी दिवसांत*
*नाही चांदण्यात गेलो*
*किती तरी दिवसांत*
*नाही नदीत डुंबलो*

*खुल्या चांदण्याची ओढ*
*आहे माझी ही जुनीच*
*आणि वाहत्या पाण्याची*
*शीळ ओळखीची तीच.*

*केव्हा तरी चांदण्यात*
*पुन्हा जाऊन निर्भय*
*गावाकडच्या नदीत*
*होईन मी जलमय.*

*आज अंतरांत भीती*
*खुल्या चांदण्याची थोडी*
*आणि नदीचा प्रवाह*
*अंगावर कांटा काढी.*

*बरा म्हणून हा इथे*
*दिवा पारवा पा-याचा*
*बरी तोतऱ्या नळाची*
*शिरीं धार मुखीं ऋचा*

- बा. सी. मर्ढेकर

# देणा-याने देत जावे

देणा-याने देत जावे
घेणा-याने घेत जावे

हिरव्या पिवळ्या माळावरुनी
हिरवी पिवळी शाल घ्यावी
सह्याद्रीच्या कड्यावरुनी
छातीसाठी ढाल घ्यावी

वेड्यापिशा ढगांकडून
वेडेपिसे आकार घ्यावे
रक्तामधल्या प्रश्नासाठी
पृथ्वीकडून होकार घ्यावे

उसळलेल्या दर्याकडून
पिसाळलेली आयाळ घ्यावी
भरलेल्या भीमेकडून
तुकोबाची माळ घ्यावी

देणा-याने देत जावे
घेणा-याने घेत जावे
घेता घेता एक दिवस
देणा-याचे हात घ्यावे.

- विंदा करंदीकर

# पृथ्वीचे प्रेमगीत

युगामागुनी चालली रे युगे ही
करावी किती भास्करा वंचना
किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी
कितीदा करु प्रीतीची याचना

नव्हाळीतले ना उमाळे उसासे
न ती आग अंगात आता उरे
विझोनी आता यौवनाच्या मशाली
ऊरी राहीले काजळी कोपरे

परी अंतरी प्रीतीची ज्योत जागे
अविश्रांत राहील अन् जागती
न जाणे न येणे कुठे चालले मी
कळे तू पुढे आणि मी मागुती

दिमाखात तारे नटोनी थटोनी
शिरीं टाकिती दिव्य उल्काफुले
परंतु तुझ्या मूर्तीवाचून देवा
मला वाटते विश्व अंधारले

तुवा सांडलेले कुठे अंतराळात
वेचूनिया दिव्य तेजःकण
मला मोहवाया बघे हा सुधांशू
तपाचार स्वीकारुनी दारुण

निराशेत सन्यस्त होऊन बैसे
ऋषींच्या कुळी उत्तरेला ध्रुव
पिसाटापरी केस पिंजारुनी हा
करी धूमकेतू कधी आर्जव

पिसारा प्रभेचा उभारून दारी
पहाटे उभा शुक्र हा प्रेमळ
करी प्रीतीची याचना लाजुनी
लाल होऊनिया लाजरा मंगळ

परी दिव्य ते तेज पाहून पूजून

घेऊ गळ्याशी कसे काजवे
नको क्षूद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे

तळी जागणारा निखारा उफाळून
येतो कधी आठवांनी वर
शहारून येते कधी अंग तूझ्या
स्मृतीने उले अन् सले अंतर

गमे की तुझ्या रुद्र रूपात जावे
मिळोनी गळा घालुनीया गळा
तुझ्या लाल ओठातली आग प्यावी
मिठीने तुझ्या तीव्र व्हाव्या कळा

अमर्याद मित्रा तुझी थोरवी अन्
मला ज्ञात मी एक धुलिःकण
अलंकारण्याला परी पाय तूझे
धुळीचेच आहे मला भूषण

- कुसुमाग्रज

# पोटापुरता पसा पाहिजे

पोटापुरता पसा पाहिजे नको पिकाया पोळी
देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी

हवास तितका पाडी पाऊस देवा वेळोवेळी
चोचीपुरता देवो दाणा माय माउली काळी
एक वीतिच्या वितेस पुरते तळ हाताची थाळी
देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी

महाल गाद्या नकोत नाथा माथ्यावर दे छाया
गरजेपुरती देई वसने जतन कराया काया
गोठविणारा नको कडाका नको उन्हाची होळी
देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी

होते तितुके देई याहुन हट्ट नसे गा माझा
सौख्य देई वा दुःख ईश्वरा रंक करी वा राजा
अपुरेपण हि न लगे, न लगे पस्तावाची पाळी
देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी

**- ग दि माडगुळकर**

# या नभाने या भुईला दान द्यावे

या नभाने या भुईला दान द्यावे
आणि या मातीतून चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लगडून जावे

या नभाने या भुईला दान द्यावे
आणि माझ्या पापणीला पूर यावे
पाहता सुगंध कांती सांडलेली
पाखरांशी खेळ मी मांडून गावे

गुंतलेले प्राण या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुन बेहोष होता
शब्दगंधे तू मला बाहूंत घ्यावे

- ना. धों. महानोर

# ज्योत

आधी होते मी दिवटी
शेतकऱ्यांची आवडती
झाले इवली मग पणती
घरांघरांतून मीणमीणती!!

समई केले मला कुणी
देवापुढती नेवोनी
निघुनी आले बाहेर
सोडीत काळासा धूर!!

काचेचा मग महाल तो
कुणी बांधुनी मज देतो
कंदील त्याला जन म्हणती
मीच तयातील परि ज्योती !!

बत्तीचे ते रूप नवे
पुढे मिळाले मज बरवे
वरात मजवांचून अडे
झगझगाट तो कसा पडे!!

आता झाले मी बीजली
घरे मंदीरे लखलखली
देवा ठाउक काय पुढे
नवा बदल माझ्यात घडे.

एकच ठावे काम मला
प्रकाश द्यावा सकलांला
कसलेही मज रूप मिळो
देह जळो अन् जग उजळो!!

- वी. म. कुलकर्णी

# पिवळे तांबूस ऊन कोवळे

पिवळे तांबूस उन कोवळे पसरे चौफेर
ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर.

झाडांनी किती मुकुट घातले डोकीस सोनेरी
कुरणांवर शेतात पसरला गुलाल चौफेरी!

हिरवे हिरवे गार शेत हे सुंदर साळीचे
झोके घेते कसे, चहुकडे हिरवे गालीचे!

सोनेरी, मखमली, रुपेरी, पंख कितीकांचे
रंग किती वर तऱ्हे तऱ्हेचे इन्द्रधनुष्याचे.

अशी अचल फुलपांखरे फुले साळीस जणु फ़ुलती
साळीवर झोपली जणु का पाळण्यात झुलती.

झुळकन, सुळकन इकडुन तिकडे किती दुसरी उडती !
हीरे, माणके, पांचू फुटुनी पंखची गरगरती!

पहा पांखरे चरोनी होती झाडावर गोळा.
कुठे बुडाला पलिकडिल तो सोन्याचा गोळा?

- भा. रा. तांबे

साहित्य प्रतिष्ठान®

# बाळ, चालला रणा

*बाळ, चाललासे रणा*
*घरा बांधिते तोरण,*
*पंचप्राणांच्या ज्योतींनीं*
*तुज करिते औक्षण.*

*याच विक्रमी बाहुंनी*
*स्वतंत्रता राखायची,*
*खांद्यावरी या विसावे*
*शांती उद्याच्या जगाची.*

*म्हणूनिया माझ्या डोळा*
*नाही थेंबही दुःखाचा,*
*मीही महाराष्ट्र कन्या*
*धर्म जाणते वीरांचा.*

*नाही एकही हुंदका*
*मुखावाटे काढणार,*
*मीच लावुनी ठेविली*
*तुझ्या तलवारीस धार.*

*अशुभाची सावलीही*
*नाही पडणार येथे*
*अरे मीही सांगते ना*
*जीजा लक्ष्मीशी नाते.*

*तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना*
*शक्ती देईल भवानी,*
*शिवरायांचे स्वरुप*
*आठवावे रणांगणी.*

*घन्य करी माझी कूस*
*येई विजयी होऊन,*
*पुन्हा माझिया हाताने*
*दूधभात भरवीन.*

**-पदमा गोळे**

# मराठी

*लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी*
*जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी*
*धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी*
*एवढ्या जगात माय मानतो मराठी*

*आमुच्या मनामनात दंगते मराठी*
*आमुच्या रगरगात रंगते मराठी*
*आमुच्या उराउरात स्पंदते मराठी*
*आमुच्या नसानसात नाचते मराठी*

*आमुच्या पिलापिलात जन्मते मराठी*
*आमुच्या लहानग्यात रांगते मराठी*
*आमुच्या मुलामुलीत खेळते मराठी*
*आमुच्या घराघरात वाढते मराठी*

*आमुच्या कुलाकुलात नांदते मराठी*
*येथल्या फुलाफुलात हासते मराठी*
*येथल्या दिशादिशात दाटते मराठी*
*येथल्या नगानगात गर्जते मराठी*

*येथल्या दरीदरीत हिंडते मराठी*
*येथल्या वनावनात गुंजते मराठी*
*येथल्या तरुलतात साजते मराठी*
*येथल्या कळीकळीत लाजते मराठी*

*येथल्या नभामधून वर्षते मराठी*
*येथल्या पिकांमधून डोलते मराठी*
*येथल्या नद्यांमधून वाहते मराठी*
*येथल्या चराचरात राहते मराठी*

*पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी*
*आपुल्या घरात हाल सोसते मराठी*
*हे असे कितीक 'खेळ' पाहते मराठी*
*शेवटी मदांध तख्त फोडते मराठी*

- सुरेश भट

# उत्तुंग आमुची उत्तर सीमा

*उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू*
*अभिमान धरू, बलिदान करू,*
*ध्वज उंच उंच चढवू*

*परक्यांचा येता हल्ला, प्रत्येक घर बने किल्ला*
*हे कोटि कोटि भुजदंड, होतील इथे ध्वजदंड*
*छातीची करुनी ढाल, लाल या संगिनीस भिडवू*

*बलवंत उभा हिमवंत, करी हैवानाचा अंत*
*हा धवलगिरी हा नंगा, हा त्रिशूळ कांचनगंगा*
*जरि झुंड पुंड शत्रूंची आली, खिंड खिंड लढवू*

*जरी हजार अमुच्या जाती, संकटामध्ये विरघळती*
*परचक्र येतसे जेव्हा, चौदांची एकच जिव्हा*
*मग पक्ष, पंथ जरि लक्ष आमुचे, सागरात बुडवू*

*राष्ट्राचा दृढ निर्धार, करु प्राणपणे प्रतिकार*
*ह्या नसानसांतिल रक्त, जाळील आसुरी तख्त*
*आम्ही न कुणाचे दास, नवा इतिहास पुन्हा घडवू*

*अन्याय घडो शेजारी, की दुनियेच्या बाजारी*
*धावून तिथेही जाऊ, स्वातंत्र्य-मंत्र हा गाऊ*
*स्वातंत्र्य, बंधुता, समता यांचा घोष सदा घुमवू*

- वसंत बापट

# खरा तो एकची धर्म

खरा तो एकची धर्म,
जगाला प्रेम अर्पावे

जगी जे हीन अतिपतित,
जगी जे दीन पददलित
तयां जाऊन उठवावे,
जगाला प्रेम अर्पावे

जयांना कोणी ना जगती
सदा ते अंतरी रडती
तयां जाऊन सुखवावे,
जगाला प्रेम अर्पावे

समस्तां धीर तो द्यावा,
सुखाचा शब्द बोलावा
अनाथा साह्य ते द्यावे,
जगाला प्रेम अर्पावे

सदा जे आर्त अतिविकल,
जयांना गांजती सकल
तयां जाऊन हसवावे,
जगाला प्रेम अर्पावे

कुणा ना व्यर्थ शिणवावे,
कुणा ना व्यर्थ हिणवावे
समस्तां बंधु मानावे,
जगाला प्रेम अर्पावे

प्रभूची लेकरे सारी
तयाला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे,
जगाला प्रेम अर्पावे

असे जे आपणापाशी,
असे जे वित्त वा विद्या
सदा ते देतची जावे,
जगाला प्रेम अर्पावे

भरावा मोद विश्वात
असावे सौख्य जगतात
सदा हे ध्येय पूजावे,
जगाला प्रेम अर्पावे

असे हे सार धर्माचे
असे हे सार सत्याचे
परार्थी प्राणही द्यावे,
जगाला प्रेम अर्पावे

जयाला धर्म तो प्यारा,
जयाला देव तो प्यारा
तयाने प्रेममय व्हावे,
जगाला प्रेम अर्पावे

- साने गुरुजी

# रुद्रास आवाहन

डुमडुमत डमरू ये, खणखणत शूल ये,
शंख फुंकत ये, येई रुद्रा!
प्रलयघनभैरवा, करीत कर्कश रंवा
क्रूर विक्राळ घे क्रूध्द मुद्रा !

कडकडा फोड नभ, उडव उडूमक्षिका,
खडबडवि दिग्गजां, तुडव रविमालिका,
मांड वादळ, उधळ गिरी जशी मृत्तिका
खवळवीं चहुंकडे या समुद्रां !

पाड सिंहासने दुष्ट हीं पालथीं,
ओढ हत्तीवरुनी मत्त नृप खालती,
मुकुट रंकास दे, करटी भूपाप्रती,
झाड खटखट तुझें खड्ग क्षुद्रां !

जळ तडागं सडे, बुडबुडे, तडतडे
"शांति ही!" बापुडे बडबडति जन-कीडे !
धडधडा फोड तट! रुद्र ये चहुंकडे,
धगधगित अग्निमंधि उजळ भद्रा !

पूर्वी नरसिंह तूं प्रगटुनी फाडिले
दुष्ट जयीं अन्य गृहीं दरवडे पाडिले,
बनुनि नृप, तापुनी चंड, जन नाडिले
दे जयांचें तयां वीरभद्रा!

- भा. रा. तांबे

# मंथर नाग

ओतीत विखारी वातावरणी आग
हा वळसे घालित आला मंथर नाग,
मधुनीच उभारी फणा, करी फूत्कार
ये ज्वालामुखिला काय अचानक जाग!

कधि लवचिक पाते खड्गाचे लवलवते,
कधि वज्र धरेवर गगनातुन कडकडते,
कधि गर्भरेशमी पोत मधे जरतार
प्रमदेचे मादक वस्त्र जणू सळसळते.

मार्गावर याच्या लवत तृणाची पाती
पर्णांवर सुमने मोडुनि माना पडती
थरथरती झुडुपे हादरती नववेली
जग गुलाम सारे या सम्राटापुढती.

चालला पुढे तो-काय ऐट!आनंद!
अग्नीचा ओहळ ओहळतो जणु मंद,
टाकली यमाने कट्यार वा कनकाची
चालली बळींचा वेध घेत ही धुंद.

वा ताण्डव करता सोम प्राशुनी काली
रक्तात नाहली, शिरमुंडावळ भाली
थयथया नाचता नरड्यांवर प्रेतांच्या,
हे कंकण निखळुनि पडले भूवर काली.

चालला पुढे तो लचकत मुरडत मान,
अवतरे मूर्तिमान् मल्हारातिल तान
चांचल्य विजेचे, दर्याचे गांभीर्य
चालला मृत्युचा मानकरीच महान!

हा थांब-कुणाची जाळीमधे चाहूल,
अंगारकणापरि नयन कुणाचे लाल,
आरक्त ओठ ते ध्वजा जणू रक्ताच्या,
रे नकूल आला! आला देख नकूल!

थबकलाच जागी सर्प घालुनी वळसा,
रिपु समोर येता सोडुनि अन् आडोसा,
भूमीस मारुनी मागे तीव्र तडाखा,
घे फणा उभारुन मरणाचा कानोसा.

पडलीच उडी! की तडितेचा आघात!
उल्केपरि तळपत कण्यात घुसले दात,
विळख्यावर विळखे कसून चढवी सर्प,
फुंफाट करी अन् पिशापरी त्वेषात!

रण काय भयानक, लोळे आग जळात!
आदळती, वळती, आवळती क्रोधात,
जणु जिंकायासी गगनाचे स्वामित्व
आषाढघनांशी झुंजे वादळवात!

क्षणि धुळीत गेली वहात तो विषधार
शतखंडित झाले ते गर्वोन्नत ऊर
विच्छिन्न तनूतुनि उपसुनि काढुनि दात
वाऱ्यापरि गेला नकुल वनातुनि दूर.

संग्राम सरे , रक्ताचे ओघळ जाती,
आनंदे न्हाती त्यात तृणाची पाती,
पिंजून कापसापरी पडे तो नाग,
ते खंड गिळाया जमले किटक भोती!

-कुसुमाग्रज

# भंगु दे काठिन्य

भंगु दे काठिन्य माझे
आम्ल जाउ दे मनीचे
येऊ दे वाणीत माझ्या
सूर तुझ्या आवडीचे

ज्ञात हेतूंतील माझ्या
दे गळूं मालिन्य, आणि
माझिया अज्ञात टाकीं
स्फ़ूर्ती-केंद्री त्वद्‌बियाणीं

राहू दे स्वातंत्र्य माझे
फ़क्त उच्चारातलें गा,
अक्षरां आकार तूझ्या
फ़ुफ़्फ़ुसांचा वाहुं दे गा.

लोभ जीभेचा जळूं दे
दे थिजू विद्वेष सारा
द्रौपदीचे सत्व माझ्या
लाभू दे भाषा शरीरा

जाऊ दे 'कार्पण्य' 'मी' चे
दे धरु सर्वांस पोटी
भावनेला येऊ दे गा
शास्त्रकाट्याची कसोटी

खांब दे ईर्ष्येस माझ्या
बाळगू तूझ्या तपाचे;
नेऊं दे तीतून मातें
शब्द तूझ्या स्पंदनांचे

त्वत्‌स्मृतीचे ओळखू दे
माझिया हातां सुकाणू
थोर यत्ना शांती दे गा
माझिया वृत्तीत बाणूं.

आण तूझ्या लालसेची
आण लोकांची अभागी
आण माझ्या डोळियांची
पापणी ठेवीन जागी.

धैर्य दे अन नम्रता दे
पाहण्या जे जे पहाणे
वाकू दे बुध्दीस माझ्या
तप्त पोलादाप्रमाणे

घेऊ दे आघात तींते
इंद्रिय द्वारा जगाचे;
पोळु दे आतून तींते
गा अतिंद्रियार्थाचे

आशयाचा तूच स्वामी !
शब्दवाही मी भिकारी
मागण्याला अंत नाही
आणि देणारा मुरारी

काय मागावें परी म्यां
तूंही कैसे काय द्यावें;
तूच देणारा जिथे अन्
तूच घेणारा स्वभावे !!

- बा. सी. मर्ढेकर

# ती फुलराणी .......

*हिरवे हिरवेगार गालिचे, हरित तृणाच्या मखमालीचे*
*त्या सुंदर मखमालीवरती, फ़ुलराणी ही खेळत होती*
*गोड निळ्या वातावरणात, अव्याज मने होती डोलत*
*प्रणयचंचला त्या भृलीला, अवगत नव्हत्या कुमारीकेला*
*आईच्या मांडीवर बसुनी, झोके घ्यावे गावी गाणी*
*याहुनी ठावे काय तियेला, साध्या भोळ्या फ़ुलराणीला?*

*पूरा विनोदी संध्यावात, डोलडोलवी हिरवे शेत*
*तोच एकदा हासत आला, चुंबून म्हणे फ़ुलराणीला*
*"छानी माझी सोनुकली ती, कुणाकडे गं पाहात होती?*
*कोण बरे त्या संध्येतुन, हळूच पाहते डोकावून?*
*तो रविकर का गोजिरवाणा, आवडला आमुच्या राणीला?"*
*लाजलाजली या वचनांनी, साधी भोळी ती फ़ुलराणी*

*आंदोली संध्येच्या बसूनी, झोके झोके घेते रजनी*
*त्या रजनीचे नेत्र विलोल, नभी चमकती ते ग्रहगोल*
*जादूटोणा त्यांनी केला, चैन पडेना फ़ुलराणीला*
*निजली शेते निजले रान, निजले प्राणी थोर लहान*
*अजून जागी फ़ुलराणी ही, आज कशी ताळ्यावर नाही?*
*लागेना डोळ्याशी डोळा, काय जाहले फ़ुलराणीला*

*या कुंजातून त्या कूंजातून, इवल्याशा या दिवट्या लावून*
*मध्यरात्रीच्या निवांत समयी, खेळ खेळते वनदेवी ही*
*त्या देवीला ओव्या सुंदर, निर्झर गातो त्या तालावर*
*झुलुनी राहिले सगळे रान, स्वप्नसंगमी दंग होऊन*
*प्रणयचिंतनी विलीनवृत्ती, कुमारिका ही डोलत होती*
*डुलता डुलता गुंग होऊनि, स्वप्ने पाही मग फ़ुलराणी*

कुणी कुणाला अवकाशांत, प्रणयगायनें हॊतें गात;
हळूच मागुनि आले कॊण, कुणी कुणा दे चुंबनदान?"
प्रणय-खेळ हे पाहुन चित्तीं, विरहार्ता फुलराणी हॊती;
तॊ व्यॊमींच्या प्रेमदेवता, वाऱ्यावरती फिरतां फिरतां-
हळूच आल्या उतरुन खालीं, फुलराणीसह करण्या केली.
परस्परांना खुणवुनि नयनीं, त्या वदल्या "ही अमुची राणी"

स्वर्भुमीचा जुळवित हात, नाच नाचतो प्रभातवात
खेळूनी दमल्या त्या ग्रहमाला, हळुहळु लागती लपावयाला
आकाशीची गंभीर शांती, मंद मंद ये अवनीवरती
विरू लागले संशयजाल, संपत ये विरहाचा काल
शुभ्र धुक्याचे वस्त्र लेऊनी, हर्षनिर्भरा नटली अवनी
स्वप्नसंगमी रंगत होती, तरीही अजुनि फ़ुलराणी ती,

तेजोमय नव मंडप केला, लख्ख पांढरा दाही दिशांना,
जिकडेतिकडे उधळित मोती, दिव्य वऱ्हाडी गगनी येती,
लाल सुवर्णी झगे घालूनी, हांसत हांसत आले कोणी,
कुणी बांधिला गुलाबि फ़ेटा, झगमगणारा सुंदर मोठा,
आकाशी चंडोल चालला, हा वाङनिश्चय करावयाला,
हे थाटाचे लग्न कुणाचे, साध्या भोळ्या फ़ुलराणीचे,

गाऊ लागले मंगलपाठ, सृष्टीचे गाणारे भाट,
वाजवि सनई मारुतराणा, कोकिळ घे तानावर ताना,
नाचू लागले भारद्वाज, वाजविती निर्झर पखवाज,
नवरदेव सोनेरी रविकर, नवरी ही फ़ुलराणी सुंदर,
लग्न लागते! सावध सारे! सावध पक्षी! सावध वारे!
दंवमय हा अंतःपट फ़िटला, भेटे रविकर फ़ुलराणीला,

वधू-वरांना दिव्य रवांनी, कुणी गायीली मंगल गाणी,
त्यात कुणीसे गूफ़ित होते, परस्परांचे प्रेम अहा ते,
आणिक तेथिल वनदेवीही, दिव्य आपुल्या उच्छ्वासांही,
लिहित होत्या वातावरणी, फ़ुलराणीची गोड कहाणी,
गुंगतगुंगत कवि त्या ठायी, स्फ़ुर्तीसह विहराया जाई,
त्याने तर अभिषेकच केला, नवगीतांनी फ़ुलराणीला,

- बालकवी

# दोन दिवस

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे

शेकडोवेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बर्बाद झाली

हे हात माझे सर्वस्व, दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले

हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले

दुनियेचा विचार हरघडी केला अगा जगमय झालो
दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे,
याच शाळेत शिकलो

झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले;
दोन दुःखात गेले।

**- नारायण सुर्वे**

# सांग मला रे सांग मला

सांग मला रे सांग मला
आई आणखी बाबा यातुन,
कोण आवडे अधिक तुला ?

आई दिसते गोजिरवाणी, आई गाते सुंदर गाणी
तऱ्हेतऱ्हेचे खाऊ येती, बनवायाला सहज तिला !
आई आवडे अधिक मला !

गोजिरवाणी दिसते आई, परंतु भित्री भागुबाई
शक्तिवान किती असती बाबा थप्पड देती गुरख्याला !
आवडती रे वडिल मला !

घरात करते खाऊ आई, घरातल्याला गंमत नाही
चिंगम अन् चॉकलेट तर, बाबा घेती रस्त्याला !
आवडती रे वडिल मला !

कुशीत घेता रात्री आई थंडी, वारा लागत नाही
मऊ सायीचे हात आईचे सुगंध तिचिया पाप्याला !
आई आवडे अधिक मला !

निजता संगे बाबांजवळी भुते-राक्षसे पळती सगळी
मिशा चिमुकल्या करती गुदगुल्या त्यांच्या अपुल्या गालाला!
आवडती रे वडिल मला !

आई सुंदर कपडे शिवते, पावडर, तिटी तीच लावते
तीच सजविते सदा मुलींना रिबीन बांधुन वेणीला !
आई आवडे अधिक मला !

त्या रिबिनीला पैसे पडती ते तर बाबा मिळवुनि आणती
कुणी न देती पैसा-दिडकी घरात बसल्या आईला !
आवडती रे वडिल मला !

बाई म्हणती माय पुजावी, माणुस ती ना असते देवी
रोज सकाळी नमन करावे हात लावूनी पायाला !
आई आवडे अधिक मला !

बाबांचा क्रम वरती राही, त्यांच्या पाया पडते आई !
बाबा येता भिऊनी जाई सावरते ती पदराला !
आवडती रे वडिल मला !

*धडा शीक रे तू बैलोबा, आईहुनही मोठ्ठे बाबा*
*म्हणून आया तयार होती, बाबांसंगे लग्नाला !*
*आवडती रे वडिल मला !*

- ग. दि. माडगूळकर

# माझ्या छकुलीचे डोळे

*माझ्या छकुलिचे डोळे, दुध्या कवडीचे डाव*
*बाई! कमळ कमळ, गोड चिडीचं ग नांव!*

*जरी बोलते ही मैना, माझी अजून बोबडे*
*मला लागती ते बाई, खडीसाखरेचे खडे!*

*सर्व जगाचं कौतुक, हिच्या झांकल्या मुठीत*
*कुठें ठेवूं ही साळुंकी, माझ्या डोळ्याच्या पिंजऱ्यात*

*कसे हांसले ग खुदकुन, माझ्या बाईचे हे ओंठ*
*नजर होईल कोणाची, लावुं द्या ग गालबोट!*

*- वि. भि. कोलते*

# शतकानंतर आज पाहिली

शतकानंतर आज पाहिली पहिली रम्य पहाट
मेघ वितळले गगन निवळले
क्षितिजावर नव रंग उसळले
प्रतिबिंबित ते होउनि उठले.. भारतभूमिललाट

आजवरीच्या अंधारात
अनंत झाले उल्कापात
एकवटोनी तेज तयांचे तिमिर सरे घनदाट

फकिरांनी शत यज्ञ मांडिले
वेदीवरती रक्त सांडले
त्या रक्ताची क्षितिजावर ये.. आरुण मंगल लाट

दिप पेटवुनि घरदारांचे
पूजन केले स्वातंत्र्याचे
त्या ज्योतींचे तेज मिसळुनी... झाले आज विराट

पुरेत अश्रू, दुबळे क्रंदन
भावपूर्ण करु विनम्र वंदन
नव अरुणाचे होऊ आम्ही.. प्रतिभाशाली भाट

- वसंत बापट

# पारवा

*भिंत खचली कलथून खांब गेला*
*जुनी पडकी उद्‌ध्वस्त धर्मशाळा*
*तिच्या कौलारी बसुनी पारवा तो*
*खिन्न नीरस एकांतगीत गातो*

*सूर्य मध्यान्ही उभा राहे*
*घार मंडळ त्याभवती घालताहे*
*पक्षी पानांच्या शांत सावल्यांत*
*सुखे साखरझोपेत पेंगतात.*

*तुला नाही परि हौस उडायाची*
*गोड हिरव्या झुबक्यात दडायाची*
*उष्ण झळ्या बाहेर तापतात*
*गीतनिद्रा तव आंत अखंडित*

*चित्त किंवा तव कोवळ्या विखारे*
*दुखतेखुपते का सांग सांग बा रे*
*तुला काही जगतात नको मान*
*गोड गावे मग भान हे कुठून*

*झोप सौख्यानंदात मानवाची*
*पुरी क्षणही कोठून टिकायाची*
*दुःखनिद्रे निद्रिस्त बुध्दराज*
*करूणगीते घुमवीत जगी आज.*

*दुःखनिद्रा ती आज तुला लागे*
*तुझे जगही निद्रिस्त तुझ्या संगे*
*फिरे माझ्या जगतात उष्ण वारे*
*तुला त्याचे भानही नसे बा रे.*

कवी - बालकवी

# तळ्याकाठी

*अशा एखाद्या तळ्याच्या काठी बसून राहावे, मला वाटते,
जिथे शांतता स्वतःच निवारा शोधीत थकून आली असते*

*जळातला हिरवा गाळ निळ्याशी मिळून असतो काही
गळून पडत असताना पान मुळी सळसळ करीत नाही*

*सावल्यांना भरवीत कापरे जलवलये उठवून देत
उगीच उसळी मारून मासळी, मधूनच वर नसते येत*

*पंख वाळवीत बदकांचा थवा वाळूत विसावा घेत असतो
दूर कोपऱ्यात एक बगळा ध्यानभंग होऊ देत नसतो*

*हृदयावरची विचारांची धूळ हळूहळू जिथे निवळत जाते
अशा एखाद्या तळ्याच्या काठी बसून राहावे, मला वाटते!*

**-- अनिल**

# झुळुक

*वाटते सानुली मंद झुळुक मी व्हावे*
*घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे*

*कधी बाजारी कधी नदीच्या काठी*
*राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी*
*हळु थबकत जावे कधी कानोसा घेत*
*कधी रमत गमत वा कधी भरारी थेट*

*लावून अंगुली कलिकेला हळुवार*
*ती फुलून बघे तो व्हावे पार पसार*
*परि जाता जाता सुगंध संगे न्यावा*
*तो दिशादिशांतुनी फिरता उधळुनी द्यावा*

*गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर*
*झुळझूळ झऱ्यांची पसरावी चौफेर*
*शेतात पाचुच्या, निळ्या नदीवर शांत*
*खुलवीत मखमली तरंग जावे गात*

*वेळूच्या कुंजी वाजवुनी अलगूज*
*कणसांच्या कानी सांगावे हितगूज*
*शिंपावी डोही फुले बकुळीची सारी*
*गाळुनी जांभळे पिकली भुळभुळ तीरी*

*दिनभरी राबुनी दबला दिसता कोणी*
*टवटवी मुखावर आणावी बिलगोनी*
*स्वच्छंद अशा या करुनी नाना मौजा*
*घ्यावया विसावा यावे मी तिन्हीसांजा*

दामोदर कारे

# दिन दिन दिवाळी

दिन दिन दिवाळी,
गाई म्हशी ओवाळी
गाई म्हशी कोणाच्या?
लक्ष्मणाच्या
लक्ष्मण कोणाचा?
आई बापांचा
दे माय खोबऱ्याची वाटी
वाघाच्या पाठीत,
घालीन काठी

# माझ्या मराठीची गोडी

माझ्या मराठीची गोडी
मला वाटते अवीट
माझ्या मराठीचा छंद
मना नित्य मोहवित

ज्ञानोबांची तुकयाची
मुक्तेशाची जनाईची
माझ्या मराठीची गोडी
रामदास शिवाजीची

'या रे, या रे अवघे जण,
हाक मायमराठीची
बंध खळाळा गळाले
साक्ष भीमेच्या पाण्याची

डफ तुणतुणे घेऊन
उभी शाहीर मंडळी
मुजऱ्याची मानकरी
वीरांची ही मायबोली

नांगराचा चाले फाळ
अभंगाच्या तालावर
कोवळीक विसावली
पहाटेच्या जात्यावर

हिचे स्वरुप देखणे
हिची चाल तडफेची
हिच्या नेत्री प्रभा दाटे
सात्विकाची, कांचनाची

कृष्णा गोदा सिंधुजळ
हिची वाढवती कांती
आचार्यांचे आशिर्वाद
हिच्या मुखी वेद होती

माझ्या मराठीची थोरी
नित्य नवे रुप दावी
अवनत होई माथा
मुखी उमटते ओवी

-वि. म. कुलकर्णी

साहित्य प्रतिष्ठान®

# अ आ आई

अ आ आई, म म मका
मी तुझा मामा दे मला मुका

प प पतंग आभाळात उडे
ढ ढ ढगांत चांदोमामा दडे
घ घ घड्याळ, थ थ थवा
बाळ जरि खट्याळ, तरि मला हवा

ह ह हम्मा गोड दूध देते
च च चिऊ अंगणात येते
भ भ भटजी, स स ससा
मांडिवर बसा नि खुदकन हसा

क क कमळ पाण्यावर डुले
ब ब बदक तुरुतुरु चाले
ग ग गाडी झुक झुक जाई
बाळ माझे कसे गोड गाणे गाई

**- मधुसूदन कालेलकर**

# चढवू गगनी निशाण,

चढवू गगनी निशाण, आमुचे चढवू गगनी निशाण
कोटि मुखांनी गर्जू जय जय स्वतंत्र हिंदुस्थान

निशाण अमुचे मनःशांतीचे,
समतेचे अन् विश्वशांतीचे
स्वस्तिचिन्ह हे युगायुगांचे ऋषिमुखतेजमहान

मुठ न सोडू जरी तुटला कर,
गाऊ फासही जरी आवळला तर
ठेवू निर्भय ताठ मान ही झाले जरी शिरकाण

साहू शस्त्रास्त्रांचा पाऊस,
आम्ही प्रल्हादाचे वारस
सत्य विदारक आणू भूवर दुभंगूनी पाषाण

विराटशक्ती आम्ही मानव,
वाण अमुचे दलितोद्धारण
मनवू बळीचा किरीट उद्धट ठेवुनी पादत्राण

हिमालयासम अमुचा नेता,
अजातशत्रू आत्मविजेता
नामे त्याच्या मृत्युंजय हे चढवू वरती निशाण

- बा. भ. बोरकर

# गडद निळे

गडद निळे गडद निळे जलद भरुनी आले
शीतल तनु चपल चरण अनिल गण निघाले

दिन लंघुनी जाय गिरी, पद उमटे क्षितिजावरी
पद्मराग वृष्टी होय माड भव्य नाचे
गदड निळे गडद निळे जलद भरुनी आले

धुंद सजल हसीत दिशा, तृणपर्णी सज्ज तृषा
तृप्तीचे धन घनात बघुनी मन निवाले
गदड निळे गडद निळे जलद भरुनी आले

उतट बघुनी हरी करुणा हरित धरा हो गहना
मंदाकिनी वरुनी धवल विहगवृंद डोले
गदड निळे गडद निळे जलद भरुनी आले

रजत नील ताम्र नील स्थिर पल जल पल सलील
हिरव्या तटी नावांचा कृश्ण मेळ खेळे
गदड निळे गडद निळे जलद भरुनी आले

मीन चमकुनी उसळे, जलवलयी रव मिसळे
नवथर रस रंग गहन करिती नयन ओले
गदड निळे गडद निळे जलद भरुनी आले

धूसर हो क्षितिज त्वरित, घोर पथी अचल चकित
तृण विसरूनी जवळील ते खिळवी गगनी डोळे
गदड निळे गडद निळे जलद भरुनी आले

टप टप टप पडती थेंब मनी वनीचे विझती डोंब
वत्सल ये वास, भूमी आशीर्वच बोले

गदड निळे गडद निळे जलद भरुनी आले
शीतल तनु चपल चरण अनिल गण निघाले

**-बा. भ. बोरकर.**

# कोलंबसचे गर्वगीत

हजार जिव्हा तुझ्या गर्जु दे, प्रतिध्वनीने त्या समुद्रा, डळमळु दे तारे
विराट वादळ हेलकावु दे पर्वत पाण्याचे, ढळु दे दिशाकोन सारे

ताम्रसुरा प्राशुन मातु दे दैत्य नभामधले, दडु द्या पाताळी सविता
आणि तयांची अधिराणी ही दुभंग धरणीला, कराया पाजळु दे पलीता

की स्वर्गातून कोसळलेला, सूड समाधान मिळाया प्रमत्त सैतान
जमवुनि मेळा वेताळांचा या दर्यावरती करी हे तांडव थैमान

पदच्युता, तव भीषण नर्तन असेच चालु दे फुटु दे नभ माथ्यावरती
आणि तुटु दे अखंड उल्का वर्षावत अग्नी नाविका ना कुठली भीती

सहकाऱ्यांनो, का ही खंत जन्म खलाशांचा झुंजण्या अखंड संग्राम
नक्षत्रांपरी असीम नीलामध्ये संचरावे, दिशांचे आम्हांला धाम

काय सागरी तारु लोटले परताया मागे, असे का हा आपुला बाणा
त्याहुन घेऊ जळी समाधी सुखे कशासाठी, जपावे पराभूत प्राणा?

कोट्यवधी जगतात जीवाणू, जगती अन् मरती जशी ती गवताची पाती
नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभांखाली निर्मितो नव क्षितिजे पुढती

मार्ग आमुचा रोधू न शकती ना धन ना दारा घराची वा वितभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात, जिंकुनी खंड खंड सारा

चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती, कथा या खुळ्या सागराला
“अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा किनारा तुला पामराला!”

## - कुसुमाग्रज

साहित्य प्रतिष्ठान ®

# शहाणी बाहुली

या बाई या,
बघा बघा कशी माझी बसली बया......१

ऐकू न येते,
हळुहळु अशी माझी छबि बोलते.......२

डोळे फिरवीते,
टुकु टुकु कशी माझी सोनि बघते......३

बघा बघा तें,
गुलुगुलु गालांतच कशी हंसते......४

मला वाटते,
हिला बाई सारें काही सारे कळते......५

सदा खेळते,
कधि हट्ट धरुनि न मागे भलते......६

शहाणी कशी!
साडिचोळी नवी ठेवि जशिच्या तशी......७

कवि: दत्तात्रय कोंडो घाटे

# बाळ जातो दूर देशा

बाळ जातो दूर देशा, मन गेले वेडावून
आज सकाळपासुन

हात लागेना कामाला, वृत्ति होय वेडयावाणी
डोळ्यांचे ना खळे पाणी

आणा दूध जिन्सा नव्या, आणा ताजा भाजीपाला
माझ्या लाडक्या लेकाला

त्याच्या आवडीचे चार, करू पदार्थ सुंदर
कांही देऊ बरोबर

त्याचे बघा ठेविले कां, नीट सामान बांधून
कांही राहील मागून

नको जाऊ आतां बाळा, कुणा बाहेर भेटाया
किती शिणविसी काया

वार्‍यासारखी धांवते, वेळ भराभरा कशी!
गाडी थांबेल दाराशी

पत्र धाड वेळोवेळी, जप आपुल्या जीवास
नाही मायेचे माणूस

उंच भरारी घेवुन, घार हिंडते आकाशी
चित्त तिचे पिलापाशी

बाळा, तुझ्याकडे माझा, जीव तसाच लागेल
स्वप्नी तुलाच पाहील

बाळ जातो दूर देशा, देवा! येऊन ऊमाळा
लावी पदर डोळ्याला!

-गोपीनाथ

# बाभुळझाड

*अस्सल लाकूड, भक्कम झाड*
*ताठर कणा टणक पाठ*
*वारा खात गारा खात*
*बाभुळझाड उभेच आहे ॥१॥*

*देहा फुटले बारा फाटे*
*अंगावरचे पिकले काटे*
*आभाळात खुपसून बोटे*
*बाभुळझाड उभेच आहे ॥२॥*

*अंगावरची लवलव मिटली*
*माथ्यावरची हळद विटली*
*छाताडाची ढलपी फुटली*
*बाभुळझाड उभेच आहे ॥३॥*

*जगले आहे जगते आहे*
*काकुळतीने बघते आहे*
*खांदयावरती सुतारांचे*
*घरटे घेउन उभेच आहे ॥४॥*

*टक टक टक टक*
*चिटर फटर चिटर फटक*
*सुतारपक्षी म्हातार्‍याला*
*सोलत आहे शोषत आहे ॥५॥*

*आठवते ते भलते आहे*
*उरात माझ्या सलते आहे*
*आत काही कळते आहे*
*आत फार जळते आहे ॥६॥*

*अस्स्ल लाकूड भक्कम गाठ*
*ताठर कणा टणक पाठ*
*वारा खात गारा खात*
*बाभुळझाड उभेच आहे ॥७॥*

**- वसंत बापट**

# क्रूस

*रक्ताचे नच ओघळ सुकले अजुनी क्रुसावरचे*
*विरले ना ध्वनी तुझ्या प्रेषिता, अजुनी शब्दांचे*

*मंगल तव गीतांचा होतो मंदिरात घोष -*
*"प्रेम, शांति अन् क्षमा यांमध्ये वसतो परमेश! "*

*आणि आज हे तुझ्या पताका ज्यांच्या हातांत*
*निःशस्त्रांच्या रक्तामांसामध्ये नाहतात*

*मर्दांच्या बंदुका उडाल्या मुलांबायकांत*
*जगजेत्यांच्या पराक्रमाची स्फूर्तीप्रद रीत!*

*पाचोळ्यापरी पडली पाहुन प्रेतांची रास*
*नयन झाकले असशिल देवा, तू अपुले खास!*

*असेल ही बा सैतानाची प्रभुवरी मात*
*एक जखम अन् नवीन येशू, तुझ्या काळजात!*

- कुसुमाग्रज

# प्रेम कर भिल्लासारखं

पुरे झाले सुर्य चंद्र, पुरे झाल्या तारा,
पुरे झाले नदीनाले, पुरे झाला वारा

मोरासारखा छाती काढून उभा राहा
जाळासारखा नजरेमध्ये नजर बांधून पहा,

सांग तिला तुझ्या मिठीत स्वर्ग आहे सारा
पुरे झाले सुर्य चंद्र, पुरे झाल्या तारा

शेवाळलेले शब्द अन यमक छंद करतील काय?
डांबरी सडकेवरती श्रावण इंद्रधनू बांधील काय?

उन्हाळ्यातल्या ढगासारखा हवेत बसशील फिरत,
जास्तीत जास्त बारा महिने बाई बसेल झुरत

नंतर तुला लगीनचिट्ठी आल्याशिवाय राहील काय?
डांबरी सडकेवरती श्रावण इंद्रधनू बांधील काय?

म्हणून म्हणतो जागा हो जाण्यापुर्वी वेळ,
प्रेम नाही अक्षरांच्या भातुकलीचा खेळ

प्रेम म्हणजे वणवा होऊन जाळत जाणं,
प्रेम म्हणजे जंगल होऊन जळत रहाणं

प्रेम कर भिल्लासारखं बाणावरती खोचलेलं,
मातीमध्ये उगवून सुध्दा मेघापर्यंत पोचलेलं

शब्दांच्या या धुक्यामध्ये अडकू नकोस,
बुरुजावरती झेंड्यासारखा फडकू नकोस

उधळून दे तुफान सारं काळजामध्ये साचलेलं,
प्रेम कर भिल्लासारखं बाणावरती खोचलेलं!

- कुसुमाग्रज

# घाटातील वाट

घाटातील वाट,
काय तिचा थाट,
मुरकते गिरकते,
लवते पाठोपाठ.

निळी निळी परडी,
कोणी केली पालथी,
पान फुलं सांडली,
वर आणि खालती.

खाली खोल दरी,
वर उंच कडा,
भला मोठा नाग,
जणू वर काढून फणा.

भिऊ नका कोणी,
पाखरांची गाणी,
सोबतीला गात गात,
खळाळतं पाणी.

कवयित्री - सरिता पदकी

# लतांनो सांगू का तुम्हां !

"लतांनो!" सांगू का तुम्हां, उद्या श्रीराम येणार!
वनाला सर्व ह्या आता, खरा आनंद होणार

तुम्हा कोठूनीया ठावा, कसा श्रीराम तो आहे
सुखःशांती झरा तेथे, सदाचा वाहतो आहे
उद्या पाहाल डोळ्यांनी, सुखाचा पूर्ण आराम
मुखे लागाल घोकाया, जय श्रीराम श्रीराम

बघूनी नाथ हर्षाने, मला उन्माद येईल
नका आणू मनामाजी, चुकोनी दोष होतील
लतांनो ध्याल ना पुष्पे, झऱ्यांनो ध्याल ना पाणी
पहा ही अर्पीली कैसी, फळे या थोर वृक्षांनी

नव्हे कोठून ही उष्टी, जराशीं चावलेलीं हीं
कडू कच्ची फळे रामा, कशी देईन गं बाई
उद्या श्रीराम येऊ दे, तुम्हांला मीच दावीन
फळे ही त्यास अर्पोनी, सुखे त्या पायी लोळेन
जय श्रीराम श्रीराम, जय श्रीराम श्रीराम

_ वा. गो. मायदेव

# श्रावणबाळ

शर आला तो धावुनी आला काळ
विव्हळला श्रावणबाळ
“हा ! आई गे !” दीर्घ फोडूनी हाक
तो पडला जाऊन झोक
ये राजाच्या श्रवणी करुणा वाणी
हृदयाचे झाले पाणी

त्या ब्राह्मणपुत्रा बघुनी
शोकाकुल झाला नृमणी
आसवे आणुनी नयनी
तो वदला “हा हंत! तुझ्या नाशाला
मी पापी कारण बाळा”

मग कळवळूनी
नृपास बोले बाळ
“कशी तुम्ही साधीली वेळ?
मम म्हातारे माय-बाप तान्हेले
तरुखाली असती बसले
कावड त्यांची
घेवून मी काशिला
चाललो तीर्थयात्रेला
आणाया निर्मळ वारी
मी आलो या कासारी
ही लगबग भरूनी झारी
जो परत फिरे
तो तुमचा शर आला
या उरांत रुतुनी बसला

“मी एकुलता, पुत्र, कसा हा घाला
मजवरती अवचित आला
त्यां वृध्दपणी
मीच एक आधार
सेवेस अतां मुकणार
जा, बघतील ते
वाट पांखरावाणी
द्या नेऊन आधी पाणी.
आहेत अंध ते दोन्ही

दुर्वार्ता फोडू नका ही
ही विनती तुमच्या पायी
मज माघारी करा तुम्ही सांभाळ
होउनिया श्रावणबाळ

"परी झांकुनी हे सत्य कसे राहील ?
विधीलेख न होई फोल
काळीज त्यांचे फाटून शोकावेगे
ते येतील माझ्यामागे
घ्या झारी... मी जातो.." त्याचा बोल
लागला जावया खोल
सोडीला श्वास शेवटला
तो जीव-विहग फडफडला
तनु-पंजर सोडूनी गेला
दशरथ राजा रडला धायी धायी
अडखळला ठायी ठायी

कवी : ग. ह. पाटील

*[केशवसुत यांच्या "आम्ही कोण?" या मुळ कवितेचे प्र. के. अत्रे यांनी केलेले विडंबन]*

# *आम्ही कोण?*

*'आम्ही कोण?' म्हणून काय पुसता दाताड वेंगाडुनी?*
*'फोटो' मासिक पुस्तकात न तुम्ही का अमुचा पाहिला?*
*किंवा 'गुच्छ' 'तरंग' 'अंजली' कसा अद्यापि न वाचला?*
*चाले ज्यावरती अखंड स्तुतिचा वर्षाव पत्रांतुनी?*

*ते आम्ही - परवाङ्‌मयातील करू चोरुन भाषांतरे,*
*ते आम्ही - न कुणास देऊ अगदी याचा सुगावा परी!*
*डोळ्यांदेखत घालुनी दरवडा आम्ही कुबेराघरी!*
*त्याचे वाग्धन वापरून लपवू ही आमुची लक्तरे!*

*काव्याची भरगच्च घेउनि सदा काखोटिला पोतडी,*
*दावू गाउनी आमुच्याच कविता आम्हीच रस्त्यामधे,*
*दोस्तांचे घट बैसवून करु या आम्ही तयांचा 'उदे'*
*दुष्मानावर एकजात तुटुनी की लोंबवू चामडी!*

*आम्हाला वगळा-गतप्रभ झणी होतील साप्ताहिके!*
*आम्हाला वगळा-खलास सगळी होतील ना मासिके!*

## कवी - प्र. के. अत्रे

# गे मायभू

गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे;
आणीन आरतीला हे सूर्य, चंद्र, तारे.

आई, तुझ्यापुढे मी आहे अजून तान्हा;
शब्दात सोड माझ्या आता हळूच पान्हा.

आई, तुझ्यापुढे ही माझी व्यथा कशाला ?
जेव्हा तुझ्यामुळे ह्या जन्मास अर्थ आला !

मी पायधुळ घेतो जेव्हा तुझी जराशी,
माझी ललाटरेषा बनते प्रयाग काशी !

आई, तुझी अशी मी गाईन रोज गाणी
माझी तुझ्या दुधाने गेली भिजून वाणी !

- सुरेश भट

साहित्य प्रतिष्ठान®

# बिकट वाट वहिवाट (फ़टका)

*बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडु नको*
*संसारामधि ऐस आपला, उगाच भटकत फिरुं नको*
*चल सालसपण धरुनी निखालस, खोट्या बोला बोलुं नको*
*अंगी नम्रता सदा असावी, राग कुणावर धरुं नको*
*नास्तिकपणि तूं शिरुनी जनाचा, बोल आपणा घेऊ नको*
*आल्या अतिथा मुठभर द्याया मागेंपुढतीं पाहुं नको*
मायबापांवर रुसूं नको
दुर्मुखलेला असूं नको
व्यवहारामंधी फसूं नको
कधीं रिकामा बसूं नको
परी उलाढाली भलभलत्या,
पोटासाठी करुं नको ॥१॥

वर्म काढुनी शरमायाला, उणे कुणाला बोलुं नको
बुडवाया दुसऱ्याचा ठेवा, करुनी हेवा, झटूं नको
मी मोठा शाहणा, धनाढ्यही, गर्वभार हा वाहुं नको
एकाहुनी चढ एक जगामंधी, थोरपणाला मिरवु नको
हिमायतीच्या बळे गोरगरीबांला तूं गुरकावु नको
दो दिवसांची जाईल सत्ता, अपेश माथा घेउ नको
उणी तराजू तोलू नको
गहाण कुणाचे डुलवु नको
उगिच भीक तूं मागुं नको
स्नेह्यासाठी पदरमोड कर,
परंतु जामिन राहुं नको ॥२॥

*उगीच निंदा स्तुती कुणाची, स्वहितासाठी करुं नको*
*बरी खुशामत शाहण्याची, परि मूर्खाची ती मैत्री नको*
*कष्टाची बरी भाजी-भाकरी, तूपसाखरे चोरुं नको*
*दिली स्थिती देवाने तींतच मानी सुख, कधिं विटूं नको*
*असल्या गांठी धनसंचय, कर सत्कार्यी व्यय, हटूं नको*
*आतां तुज गुज गोष्ट सांगतो, सत्कर्मा तूं टाकू नको*
सुविचारा कातरुं नको
सत्संगत अंतरुं नको
द्वैताला अनुसरुं नको
हरिभजना विस्मरुं नको
सत्कीर्ती नौबतीचा डंका गाजे मग शंकाच नको ॥३॥

कवी - अनंतफंदी

# अनंत

*अनंत तारा नक्षत्रे ही अनंत या गगनांत*
*अनंत दीप्ती, अनंत वसुधा, हे शशिसूर्य अनंत.*

*वरती खाली सर्व साठले वातावरण अनंत,*
*माप कशाचे, कुणा मोजिता, सर्व अनंत अनंत।*

*कितेक मानव झटती, करिती हाडाचेही पाणी,*
*अनंत वसुधा आजवरी हो परी मोजली कोणी!*

*म्हणोत कोणी 'आम्ही गणिला हा ग्रह- हा तारा,'*
*परंतु सांगा कुणी मोजिला हा सगळाच पसारा?*

*विशाल वरती गगन नव्हे, हें विश्वाचे कोठार,*
*उदात्ततेचा सागर हा, चिच्छांतीचा विस्तार.*

*कुणी मोजिला, कुणास त्याची लांबीरूंदी ठावी?*
*फार कशाला दिग्वनिंताची तरी कुणी सांगावी?*

*अनंत सारे विश्व जाहले अनंतात या लीन,*
*क्षुद्र मानवा, सांग कशाचा बाळगिसी अभिमान?*

*तव वैभव हे तुझे धनी ही, हे अत्युच्च महाल,*
*जातिल का गगनास भेदूनि? अनंत का होतील?*

*तुझ्या कीर्तिचे माप गड्या का काळाला मोजील!*
*ज्ञान तुझे तू म्हणशी 'जाईल', कोठवरी जाईल?*

*'मी' 'माझे' या वृथा कल्पना, तू कोणाचा कोण?*
*कितेक गेले मी मी म्हणता या चक्री चिरडून.*

कवी - बालकवी

# तेथे कर माझे जुळती

तेथे कर माझे जुळती
दिव्यत्वाची जेथ प्रचिती ॥धृ.॥

हृन्मंदिरी संसृतिशरस्वागत
हंसतचि करिती कुटुंबहितरत
गृहस्थ जे हरि उरात रिझवित,
सदनीं फुलबागा रचिती ॥१॥
तेथे कर माझे जुळती

ज्या प्रबला निज भावबलानें
करिती सदनें हरिहरभुवनें,
देव-पतींना वाहुनि सु-मने
पाजुनि केशव वाढविती ॥२॥
तेथे कर माझे जुळती

गाळुनियां भाळीचे मोती
हरिकृपेचे मळे उगविती,
जलदांपरि येउनियां जाती,
जग ज्यांची न करी गणती ॥३॥
तेथे कर माझे जुळती

शिरीं कुणाच्या कुवचनवृष्टी,
वरिती कुणि अव्याहत लाठी,
धरिती कुणि घाणीची पाटी,
जे नरवर इतरांसाठीं ॥४॥

यज्ञी ज्यांनी देऊनि निजशिर
घडिले मानवतेचे मंदिर
परि जयांच्या दहनभूमिवर
नाहिं चिरा, नाही पणती ॥५॥
तेथे कर माझे जुळती

जिथे विपत्ती जाळी उजळी
निसर्ग-लीला निळी काजळी
कथुनि कायसे काळिज निखळी
एकाची सगळी वसती ॥६॥
तेथे कर माझे जुळती

*मध्यरात्रि नभघुमटाखाली*
*शांतिशिरी तम चवऱ्या ढाळी*
*त्यक्त, बहिष्कृत मी ज्या काळी*
*एकांती डोळे भरती ॥७॥*
*तेथे कर माझे जुळती*

गीतकार : बा. भ. बोरकर

# नसती उठाठेव

मोठे होते झाड वाकडे,
तिथे खेळती दोन माकडे
गंमत झाली भारी बाबा,
गंमत झाली भारी

खरखर खरखर सुतारकाका,
कापीत होते एक ओंडका
भुरभुर भुरभुर भुसा उडाला,
माकड मज्जा पाहू लागला

निम्मे लाकूड चिरुन झाले,
दुपार होता काम थांबले
पाचर ठोकून सुतार गेले,
खावयास भाकरी

माकड टुणकन खाली आले,
पाचर हलवूनी काढु लागले
शहाणे दुसरे त्यास बोलले,
“धोक्याचे हे काम न अपुले”

पहिले अपुला हट्ट न सोडी,
जोर लावूनी पाचर काढी
फटित अडके शेपूट तेव्हा,
माकड हाका मारी

सुतार येता दुसरे माकड
झाडावरती चढले भरभर
अतिशहाणे माकड वेडे
उदासवाणे बसून ओरडे

उठाठेव ही नसती सारी,
सुतार त्याला फटके मारी
म्हणून करावा विचार आधी,
नंतर कामे सारी

--कवी अज्ञात

# रानांत एकटेच पडलेले फूल

वन सर्व सुगंधित झाले
मन माझे मोहुन गेले - किती तरी

मी सारे वन हुडकीले
फुल कोठे नकळे फुलले - मज तरी
स्वर्गात दिव्य वृक्षास
बहर ये खास
असे कल्पिले - असे कल्पिले
मन माझे मोहुन गेले - किती तरी

परी फिरता फिरता दिसले
फुल दगडाआड लपाले - लहानसे
दिसण्यात फार ते साधे
परी आमोदे
जगामधी पहिले - जगामधी पहिले
मन माझे मोहुन गेले - किती तरी

मी प्रेमे वदलो त्यासी
का येथे दडुनी बसशी - प्रिय फुला?
तू गडे फुलांची राणी
तुला गे कोणी
रानी धाडिले- रानी लावीले?
मन माझे मोहुन गेले - किती तरी

ते लाजत लाजत सुमन
मज म्हणे थोडके हसुंन - तेधवा
निवडिले प्रभूने स्थान
रम्य उद्यान
तेच मज झाले- तेच मज झाले
मन माझे मोहुन गेले- किती तरी

- ना. वा. टिळक

# घननिळ सागराचा

घननिळ सागराचा घननाद येतो कानी,
घुमती दिशा दिशांत लहरीमधील गाणी,

चौफेर सूर्य ज्वाला वारा अबोल शांत,
कोठे समुद्र पक्षी गगनी फिरे निवांत,

आकाश तेज भारे माडावरी स्थिरावे,
भटकी चुकार होडी लाडात संथ धावे,

वाळूत स्तब्ध झाला रेखाकृती किनारा,
जवळी असून पाणी अतृप्त तो बिचारा,

जलधी बरोबरीचे आभासमान नाते,
त्याची न त्यास धरती संकेत फक्त खोटे,

सान्निध्य सागराचे आकाश पांघराया,
परी साथ ना कोणाची अस्तीत्व सावराया

- विद्याधर सीताराम करंदीकर

# संथ निळे हे पाणी

*संथ निळे हे पाणी*
*वर शुक्राचा तारा*
*कुरळ्या लहंरीमधुनी*
*शिळ घालतो वारा*

*दुर कमान पुलाची*
*एकलीच अंधारी*
*थरथरत्या पाण्याला*
*कसले गुपीत विचारी*

*भरुन काजव्याने हा*
*चमके पिंपळ सारा*
*स्तिमीत होऊनी तेथे*
*अवचित थबके वारा*

*किरकीर रात किड्यांची*
*निरवतेस किनारी*
*ओढ लागुनी छाया*
*थरथरते अंधारी*

*मध्येच क्षितीजावरुनी*
*विज लकाकुन जाई*
*अन ध्यानस्थ गिरी ही*
*उघडुनी लोचन पाही*

*हळुच चांदणे ओले*
*थिबके पाण्यावरुनी*
*कसला क्षण सोनेरी*
*उमले प्राणामधुनी*

*संथ निळे हे पाणी*
*वर शुक्राचा तारा*
*दरवळला गंधाने*
*मनाचा गाभारा*

**- मंगेश पाडगांवकर**

# खंड्या

*तळ्याकाठी गाती लाटा,*
*लाटांमध्ये उभे झाड.*
*झाडावर धीवराची,*
*हाले चोच लाल जाड.*

*शुभ्र छाती, पिंगे पोट,*
*जसा चाफ़ा यावा फ़ुली.*
*पंख जणू थंडीमध्ये,*
*बंडी घाली आमसुली.*

*जांभळाचे तुझे डोळे*
*तुझी बोटे जास्वंदीची,*
*आणि छोटी अखेरची*
*पिसे जवस फुलांची*

*गड्या पाखरा, तू असा*
*सारा देखणा रे कसा?*
*पाण्यावर उडताना,*
*नको मारू मात्र मासा.*

**-अज्ञात कवी**

# आकाशवेडी

मी एक पक्षिण आकाशवेडी
दुज्याचे मला भान नाही मुळी
डोळ्यात माझ्या असे एक आकाश
श्वासात आकाश प्राणांतळी

स्वप्नांत माझ्या उषा तेवते अन
निशा गात हाकारिते तेथुनी
क्षणार्धी सुटे पाय़ नीडांतुनी अन
विजा खेळती मत्त पंखांतुनी.

अशी झेप घ्यावी, असे सूर गावे,
घुसावे ढगामाजि बाणापरी,
ढ़गांचे अबोली भुरे केशरी रंग
माखून घ्यावेत पंखावरी.

गुजे आरुणी जाणुनी त्या ऊषेशी
जुळे का पहावा स्वरांशी स्वर
बघावी झणत्कारीते काय विणा
शिवस्पर्श होताच तो सुंदर

कीती उंच जावे कीती सूर गावे
घुसावे ढगामाजी बाणापरी
ढगांचे अबोली बुरे केशरी रंग
माखुन घ्यावेत अंगावरी

कीती उंच जाईन पोहचेन किंवा
संपेल हे आयु अर्ध्यावरी
आभाळ यात्रीस ना खेद त्याचा
निळी जाहली ती सबाह्यांतरी

पद्मा गोळे

# एखाद्याचे नशीब

कांहीं गोड फुलें सदा विहरती स्वर्गांगनांच्या शिरीं,
कांहीं ठेवितसे कुणी रसिकही स्वच्छंद हृन्मंदिरीं;
कांहीं जाउनी बैसती प्रभुपदीं पापापदा वारि तें,
एखादें फुटकें नशीब म्हणुनी प्रेतास शृंगारितें ।

कोणी पर्वत आपुल्या शिरिं धरि हैमप्रभा शीतला,
कोणाच्या उदरामधून निघती मोठया नद्या निर्मला;
कोणाला वनदेवता वरितसे मोदांत जी नाहते,
एखाद्या मधुनी परंतु जळती ज्वालानदी वाहते !

झाडें जोडुनी पत्रयुग्म फुटले मेघांप्रती याचती,
स्वच्छंदें जलबिंदु तोंच सगळ्या पानांवरी नाचती;
सारी पालवती, फुलें विहरती, शोभा वरी लोळते,
एखाद्यावर मात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते !

चाले खेळ असा जगांत; बहुधा सौख्यांत सारे जरी,
एखादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवीं यापरी
पाही कोण अशा हताश हृदया ? जो तो असे आपला,
देवा ! तूं तरि टाकिं अश्रु वरुनी, त्यासाठीं तो तापला !

**- गोविंदाग्रज**

साहित्य प्रतिष्ठान®

# पितात सारे गोड हिवाळा

न्हालेल्या जणू गर्भवतीच्या,
सोज्वळ मोहकतेने बंदर
मुंबापुरीचे उजळीत येई,
माघामधली प्रभात सुंदर

सचेतनांचा हुरूप शीतल,
अचेतनांचा वास कोवळा
हवेत जाती मिसळून दोन्ही,
पितात सारे गोड हिवाळा

डोकी अलगद घरे उचलती,
काळोखाच्या उशीवरूनी
पिवळे हंडे भरून गवळी,
कावड नेती मान मोडुनी

नितळ न्याहारीस हिरवी झाडे,
काळा वायु हळुच घेती
संथ बिलंदर लाटांमधुनी,
सागरपक्षी सूर्य वेचती

गंजदार पांढऱ्या नि काळ्या,
मिरवीत रंगा अन नारंगी
धक्क्यावरच्या अजून बोटी,
साखरझोपेमधे फिरंगी

कुठे धुराचा जळका परिमल,
गरम चहाचा पत्ती गंध
कुठे डांबरी रस्त्यावरचा,
भुऱ्या शांततेचा निशिगंध

या सृष्टीच्या निवांत पोटी,
परंतु लपली सैरावैरा
अजस्त्र धांदल क्षणात देईल,
जिवंततेचे अर्ध्य भास्करा

थांब जरासा वेळ तोवरी,
अचेतनांचा वास कोवळा
सचेतनांचा हुरूप शीतल,
उरे घोटभर गोड हिवाळा

- बा. सी. मर्ढेकर

साहित्य प्रतिष्ठान ®

# प्रेमस्वरूप आई

प्रेमस्वरूप आई ! वात्सल्यसिंधु आई !
बोलावुं तूज आता मी कोणत्या उपायीं ?

तू माय, लेकरू मी; तू गाय, वासरू मी;
ताटातुटी जहाली, आता कसे करू मी ?

गेली दुरी यशोदा टाकूनि येथ कान्हा,
अन् राहिला कधीचा तान्हा तिचा भुका ना?

तान्ह्यास दूर ठेवी - पान्हा तरीही वाहे -
जाया सती शिरे जी आगीत, शांत राहे;

नैष्ठुर्य त्या सतीचे तू दाविलेस माते,
अक्षय्य हृत्प्रभूचे सामीप्य साधण्याते.

नाही जगात झाली आबाळ या जिवाची,
तूझी उणीव चित्ती आई, तरीहि जाची.

चित्ती तुझी स्मरेना काहीच रूपरेखा,
आई हवी म्हणूनी सोडी न जीव हेका.

विद्याधनप्रतिष्ठा लाभे अता मला ही,
आईविणे परी मी हा पोरकाच राही.

सारे मिळे परंतू आई पुन्हा न भेटे,
तेणे चिताच चित्ती माझ्या अखंड पेटे.

आई तुझ्या वियोगे ब्रम्हांड आठवे गे !
कैलास सोडुनी ये उल्केसमान वेगे.

किंवा विदेह आत्मा तूझा फिरे सभोंती,
अव्यक्त अश्रुधारा की तीर्थरूप ओती !

ही भूक पोरक्याची होई न शांत आई
पाहूनिया दुज्यांचे वात्सल्य लोचनांही

*वाटे इथूनि जावे, तूझ्यापुढे निजावे*
*नेत्री तुझ्या हसावे, चित्ती तुझ्या ठसावे !*

*वक्षी तुझ्या परी हे केव्हा स्थिरेल डोके ,*
*देईल शांतवाया हृत्स्पंद मंद झोके ?*

*घे जन्म तू फिरूनी, येईन मीहि पोटी,*
*खोटी ठरो न देवा, ही एक आस मोटी !*

माधव ज्यूलियन

साहित्य प्रतिष्ठान®

# वनसुधा

(वसंततिलका)
बोले मुलांप्रति हरी पहिले दिशीं कीं
रात्रींच सिद्ध करणें अशनादि शिंकीं
जाऊ समस्तहि उद्यां वनभोजनातें
पोटांत भाव, वधणें अघदुर्जनातें II १ II

[द्रुतविलंबित]
खडबडोंनि समस्तहि धांवले
सहितवत्स हरीप्रति पावले
सकळ खेळति सोडुनि वासुरां
परम कौतुक जें गगनीं सुरां II २ II

[भुजंगप्रयात]
वनीं खेळती बाळ ते बल्लवांचे
तुरे खोंविती मस्तकीं पल्लवांचे
फुलांचे गळां घालिती दिव्य हार
स्वनाथासवें ते करीती विहार II ३ II

स्वकौशल्य त्या गुंजमाळांत नाना
गळां घालिती, ते करीती तनाना
शिरीं बांधिती मोरपत्रें विचित्रें
शरीरावरी रेखिती दिव्य चित्रें II ४ II

[द्रुतविलंबित]
हरिहि आपण त्यांतचि खेळतो
म्हणुनि वर्णितसे शुक खेळ तो
चहूंकडे करिती नवल क्षितीं
परि हरीसचि सर्वहि लक्षितीं II ५ II

[भुजंगप्रयात]
पहायास शोभा मृगां-काननाची
पुढें मूर्ति जातां मृगांकाननाची
गडी त्या चतुर्वक्त्रबापास हातीं
धरीतीच धांवोनि निष्पाप होती II ६ II

[उपजाति]
धांवोनि लावी पहिले करातें
श्रेष्ठत्व दे त्या अजि लेकरातें
जो तो म्हणे 'लाविन मीच पाणी
धरीन आधी प्रभु चक्रपाणी" II ७ II

परोपरी खेळति जी वनांत
अर्पूनि चित्तें जगजीवनांत
धरुनियां मर्कटपुच्छ हातीं
तयांसवें वृक्षिं उडों पहाती II ८ II

खगांचिया साउलिच्याच संगें
ते धांवती हास्यरसप्रसंगें
हंसाचिया दाखविती गतीतें
जे लाधले हंसगुरुगतीतें II ९ II

[भुजंगप्रयात]
मुखें वासुनी लोचन भ्रूतटातें
उभारुनियां वांकुल्या मर्कटांतें
अहो दाविती शब्द तैसे करीती
असे खेळती बाळ निःशंकरीती II १० II

वनीं देखती मेघनीळास मोर
प्रमोदें करी नृत्यलीला समोर
तयासारखे नाचती तोक सारे
खुणावूनि अन्योन्य कीं "तो कसा रे" II ११ II

[मालिनी]
उडत उडत चाले जेविं मंडूकजाती
उकड बसति तैसे त्यासवें तीव्र जाती
न बहु पसरितां ते हस्तपादादि, पाणी
तरति नवल पाहे हांसतो चक्रपाणी II १२ II

[भुजंगप्रयात]
वदे कृष्ण गोपाळबाळा जनांतें
"बसोनी करूं ये स्थळीं भोजनातें
वनीं वत्स सोडा चरायासि, पाणी
तयां पाजुनीयां" वदे चक्रपाणी II १३ II

"बरें कृष्णजी बोलसी तूं जसा रे
तसें वर्ततों लक्षितों तूज सारे"
असें जेविती सोडुनी वांसुरांतें
नभीं होय आश्चर्य सर्वां सुरां तें II १४ II

[मालिनी]
निजमुख कवणाही आड दृष्टी असेना
रचुनि बसवि ऐशी भोंवतीं बालसेना
हरिवदन पहाया सर्व दृष्टी भुकेल्या
म्हणुनि बहुत पंक्ती मंडलाकार केल्या II १५ II

[इंद्रवजा]
संतोषतो नंदकुमार साचा
बाळांत तैशा परमा रसाचा
पंक्तीस दे लाभा अजी वनांत
बुद्धी जयांच्या जगजीवनांत II १६ II

[भुजंगप्रयात]
असे कर्णिका अंबुजामाजि जेवीं
मुलांमध्यभागीं बसे कृष्ण, जेवी
मुखीं ग्रास सप्रेम घालूनि हातीं
दहींभात दे, देव लीला पहाती II १७ II

[शार्दुलविक्रिडीत]
वंशी नादनटी तिला कटितटीं खोवूनि पोटीं पटीं
कक्षे वामपुटीं स्वशृंग निकटी वेताटिही गोमटी
जेवी नीरतटीं तरुतळवटीं, श्रीश्यामदेहीं उटी
दाटी व्योमघटीं सुरां सुख लुटी घेती जटी धूर्जटीII१८II

वामन पंडित

# शुकान्योक्तिः

## शुकान्योक्तिः १

*[पृथ्वी]*
*फळें मधुर खावया असति, नित्य मेवे तसे,*
*हिरेजडित सुंदरीं कनकपंजरींहीं वसे,*
*अहर्निश तथापि तो शुक मनांत दुःखें झुरे,*
*स्वतंत्र वनवृत्तिच्या घडिघडी सुखातें स्मरे.*

## शुकान्योक्तिः २

*[स्त्रग्धरा]*
*देखोनी नारळीचा तरु, शुक भुलला*
*एक त्याच्या फळाला,*
*साळीचें शेत मोटें झडकरि पिकलें*
*सोडुनी तो निघाला,*
*त्यांनें त्या नारळातें फिरुनि फिरुनियां*
*फोडण्या यत्न केला,*
*आशेचाची न तेणें परि बळकटही*
*चंचुचा भंग झाला.*

## शुकान्योक्तिः ३

*[मालिनी]*
*बळकट पिंजराही तूज नाहीं बसाया,*
*फिरति बहुत बोके द्वाड भारी घरीं या,*
*परिसुनि तव वाणी पामरां सौख्य नाहीं,*
*म्हणुनि दिवस कांही मौन सेवून राही.*

- कृष्णशास्त्री चिपळूणकर

# अजाण आम्ही तुझी लेकरे

अजाण आम्ही तुझी लेकरे तू सर्वांचा पिता
नेमाने तुज नमितो गातो तुझ्या गुणांच्या कथा;

सूर्य चन्द्र हे तुझेच देवा तुझी गुरे वासरे
तुझीच शेते ,सागर, डोंगर ,तुझी फूले पांखरे

अनेक नांवे तुला तुझे रे दहा दिशांना घर
करशी देवा सारखीच तू माया सगळ्यांवर

खुप शिकावे कर्म करावे प्रेम धरावे मनी
हौस एवढी पूरवी देवा हीच एक मागणी....

- कवी अज्ञात

# महाराष्ट्र गीत

बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा

गगनभेदि गिरिविण अणु नच जिथे उणे
आकांक्षांपुढति जिथे गगन ठेंगणे
अटकेवरि जेथील तिरंगी जल पिणे
तेथ अडे काय जलाशय नदाविणे ?
पौरुषासी अटक गमे जेथ दुःसहा

प्रासाद कशास जेथ हृदयमंदिरे
सदभावांचीच भव्य दिव्य आगरे
रत्नां वा मौक्तिकांहि मूल्य मुळी नुरे
रमणईची कूस जिथे नृमणिखनि ठरे
शुद्ध तिचे शीलहि उजळवि गृहा

नग्न खड्ग करि, उघडे बघुनि मावळे
चतुरंग चमूचेही शौर्य मावळे
दौडत चहुकडुनि जवे स्वार जेथले
भासति शतगुणित जरी असति एकले
यन्नामा परिसुनि रिपु शमितबल अहा

विक्रम वैराग्य एक जागि नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म-राजकारण समवेत चालती
शक्तियुक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मया वहा

गीत मराठ्यांचे श्रवणी मुखी असो
स्फूर्ति दीप्ति धृतिहि जेथ अंतरी ठसो
वचनि लेखनीहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्रधर्म मर्म मनी वसो
देह पडो तत्कारणि ही असे स्पृहा

**- श्रीपाद कृष्ण कोल्हटकर**

# मयूरान्योक्तिः

## मयूरान्योक्ती : १

*[शार्दूलविक्रीडीत]*
*झाडें पेटुनि वाजती कडकडां, त्यांचा ध्वनी होतसे,*
*ज्वाला राहुनि राहुनी उठति या विद्युल्लता ही नसे,*
*काळा धूर नभीं बहू पसरला, हा मेघ नोहे खरा,*
*वर्षाकाळ न हा, दवानल असे, मोरा, पळें, रे, घरा.*

## मयूरान्योक्ती : २

*[शार्दूलविक्रीडीत]*
*रत्नांचा जणुं ताटवा झळकतो, मोरा, पिसारा तुझा,*
*हर्षे नाचशि तै गमे त्रिभुवनीं पक्षी न ऐसा दुजा,*
*मोठा सुंदर तूं खरा परि दया नाहींच भिल्लांस या,*
*हे घेतील तुझा जिवा, झडकरी सोडीं अरण्यास या.*

- कृष्णशास्त्री चिपळूणकर

# गजान्योक्ती

*[स्त्रग्धरा]*
*ज्याची स्पर्धा कराया*
*इतर गज कधीं*
*शक्त नाहीच झाले,*
*सांगावे काय ? ज्याच्या*
*मृगपतिहि भयें*
*रान सोडून गेले,*
*तो पंकामाजिं आजि*
*गजवर फसला,*
*युक्ति नाहीं निघाया,*
*अव्हेरीती, पहा, हे*
*कलकल करुनी*
*क्षुद्र कोल्हे तयाला.*

- कृष्णशास्त्री चिपळूणकर

# केकावली(निवडक)

(पृथ्वी)

*पिता जरि विटे, विटो; न जननी कुपुत्री विटे;*
*दयामृतसार्द्रधी न कुलकज्जले त्या किटे; ।*
*प्रसादपट झांकिती परि परा गुरूचे थिटे;*
*म्हणूनि म्हणती भले, न ऋण जन्मदेचे फिटे ॥२२॥*

*तुम्ही बहु भले, मला उमज होय ऐसे कथा;*
*कसा रसिक तो, पुन्हा जरि म्हणेल आली कथा*
*प्रतिक्षण नवीच दे रुचि शुकाहि संन्यासिया;*
*न मोहिति भवत्कथा अरसिका अधन्यासि या॥२३॥*

*तुझें यशचि तारितें परि न केवला तारवे;*
*सहाय असिला असे, तरिच शत्रूला मारवे;*
*न भागवत भेटतां, न घडतांहि सत्संगती*
*न अज्ञहृदयें तशीं तव यशोरसी रंगती ॥ २४ ॥*

*सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानीं पडो*
*कलंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो ।*
*सदङ्घ्रिकमळी दडो मुरडिता हटानें अडो*
*वियोग घडता रडो मन भवच्चारित्री जडो ॥ २५ ॥*

*न निश्चय कधी ढळो; कुजनिविघ्नबाधा टळो;*
*न चित्त भजनी चळो मति सदुक्तमार्गी वळो; ।*
*स्वतत्त्व हृदया कळो; दुरिभमान सारा गळो;*
*पुन्हा न मन हे मळो दुरित आत्मबोधे जळो ॥२६॥*

*मुखी हरि ! वसो तुझी कुशलधामनामावली,*
*क्षणांत पुरवील जी सकल कामना, मावली; ।*
*कृपा करिशि तू जगत्रयनिवास दासांवरी,*
*तशि प्रकट हे नीजश्रितजनां सदा सावरी ॥२७॥*

*दयामृतघना ! अहो हरि ! वळा मयूराकडे,*
*रडे शिशु, तयासि घे कळवळोनि माता कडे।*
*असा अतिथि धार्मिकस्तुतपदा कदा ! सापडे ?*
*तुझ्या जड भवार्णवी उतरिता न दासा पडे ॥२८॥*

- मोरोपंत

*वास्तविक केकावलीमध्ये जवळ जवळ १२२ श्लोक आहेत, त्यातील काही निवडक इथे देण्यात आले आहेत.*

# सतारीचे बोल

काळोखाची रजनी होती,
हृदयी भरल्या होत्या खंती;
अंधारांतचि गढलें सारे
लक्ष्य, न लक्षी वरचे तारे;
विमनस्कपणे स्वपदें उचलित
रस्त्यांतुनि मी होतो हिंडत;
एका खिडकींतुनि सूर तदा
पडले - दिडा दा, दिड दा, दिड दा !

जड हृदयीं जग जड हे याचा
प्रत्यय होता प्रगटत साचा;
जड ते खोटें हें मात्र कसे
ते नकळे; मज जडलेंच पिसें;
काय करावे, कोठे जावे,
नुमजे मजला की विष खावें !
मग मज कैसे रुचतील वदा
ध्वनि ते - दिड दा, दिड दा, दिड दा?

सोसाट्याचे वादळ येते
तरि ते तेव्हां मज मानवतें;
भुतें भोंवती जरी आरडती
तरि ती खचितची मज आवडती;
कारण आतिल विषण्ण वृत्ती
बाह्य भैरवी धरिते प्रीती;
सहज कसे तिज करणार फिदा
रव ते - दिड दा, दिड दा, दिड दा ?

ऐकूनि ते मज तो त्वेष चढे,
त्यासरशी त्या गवाक्षाकडे
मूठ वळुनी मी हात हिसकला;
पुटपुटलोही अपशब्दांला;
म्हटलें - "आटप, आटप मूर्खा !
सतार फोडुनि टाकसी न कां !
पिरपिर कसली खुशालचंदा,
करिसी - दिड दा, दिड दा, दिड दा!"

सरलों पुढता चार पावलें
तो मज न कळे काय जाहले
रुष्ट जरी मी सतारीवरी
गति मम वळली तरी माघारी;
ध्वनिजालीं त्या जणूं गुंतलो
असा स्ववशता विसरुनि बसलों
एका ओट्यावरी स्थिर तदा
ऐकत - दिड दा, दिड दा, दिड दा...

तेथ कोपरें अंकीं, टेंकुनि
करांजलीला मस्तक देउनि
बसलों; इतुक्यामाजी करुणा
रसपूर्ण गती माझ्या श्रवणां
आकर्षुनि घे; हृदय निवालें,
तन्मय झालें, द्रवलें; आलें
लोचनांतुनी तोय कितीकदां
ऐकत असतां - दिड दा, दिड दा!

स्कन्धीं माझ्या हात ठेवुनी
आश्वासी मज गमले कोणी,
म्हणे "खेद का इतुका करिसी ?
जिवास का बा असा त्राससी?
धीर धरी रे ! धीरापोटी
असती मोटी फळें गोमटीं !
ऐक, मनीच्या हरितील गदा
ध्वनि हे - दिड दा, दिड दा, दिड दा !"

आशाप्रेरक निघू लागले
सूर, तर्धी मी डोळे पुशिले;
वरती मग मी नजर फिरविली,
नक्षत्रें तों अगणित दिसलीं;
अस्तित्वाची त्यांच्या नव्हती
हा वेळवरी दादच मज ती!
"तम अल्प - द्युति बहु" या शब्दां
वदती रव ते - दिडदा, दिड दा !

वाद्यांतुनि त्या निघती नंतर
उदात्ततेचे पोषक सुस्वर;
तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजी;
दिक्कालासही अतीत झालों;

*उगमीं विलयीं अनंत उरलों;*
*विसरुनि गेलो अखिला भेदां*
*ऐकत असतां - दिड दा, दिड दा*

*प्रेमरसाचे गोड बोल ते*
*वाद्य लागता बोलायातें,*
*भुललों देखुनि सकलाहि सुंदर;*
*सुरांगना तो नाचति भूवर;*
*स्वर्ग धरेला चुंबायाला*
*खाली लवला - मजला गमला !*
*अशी वितरिती अत्यानंदा*
*ध्वनि ते - दिड दा, दिड दा, दिड दा !*

*शांत वाजली गती शेवटी;*
*शांत धरित्री, शांत निशा ती,*
*शांतच वारें, शांतच तारे,*
*शांतच हृदयीं झालें सारे !*
*असा सुखे मी सदना आलो,*
*शांतीत अहा ! झोपी गेलो,*
*बोल बोललो तरी कितिकदा*
*स्वप्नीं - दिड दा, दिड दा, दिड दा !*

-केशवसुत (कृष्णाजी केशव दामले)

# समाधी

या दूरच्या दूर ओसाड जागी
कीडे पांखराविण नाही कुणी
हा भूमिचा भाग आहे अभागी
इथे एक आहे समाधी जुनी

विध्वंसली कालहस्तांमुळे हिस
आल्या पहा जागजागी फटा
माती खड़े आणि आहेत काही
हिच्या भोवती भंगलेल्या विटा

आहे जरी लेख हा छेद गेला
जुन्या अक्षरातिल रेघांमधुन
दुर्वान्कुरे अन तरु खुंटलेला
निघाला थरातील भेगांमधुन

कोठून ताजी फुले बाभळींनी
हिला वाहिले फ़क्त काटे कूटे
ही भंगलेली शलाका पुराणी
कुणाचे तरी नाव आहे इथे

रानातला उन मंदावलेला
उदासीन वारा इथे वाहतो
फांदितला कावळा कावलेला
भुकेलाच येथेतिथे पाहतो

--ना घ देशपांडे

# बाभळीविषयीं अन्योक्ति

(शार्दूलविक्रीडित)

कांट्यांनीं भरलें शरीर अवघें, छाया नसे दाटही,
नाहीं वास फुलांस, भूक न निवे ज्याच्या फळें अल्पही,
नाहीं एकहि पांथ येत जवळीं तूझ्या, असो गोष्ट ही
अन्याचीं न फळें मिळोत म्हणुनी होशी तयांतें वही.

कृष्णशास्त्री चिपळूणकर

साहित्य प्रतिष्ठान®

# आई

आई एक नाव असतं
घरातल्या घरात गजबजलेल गाव असतं
सर्वात असते तेव्हा जाणवत नाही
आता नसली कुठंच तरी नाही म्हणवत नाही

जत्रा पांगते पाल उठतात
पोरक्या जमिनीत उमाळे दाटतात
आई मनामनात तशीच ठेउन जाते काही
जिवाचे जिवालाच कळावे अस जाते देऊन काही

आई असतो एक धागा
वातीला उजेड दाखवणारी समईतील जागा
घर उजळते तेव्हा तीच नसत भान
विझून गेली अंधारात की
सैरावैरा धावायलाही कमी पड़त रान

आई घरात नाही मग कुणाशी बोलतात
गोठ्यात हंबरणाऱ्या गाई ?
आई खरंच काय असते ,
लंगड्याचा पाय असते , वासराची गाय असते
दुधावरची साय असते , लेकराची माय असते

आई असते जन्माची शिदोरी
सरतही नाही आणि उरतही नाही .

- फ. मु. शिंदे

# कोकिलान्योक्ति

[ वसंततिलका]

येथें समस्त बहिरे वसताति लोक,
कां भाषणें मधुर तूं करिशी अनेक.
हे मूर्ख यांस किमपीहि नसे विवेक,
वर्णावरून तुजला गणतील काक. !! १ !!

[शार्दूलविक्रीडित]

या माळावरि वृक्ष एकहि नसे, बाळा खुळ्या कोकिला,
येथें मंजुळ शब्द काढुनि गळा कां शोषिशी आपुला?
जेथें बोल अमोल वाटति तुझे, तो देश, बा, वेगळा;
तेथें आम्र फुलोनि गंध विखरे चोहिंकडे आगळा. !! २ !!

[पृथ्वी]

वसंतसमयीं फुले, परिमळें दिशा व्यापि जो,
जयास अवलोकुनी सुरतरूहि चित्तीं थिजो,
तया सतत सेविती विहग आम्रवृक्षा किती;
परी पिकचि एकला मधुर वाणि लाधे कृती. !! ३ !!

[शार्दूलविक्रीडित]

कां, बा, सुस्वर शब्द काढिशि पिका?
राहें उगा; काळ हा
लोटेतों तरुकोटरीं लपुनियां
कोठें तरीही रहा.
पानें तीव्र हिमें गळोनि दिसती
झाडें जळाल्यापरी,
गर्जे कर्कश शब्द थोर करुनी
काकावली त्यांवरी. !! ४ !!

कृष्णशास्त्री चिपळूणकर

# स्वर्ग

*असतिल तेथें जिकडे तिकडे विखरुन पडलीं फुलें*
*असतिल पक्षी झाडांवरती गोड गात बैसले १*

*असेल तेथें वहात सुंदर दुधासारखी नदी*
*असतिल डोलत हिरवीं पिवळीं कमळें पाण्यामधीं २*

*घरें तेथलीं सुरेख असतिल चमकत सोन्यापरी*
*आंत लाविल्या असतिल रंगीबेरंगी तसबिरी ३*

*झगमग करीत असतिल तिथले सुंदर दिवे*
*विझतहि नसतिल ते वाऱ्यानें जणुं दुसरे काजवे ४*

*रोजच जत्रा भरत असावी तिथें नदीच्या तटीं*
*असतिल खाउ देत घेउनी पैसे दाटूमुटी ५*

*पंख लावुनी हिंडत वरतीं असतिल तिथलीं मुलें*
*असतिल चालत ढगावरुनही टाकित हळुं पावलें ६*

*असतिल भारी रंगित कपडे बाळांचे तेथल्या*
*शिवले असतिल शेवंतीच्या गुंफुनिया पाकळ्या ७*

*खूप दागिने असतिल त्यांनीं अंगावर घातले*
*पुन्हा काढुनी नसतिल कधिंही पेटिमधीं ठेविले ८*

*मुळींच नसतिल त्यांच्या नशिबीं अभ्यासाचीं बुकें*
*मनास माने तितुके भटकत असतिल ते सारखे ९*

*नसतिल त्यांना ठोक द्यावया तिथें खाष्ट मास्तर*
*स्वर्ग असा मज बघावयाला मिळेल का लौकर १०*

ग.ल. ठोकळ

# श्रीमहाराष्ट्रगीत

मंगल देशा! पवित्र देशा! महाराष्ट्र देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा.......धृ

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा
अंजन, कांचन, करवंदीच्या कांटेरी देशा
बकुलफुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा
भावभक्तिच्या देशा, आणिक बुध्दीच्या देशा
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा

ध्येय जें तुझ्या अंतरी
निशाणावरी
नाचतें करीं
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासि, वैराग्यासी

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्रदेशा.............१

अपर सिंधूच्या भव्य बांधवा! महाराष्ट्रदेशा
सह्याद्रीच्या सख्या! जिवलगा! महाराष्ट्रदेशा
पाषाणाच्या देहीं वरिसी तूं हिरव्या वेषा
गोदा, कृष्णा, भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा
तुझिया देहीं करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची
मंगल वसती जनस्थानिंची श्रीरघुनाथांची
ध्येय जें तुझ्या अंतरीं......................२

भिन्न वृतिंची भिन्न भिन्न हीं एक जीवसत्वें
तुझिया देहीं प्रकट दाविती दिव्य जीवतत्वे
चित्पावन बुध्दीने करिसी तूं कर्तबगारी
देशस्थाच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी
कायस्थाचें इमान फिरवी रक्ताचा फेर
ठाक मराठी मनगट दावी तुझें हाडपेर
ध्येय जें तुझ्या अंतरीं......................३

*ठायीं ठायीं पांडवलेणीं सह्याद्रीपोटीं*
*किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्रीपाठीं*
*तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिंचाही*
*लढवय्या झुंझार डोंगरीं तूंच सख्या पाहीं*
*सिंधुदुर्ग हा, विजयदुर्ग हा, ही अंजनवेल*
*दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल*
*ध्येय जें तुझ्या अंतरीं......................४*

*तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणीकोंडा*
*वहाण पायीं अंगिं कांबळी उशाखालिं धोंडा*
*विळा कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात*
*इकडे कर्णाटक हांसतसे, तिकडे गुजरात*
*आणि मराठी भाला घेई दख्खन्-कंगाल*
*तिकडे इस्तंबूल थरारे, तिकडे बंगाल*
*ध्येय जें तुझ्या अंतरीं......................५*

*रायगडावर माय जिवाची गवळण बिनधोक*
*झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाइ रोखठोक*
*करीत पावन अर्पुनि पंचप्राणांचा पिंड*
*हिरडस मावळचा श्रीबाजी, ती पावनखिंड*
*करी रायगड रायरिचा तो जिजाइचा तान्हा*
*कोंढाण्याचा करी सिंहगड मालुसरा तान्हा*
*ध्येय जें तुझ्या अंतरीं......................६*

*रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंदराजाला*
*पहिलावहिला अष्टांगांनीं प्रणाम हा त्याला*
*शहर पुण्याच्या, शिवनेरीच्या, पंढरिच्या देशा*
*पुंडलिकाच्या, शिवरायांच्या, टिळकांच्य देशा*
*अनंत कोटी ग्रंथ रचुनियां जोडि तुझ्या नामा*
*वाल्मीकीचें शतकोटी यश विष्णुदास नामा*
*ध्येय जें तुझ्या अंतरीं......................७*

*मयूर कविच्या पूर्ण यमकमय महाराष्ट्र देशा*
*कवि कृष्णाच्या निर्यमका हे महाराष्ट्र देशा*
*देवी ज्ञानेश्वरी करि जिथें भक्तीचा खेळ*
*तिथेंच गीतारहस्य बसवी बुध्दीचा मेळ*
*जिथें रंगलीं साधींभोळीं जनाइचीं गाणीं*
*तिथेंच खेळे श्रीपादांची कलावती वाणी*
*ध्येय जें तुझ्या अंतरीं......................८*

विकावयाला अमोल असली अभंगमय वाणी
करी तुझी बाजारपेठ तो देहूचा वाणी
तुला जागवी ऐन पहांटे गवळी गोपाळ
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ
मर्दानी इष्काचा प्याला तुझा भरायासी
उभा ठाकला सगनभाउ हा शाहुनगरवासी
ध्येय जें तुझ्या अंतरीं......................९

प्रभाकराची जडणघडण कडकडित म्हणायाला
दो हातांचा मुजरा माझा तुळशीरामाला
भीमथडीहुनि चहुंमुलखांवर फिरले धारकरी
भीमथडीवर चहुंमुलखांतुनि जमले वारकरी
आळंदीच्या ज्ञानोबांची भिंत घेत धांव
पुंडलिकाचें नांव चालवी दगडाची नाव
बोलघुमट घुमवीत सारखा नवलाची भाक
जेजूरीवर चढी पायरी उभी नऊ लाख
ध्येय जें तुझ्या अंतरीं......................१०

गोविंदाग्रज

# सूर्यान्योक्ती

*[शार्दूलविक्रीडीत]*

*देखूनी उदया तुझ्या द्विजकुळे गाती अती हर्षुनी,*

*शार्दूलादिक सर्व दुष्ट दडती गिर्यंतरीं जाउनी,*

*देशी ताप परी जसा वरिवरी येशी नभीं, भास्करा,*

*अत्त्युच्चीं पदिं थोरही बिघडतो हा बोल आहे खरा.*

- कृष्णशास्त्री चिपळूणकर

साहित्य प्रतिष्ठान ®

# कशासाठी? पोटासाठी !

कशासाठी पोटासाठी
खंडाळ्याच्या घाटासाठी

चला खेळू आगगाडी,
झोका उंच कोण काढी?
बाळू, नीट कडी धर
झोका चाले खाली वर
ऐका कुक्क शिट्टी झाली
बोगद्यात गाडी आली
खडखड भकभक
अंधारात लखलख
इंजिनाची पहा खोडी
बोगद्यात धूर सोडी
नका भिऊ थोड्यासाठी
लागे कुत्रे भित्यापाठी

उजेड तो दूर कसा
इवलासा कवडसा
नागफणी डावीकडे
कोकण ते तळी पडे
पाठमोरी आता गाडी
वाट मुंबईची काढी
खोल दरी उल्लासाची
दो डोक्यांचा राजमाची
पडे खळाळत पाणी
फेसाळल्या दुधावाणी
आता जरा वाटे दाटी
थंड वारा वरघाटी

डावलून माथेरान
धावे गाडी सुटे भान
तारखांब हे वेगात
मागे मागे धावतात
तार खाली वर डोले
तिच्यावर दोन होले

*झाडी फिरे मंडलात*
*रूळ संगे धावतात*
*आली मुंबई या जाऊ*
*राणीचा तो बाग पाहू*
*गर्दी झगमग हाटी-*
*कशासाठी? पोटासाठी !*

**- माधव ज्यूलियन**

साहित्य प्रतिष्ठान ®

# झाल्या तिन्हीसांजा

अजुनी कसे येती ना, परधान्या राजा?
किरकिरती रातकिडे, झाल्या तिन्हीसांजा ॥ ध्रु.॥

उशिर होई काढाया गाईंच्या धारा
शालु हिरा कालवडी देती हुंकारा
टवकारिती कान जरी वाजे दरवाजा ॥१॥

वाट तरी सरळ कुठें पांदितिल सारी !
त्यांतुनी तर आज रात्र अंधारी भारी
आणि बैल कसल्याही बुजती आवाजा ॥२॥

'जेवणार मी पुढ्यात' घाली मधु रुंजी
झोपेने पेंगुळली तरी न नीजे मंजी
आणि किती करती आंत-बाहेरी ये-जा ॥३॥

निवल्यावर हुरडयाच्या उसळीस न गोडी
लवकर कां सोडिती न मोट तरी थोडी
अधिकाधिक खाली-वर होई जीव माझा ॥४॥

गुरगुरला तो पिसाळ काल जरा कांही
म्हणती त्या मेल्याला काळिज कीं नाही
परि पाठीराखी ती आहे अष्टभुजा ॥५॥

- यशवंत

साहित्य प्रतिष्ठान ®

# विद्याप्रशंसा

[आर्या]
विद्येनेंच मनुष्या आलें श्रेष्टत्व ह्या जगामाजीं;
न दिसे एकहि वस्तू विद्येनेंही असाध्य आहे जी. !! १ !!

व्यासदिक आद्य मुनी कवि अर्वाचीन सर्व थोर तसे
म्हणती एकमतें कीं, धन विद्यासम नरास अन्य नसे!!२!!

देउनि किंवा भोगुनि उणें न होतां सदैव वाढतसे
ऐसे एकच विद्या-धन, अद्‌भूत गुण न हा दुज्यांत वसे.!! ३ !!

न बलात्कारें राजा, न चोर कपटें, जया हरायास
होई समर्थ, ज्याच्या अल्पहि संरक्षणीं न आयास.!! ४ !!

नानाविध रत्नांचीं कनकाचीं असति भूषणें फार;
परि विद्यासम एकहि शोभादायक नसे अलंकार. !! ५ !!

या साऱ्या भुवनीं हित-कर विद्येसारखा सखा नाहीं;
अनुकूळ ती जयाला नित्य तयाला उणें नसे कांहीं !! ६ !!

गुरुपरि उपदेश करी, संकट्-समयीं उपायही सुचवी,
चिंतित फल देउनियां कल्पतरूपरि मनोरथां पुरवी. !! ७ !!

विद्याबलसम अढळे न दुजें बल कोणतेंहि या लोकीं;
तीनें निजप्रभावें वश केलें सकल विश्व, अवलोकीं ! !! ८ !!

क्षुद्रा पशुपक्ष्यांची काय कथा? पांचही महाभूतें
ज्ञानबळें आकळुनी केलें मनुजें स्वदाससम त्यांतें. !! ९ !!

विसरुनि परस्परांचा विरोध जल वन्हि सेविती त्यातें;
दासांपरि वश होउनि करिती त्याच्या समस्त कृत्यांतें.!!१० !!

त्याचीं वस्त्रें विणिती, रथ ओढिति, लोटितीहि नौकांतें;
बहु सांगणें कशाला? करिती तो सांगतो तयां तें तें ! !! ११ !!

मोठे मोठे तरुवर मोडी, फोडीहि जी शिलारशी,
विद्युल्लता नरें ती केली संदेशहारिका दासी ! !! १२ !!

विद्येच्या सामर्थें केला रवि चित्रकार मनुजानें;
होउनि अंकित वायुहि तुष्ट करी त्यास सुस्वरें गानें !! १३ !!

यापरि सकल सुखें जी देई, दुःखें समस्त जी वारी,
त्या विद्यादेवींते अनन्यभावें सदा भजा भारी. !! १४ !!

नाहीं परोपकारापरि दुसरें थोर पुण्य हें वचन
सत्य असे तरि विद्यादानाशीं तुल्य पुण्य आणिक न.!! १५ !!

ऐश्वर्यबलधनादिक सौख्यें प्रसवे समस्त जी कांहीं,
ती विद्या जो देई, तेणें वद काय तें दिलें नाहीं? !! १६ !!

- कृष्णशास्त्री चिपळूणकर

टीप: मूळ २३ आर्यांपैकी निवडक १६ आर्यांचा वेचा इथे देण्यात आला आहे.

# उघड उघड पाकळी

उघड उघड पाकळी, फुला रे
उघड उघड पाकळी ॥ ध्रु. ॥

आंतल्या आंत कोवळे
मधुजीवन कां कोंडले?
बाहेर हवा मोकळी, फुला रे ॥ १ ॥

तमसंकुल सरली निशा
नीलारुण हंसली उषा:
चौफेर विभा फांकली, फुला रे ॥ २ ॥

मलयानिल उदयांतला
बघ शोधत फिरतो तुला
कां मृदुल तनू झांकली, फुला रे ॥ ३ ॥

कीं रहस्य हृदयांतले
आंतल्या आंत ठेवले?
ही तुझी कल्पना खुळी, फुला रे ॥ ४ ॥

- ना. घ. देशपांडे

# कादरखां

हा कोण इथे पडलेला ! 'कादरखां काबुलवाला' ! धृ.

धिप्पाड देह हा अडवा ! पसरला सहा अन् फूट !
पालथे पलिकडे पडले ! विक्राळ खिळ्यांचे बूट !
चुणिदार चोळणा आतां ! फाटून होय चिरगूट !
बैसला पठाणी बडगा ! बाजूला दूर निमूट !
चिखलांत बुडाले कल्ले !
त्यां ओढिति चिल्लें-पिल्लें !
खिसमीस खिशांतिल उरलें
कुणी मारि तयावर डल्ला ! 'कादरखां काबुलवाला' !.....१

अफगाण दऱ्यांतिल आतां ! डुरकाळ्या फोडिति शेर !
बुरख्यांतुनि कंदाहारी ! उठलासे हाहाःकार !
तो शर्बत पीतां-पीतां ! दचकेल मधेंच अमीर !
'क्या हुवा!' ओरडुनि ऐसें ! बडवतात सगळे ऊर !
ते हेरतचे अक्रोड
ते बदाम-पिस्ते गोड
रडरडुनी होती रोड
अल्बुखार अंबुनि गेला ! 'कादरखां काबुलवाला' !....२

तो हिंग काबुली आतां ! विकणार यापुढें कोण ?
व्याजास्तव बसुनी दारीं ! गरिबांचा घेइल प्राण ?
खाणार कोण यापुढतीं ! तीं कलिंगडें कोरून?
सजवील नूर नयनांचा ! कीं सुरमा घालुनि कोण ?
रस्त्यावर मांडुनि खाटा
हुक्क्यासह मारिल बाता-
हिंडेल कोण वा आतां
घालून चमेलीमाळा ? ! 'कादरखां काबुलवाला' ! .....३

करुं नका गलबला अगदीं ! झोंपला असे हा वीर !
जन्मांत असा पहिल्यानें ! पहुडला शांत गंभीर !
राहणें जितें जर, मागें ! व्हा दोन पावलें दूर !
हा बसेल मानगुटीला ! ना तरी होउनी पीर !
जा पळा-पंचनाम्याला
तो आला डगलेवाला,--
अडकवील कीं साक्षीला,
मग म्हणाल "पुरता भंवला ! 'कादरखां काबुलवाला'!४

केशवकुमार

# कोळ्याचा प्रयत्न

*[अभंग]*
*एका कोळियानें एकदां आपूलें !*
*जाळें बांधियेलें उंच जागीं !!*
*तेथुनी सुखानें खालतीं तो आला !*
*परी मग झाला कष्टी बहू !!*
*मागुती जाळीया-माजीं जातां ये ना !*
*धाग्यावरुनी पुन्हां पुन्हां पडे !!१!!*

*[कामदा]*
*चार वेळ तो ह्यापरी पडे ! जाय बापुडा भागुनी, पुढें !!*
*आस खुंटली, येतसे रडें ! अंग टाकुनी भूमिसी पडे!!२!!*

*[अंजनी गीत ]*
*फिरुनि एकदा धीर धरुनियां !*
*लागे हळुहळु वरतिं चढाया !!*
*जाळ्याजवळी परि पोंचुनियां !*
*आदळला खालीं !! ३ !!*

*[साक्या]*
*पांचहि वेळा यत्न करुनियां, आलें यश न तयाला !!*
*गरिब बापुडा कोळी तेव्हां, दुःखी अतिशय झाला !!४ !!*
*हिंमत धरुनी फिरुनि आणखीं, धागा चढुनी गेला !!*
*परि जाळ्यामधिं शिरतांना तो, झोक जाउनी पडला!!५!!*

*[दिंडी]*
*"अहा ! मज ऐसा दैव-हत प्राणी !*
*खचित जगतीं या दिसत नसे कोणी !" !!*
*निराशेनें बोलुनी असें गेला !*
*परी चित्तीं स्वस्थता न ये त्याला ! !! ६ !!*

*[अभंग]*
*मग वेगें वेगें उठे ! धागा चढूं लागे नेटें !!*
*बहु घेई खबरदारी ! जाई, पोंचे जाळ्यावरीं !!*
*हळुच मग आंत शिरे ! पोटीं आनंदानें भरे !!*
*झटे निश्चयाचे बळें ! अंतीं त्याला यश मिळे !!७ !!*

कवी : अज्ञात

# विमान

किति मौज दिसे ही पहा तरी
हे विमान फिरतें अधांतरीं. ध्रु.

खोल नदींतुन कापित पाणी
मत्स्य धांवतों चहुंबाजूंनी,
घारच अथवा फिरते गगनीं,
हुबेहुब हें त्याच परी. १

रविकररंजित मेघांमधुनी,
स्वच्छ चांदण्यामधें पोहुनी,
घुमघुम् नादें दिशा घुमवुनी,
प्रवास करि हें जगावरी. २

परंतु केव्हा पाउस गारा
प्रांत वेढुनी टाकिति सारा
त्यांतूनहि हें जाइ भरारा,
नवल नव्हे का खरोखरी? ३

पहा जाउनी विमानांतुनी,
दिसेल शोभा अपूर्व वरुनी,
डोंगर, रानें, ओहळ, तटिनी
आणि कुठे सागरलहरी; ४

ग्रहनक्षत्रें आकाशांतिल
विमान बघुनी मनांत म्हणतिल,
"भेटाया अपणां पृथ्वींतिल
येति माणसें कुणीतरी." ५

नको सूर्यचंद्रावर जाया;
नको जगाची सफर कराया,
नेइं विमाना, मज त्या ठायां
जेथ माय मम वास करी. ६

गोपीनाथ

# उषा

*होतो पुस्तक घेउनी सहज मी दारात त्यांच्या उभा,*
*बाला तोंच समोरूनी कुणीतरी आली त्वरेने पुढे*
*वाऱ्याने उडुनी पुनःपुनरपी चंद्रास जे झाकिती*
*मागे सारित-सांवरीत पदरा-ते मोकळे कुंतल,*

*किंचित हासूनि बोलली मजसि ती अस्पष्ट काही तरी,*
*किंवा स्पष्ट असेल ते, समजले माते न तेव्हा पण;*
*होतो स्तब्ध तसाच मी, मजकडे डोळे तिचे लागले;*
*त्यांचे तेज खुले मुखावरी; रवी जाताच खाली जरा*

*त्याची मावळती प्रभा पसरूनी रंगे जशी वारूणी,*
*गोऱ्या, नाजुक या तनूवर तशी शोभे छटा तांबुस;*
*नाही पार्थीव भाव ज्यास शिवले, स्वर्गीय जे शैशव*
*त्याची ही रमणीय मूर्तिच उभी माझ्याकडे राहिली.*

*मी त्यानंतर पाहिले नच तिला,-वर्षे किती लोटली?*
*चित्ताच्या क्षितीजावरून परि ती नाही उषा लोपली.*

**ग.त्र्यं.माडखोलकर**

# सैनिकाप्रत

सदैव सैनिका पुढेच जायचे
न मागुती तुवा कधी फिरायचे ॥ धृ ॥

सदा तुझ्यापुढे उभी असे निशा
सदैव काजळी दिसायच्या दिशा
मधून मेघ हे नभास ग्रासती
मधेच या विजा भयाण हासती
दहा दिशांतुनी तुफान व्हायचे ॥ १ ॥

प्रलोभने तुला न लोभ दाविती
न मोहबंधने पदांस बांधिती
विरोध क्रोध वा तुला न थांबवी
न दैन्यही तुझे कधी सरायचे ॥ २ ॥

नभात सैनिका प्रभात येउ दे
खगांसवे जगा सुखात गाउ दे
फुलाफुलांवरी सुवर्ण शोभु दे
जगास शांतता, सुहास्य लाभु दे
न पाय तोवरी तुझे ठरायचे ॥ ३ ॥

- वसंत बापट

# ऋण

*तुझ्या शेतात राबून*
*माझी सरली हयात*
*नको करू हेटाळणी*
*आता उतार वयात ॥ १ ॥*

*नाही राजा ओढवत*
*चार पाउले नांगर*
*नको बोलूस वंगाळ*
*नको म्हणूस डंगर ॥ २ ॥*

*माझ्या ऐन उमेदीत*
*माझी गाईलीस ओवी*
*नको चाबकासारखी*
*आता फटकारु शिवी ॥ ३ ॥*

*माझा घालावाया शीण*
*तेव्हा चारलास गूळ*
*कधी घातलीस झूल*
*कधी घातलीस माळ ॥ ४ ॥*

*अशा गोड आठवणी*
*त्यांचे करीत रवंथ*
*मला मरण येऊ दे*
*तुझे कुशल चिंतीत ॥ ५ ॥*

*मेल्यावर तुझे ठायी*
*पुन्हा एकदा रुजू दे*
*माझ्या कातड्याचे जोडे*
*तुझ्या पायात वाजू दे ॥ ६ ॥*

- श्री. दि. इनामदार

# टिगळं

'हसलो' म्हणजे 'सुखात आहे' ऐसे नाही..
'हसलो' म्हणजे 'दुखले नव्हते' ऐसे नाही..
'हसलो' म्हणजे फक्त टाळले विवाद थोडे
म्हणायचे ते म्हटलो सारे ऐसे नाही ! ...

'हसलो' म्हणजे फक्त स्वतःच्या फजितीवरती
निर्लज्जागत दिधली होती स्वतःस टाळी
'हसलो' कारण शक्यच नव्हते दुसरे काही
'डोळ्यामध्ये पाणी नव्हते' ऐसे नाही !

'हसलो' कारण तूच कधि होतीस म्हणाली
याहुन तव चेहऱ्याला काही शोभत नाही !
'हसलो' कारण तुला विसरणे जितके अवघड,
तितके काही गाल प्रसरणे अवघड नाही !

'हसलो' कारण दुसऱ्यांनाही बरे वाटते
'हसलो' कारण तुलासुद्धाते खरे वाटते !
'हसलो' म्हणजे फक्त डकवली फुले कागदी
'आतुन आलो होतो डवरून' ऐसे नाही..

'हसलो' कारण शास्त्राची मज ओळख होती
अश्रु जाळण्यामधे जाते अधिक शक्ति !
'हसलो' कारण हिशोबास या दमलो नाही
'हसलो' कारण रडण्यामध्ये रमलो नाही !

'हसलो' कारण जरी बत्तिशी कुरुप आहे
खाण्याची अन् दाखवण्याची एकच आहे !
'हसलो' कारण सत्याची मज भीती नाही
'हसलो' कारण फसण्याच धसका नाही..

- संदीप खरे

# हिरवें तळकोंकण

सह्याद्रीच्या तळीं शोभतें हिरवें तळकोंकण,
राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित केवळ नंदनवन !

झुळझुळ गाणें मंजुळवाणें गात वाहती झरे,
शिलोच्चयांतुनि झुरुझुरु जेथें गंगाजळ पाझरे;

खेळत खिदळत नद्या चालल्या गुणगंभीराकडे
दरिखोर्‍यांतुनि माणिकमोतीं फुलुनि झांकले खडे;

नील नभीं घन नील बघुनि करि सुमनीं स्वागत कुडा,
गोमेदांच्या नटे फुलांनी बरसातिंत तेरडा !

कडेकपारीं खेळ मारुतासह खेळे हिरवळ,
उधळित सोनें हसे नाचरें बालिश सोनावळ !

शारद समयीं कमलवनाच्या तरत्या शय्येवरी
मदालसा स्वच्छंद लोळती जलदेवी सुंदरी !

कविकाव्यांतुनि, तशी जींतुनी स्त्रवते माध्वी झरी,
आमोदा उधळीत फुले ती बकुळीची मंजरी;

हिरव्या पिवळ्या मृदुल दलांच्या रम्य गालिच्यावरी
स्वप्नीं गुंगति गोकर्णीचीं फुलें निळीं पांढरीं !

वृक्षांच्या राईंत रंगती शकुंत मधु गायनीं
तरंगिणीच्या तटीं डोलती नाग केतकीवनीं !

फूलपांखरांवरुनि विहरती पुष्पवनांतिल परी
प्रसन्नता पसरीत वाजवुनि जादूची पांवरी !

शिताबाइच्या गोड हातचे पोहे जे काननीं
रागानें दे बाइलवेडा कवडा भिरकावुनी,

रोपें त्यांचीं बनुनि पसरलीं नाचत चोहींकडे !
अजुनि पहा या ! मंडित त्यांनीं कोंकणचे हे सडे !

इतिहासाला वार्ता ज्याची श्रुत नाहीं जाहली,
दंतकथांसहि विस्मृति ज्याची होउनियां राहिली,

"झिम्मा खेळे कोंकणचा तो नृपाळ" म्हणती मुली,
गळे वसंती टपटप जेव्हां आंब्याची डाहळी !

पिकले आंबे गळुनि भूतळीं रस जोंवरि वाहतो
वनदेवींसह झिम्मा खेळत तोंवरि नृप राहतो

कुठें आढळे फळभाराने लवलेली आंवळी,
कुठें गाळिती भुळभुळ अपुलीं पक्व फळें जांभळी,

कुठें हलवितो पिंपळपाने पिंपळ पारावर,
कुठें वडाच्या पारंबीवर झोंके घे वानर !

कुठें बेहड्यावरि राघूस्तव विरही मैना झुरे,
प्राणविसांवा परत न आला म्हणुनि चित्त बावरे !

मधमाशांची लोंबति पोळीं कुठें सात्त्विणावरी
रंग खेळती कुठें प्रमोदें पांगारे शेवरी !

पोटीं साखरगोटे परि धरि कंटक बाहेरुनी
झुले कुठें तो फणस पुरातन रहिवासी कोंकणी.

कोठें चिंचेवर शठ आंबा करि शीतळ सांउली,
म्हणुनि कोपुनी नदीकिनारीं रातंबी राहिली !

निर्झरतीरीं रानजाइच्या फुलल्या कुंजांतुनी
उठे मोहमय संगीताचा अस्फुट कोठें ध्वनी !

कुठें थाट घनदाट कळकिचा त्यांत संचरे कुंणी
पुंगि बजावित फंदि मुशाफर दर्यापुर सोडुनी !

कुठें सुरंगी-मुकुलकुलाच्या सस्मित वदनांतुनी
दरवळलेला परिमळ सेवित फिरति अप्सरा वनीं !

कोरांटीचीं, नादवटीचीं, नेवाळीचीं फुलें
फुलुनि कुठें फुलबाग तयांनीं अवघे शृंगारिले !

नीललोचना कोंकणगौरी घालुनि चैत्रांगणीं
हिंदोळ्यावरि बसविति जेव्हां अंबा शुभदायिनी,

हळदीकुंकू तदा वांटितां नसो प्रसादा उणें,
पिकलीं म्हणुनी रानोरानीं करवंदें तोरणें

औदुंबरतरु अवधूताचा छाया दे शीतळ,
शिवयोग्याचा बेल वाढवी भावभक्तिचें बळ;

बघुनि पांढरी भूतपाळ वेताळ काढितो पळ,
आइनकिंजळ करिती मांत्रिकमंत्रबळा दुर्बळ !

गडागडावर निवास जेथें माय भवानी करी
राहे उधळित फुलें तिथे खुरचांफा चरणांवरी !

पानफुलांच्या वाहुनि माळा अंजनिच्या नंदना,
तिजवर वरुनी वैधव्याच्या रुइ चुकवी यातना !

चिंव चिंव शब्दा करित निंवावर खार भराभर पळे
भेंडिउंडिणींवरी बैसुनी करकरती कावळे;

लज्जारंजित नवयुवतींच्या कोमल गालांसम
रंगुनि काजू, भरले त्यांनीं डोंगर दुर्गम !

तिथें मंडलाकार मनोहर नर्तन आरंभुनी,
रुसल्या सखिची घुमत पारवा करितो समजावणी!

विविध सुवासीं हिरवा चांफा चकित करी मानस,
मंद मंद मधु गंध पसरितो भुइचांफा राजस,

हंसे उपवनीं अर्धोन्मीलित सुवर्णचंपककळी,
पाडुनि तुळशीवरी चिमुकली हलती निज सांउली !

पराग पिवळे, धवल पाकळ्या, परिमळ अंबर भरी,
घालित रुंजी भ्रमति भृंग त्या नागचंपकावरी !

सौगंधिक उच्छ्वास सोडिती प्राजक्ताच्या कळ्या,
लाजत लाजत हळुच उघडितां निज नाजुक पाकळ्या

*त्या उच्छ्वासां पिउनि बिजेचा चांद हर्षनिर्भरी*
*होउनियां बेभान नाचतो निळावंतीच्या घरीं!*

*धुंद सिंधुला मारवेलिची मर्यादा घालुन*
*उभी सैकतीं कोंकणदेवी राखित तळकोंकण;*

*निकट माजलीं निवडुंगांची बेटें कंटकमय,*
*आश्रय ज्यांचा करुनि नांदती कोचिंदे निर्भय,*

*मागें त्याच्या डुले नारळी पोफळिचे आगर,*
*पुढें विराजे निळावंतिचें निळेंच जळमंदिर.*

*राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित ऐसें नंदनवन*
*सह्याद्रीच्या तळीं शोभतें हिरवें तळकोंकण*

**- माधव**

# नलराजा आणि हंस

[शार्दुलविक्रीडित]
पुण्य-श्लोक नृपावळींत पहिला होवोनी जो राहिला
जो राजा असतां समस्त महिला विश्रांती शेषाहिला
व्यासोक्ते अवगाहिला बुधजनी नाना-गुणी गायिला
जो नामें नळ तत्कथौघ लिहिला तो पाहिजे पहिला॥१॥

[दिंडी]
कथा बोलूं हे मधुर सुधा-धारा
होय शृंगारा करुण रसा थारा
निषध-राजा नळ-नामधेय होता
वीरसेनाचा तनय महा-होता ॥ २ ॥

[वसंततिलका]
चंद्रासि लागति कळा उप-राग येतो
गंगेसि भंग बहु पाण-उतार होतो
जें होय चूर्ण तरि मौक्तिक तें कशाला
नाही समान नळ-राज-महा-यशाला ॥ ३ ॥

[शिखरिणी]
कदा नेणों वोढी शरधिंतुनि काढी शर कदा
कदा धन्वीं जोडी वरि वरिही सोडी तरि कदा
वि-पक्षाच्या वक्षावरि विवर-लक्षास्तव रणीं
कळे राजेंद्राची त्वरित शर-संधान-करणी ॥४॥

[शार्दुलविक्रीडित]
जो धैर्ये धर-सा सहस्त्रकर-सा तेजें तमा दूर-सा
जो रत्नाकर-सा-गभीर, शिरसा भूपां यशोहार-सा
ज्ञाता जो सरसावला, नव-रसांमाझारि शृंगार-सा
शोभे तामरसाक्ष तो नळ रसा-नाथ स्तवूं फारसा॥५॥

[माल्यभारा]
नळ-राज-कथा सुधाचि साजे
दमयंती वर-वर्णिनी विराजे
मिळणी उभयांसि होय जेथें
अधिकारी अधिकानुराग तेथें ॥ ६ ॥

*[वसंततिलका]*
*गंगा-तरंग-सम जो निज देहवर्णी*
*भृंगापरी रुचिर कांति जयाशी कर्णी*
*जंघाल जो पवन-सं-गतिची सवे घे*
*शृंगारिला हय तयावरि भूप वेंघे ॥ ७ ॥*

*जो अंबरी उफळतां खुर लागलाहे*
*तो चंद्रमा निज तनूवरि डाग लाहे*
*जो या यशास्तव कसे धवलत्व ने घे*
*शृंगारिला हय तयावरि भूप वेंघे ॥ ८ ॥*

*[दिंडी]*
*सवें सेना भूपाळ निघालाहे*
*शींव लंघी उद्यान एक पाहे*
*रिघे तेथे मित सेवकांसि बाहे*
*फौज सारी बाहेर उभी राहे ॥ ९ ॥*

*पनस जंबू जंबीर विविध निंबे*
*कुंद चंदन माकंद सुदाडिंबे*
*तुंग नारिंगें विकसली कदंबें*
*वसति तेथें शुक-सारिका-कदंबें ॥ १० ॥*

*[वंशस्थ]*
*लते-तळी रुंद निरुंद कालवे*
*गळोनि तेथें मकरंद कालवे*
*परागही सांद्र तयांत रंगती*
*फुलांसवे भृंग-तती तरंगती ॥ ११ ॥*

*[आर्या]*
*उपरि स-कंटक साचे परंतु सांचे जयांत सुरसाचे*
*घोंस असे फणसांचे षण्मासांचे कितेक वरसाचे ॥१२ ॥*

(उपेंद्रवज्रा)
तया वनी एक तटाक तोये
तुडुंबले, तामरसानपाये
निरंतरामंद मरंद वाहे
तपांतही यास्तव रिक्त नोहे ॥ १३ ॥

(द्रुतविलंबित)
अमृतही पयही म्हणवितसे
उभय होय तसी रुचि वितसें
मधुर सारस तें जल गा तसें
मधुर सारस यास्तव गातसे ॥ १४ ॥

(वसंततिलका)
पीतां मरंद उदरंभर बंभराचें
जें होय मंदिरही सुंदर इंदिरेचें
जें पद्म तेथिल सहस्त्र-दळा धरी तें
प्रत्यक्ष सूर्यकिरणांस विसाववीतें ॥ १५ ॥

(दिंडी)
तया कासारी राजहंस पाहे
राजहंसाचा कळप पोह्ताहे
तयासाठी हे वापिकाच पोहे
नळे केली हें कोण म्हणे नोहे ॥ १६ ॥

तया हंसांचे देह कांचनाचे
पक्ष झळकती वीज जशी नाचे
रंग माणिकसे चंचुचे पदांचे
जसे अधरीचे भीम-कन्यकेचे ॥ १७ ॥

(वसंततिलका)
त्यांतील एक कलहंस तटीं निजेला
जो भागला जल-विहार विशेष केला
पोटींच एक पद, लांबविला दुजा तो
पक्षीं तनू लपवी भूप तया पहातो ॥ १८ ॥

टाकी उपानह पदें अति--मंद ठेवी
केली विजार वरि डौरहि, मौंन सेवी
हस्ती करी वलय उंच अशा उपायीं
भूपें हळूच धरिला कलहंस पायीं ॥ १९ ॥

(मालिनी)
कलकल कलहंसे फार केला सुटाया
फडफड निजपक्षीं दाविलें कीं उडाया
नृपतिस मणि--बंधी टोंचिंता होय चंचू
धरी सुदृढ़ ज्या तो काय सोडील पंचू ॥ २० ॥

तदितर खग भेणें वेगळाले पळाले
उपवन-जल केली जे कराया मिळाले
स्वजन गवसला जो त्याजपाशीं नसे तो
कठिन समय येतां कोण कामास येतो ॥ २१ ॥

साहित्य प्रतिष्ठान ®

[दिंडी]
न सोडी हा नळ भूमि-पाळ माते
असें जाणोनी हंस वदे त्यातें
"हंस-हिंसा नच घडो तुझ्या हातें,
सोड, राया, जाईन स्व-स्थळातें ॥ २२ ॥

"जागजागीं आहेत वीर कोटी
भले झुंजारहि शक्ति जयां मोठी,
तयां माराया धैर्य धरी पोटी;
पांखरू हे मारणे बुद्धि खोटी ! ॥ २३ ॥

"वधुनी माझी हे कनक-रूप काया,
कटकमुकुटादिक भूषणे कराया
कशी आशा उपजली तुला राया?
काय नाही तुजला दया माया ? ॥ २४ ॥

(शार्दुलविक्रीडित)
"म्हातारी उडतां नयेचि तिजला माता मदीया अशी;
कांता काय वदो? नवप्रसव ते सातां दिसांची तशी;
पाता त्या उभयांस मी; मज विधी घातास योजितसे!
हातामाजि नृपा तुझ्या गवसलों, आतां करावे कसे? ॥२५॥

[पद]
"हरहर सांपडलों, सापडलों ! कैसा फांशी पडलों
इतर नदी जल-टांकी, टाकुनि आलों याच तटाकीं
सोडुनि मानस-केली, कापुनि घ्याया आलों शेली
ठेविन तव पदीं माथा, आतां सोडविं मज रघुनाथा॥२६॥

[मालिनी]
"सदय हृदय याचे, भूप हा ताप-हारी,
म्हणुनि परिसतां मी होय एथे विहारी;
मजहि वध कराया पातकी पातला जो,
वरूनि पति असा ही भूमि कैशी न लाजो?"॥२७॥

[वसंततिलका]
एणेपरी परिसतां अति-दीन वाचा,
हेलावला नळ पयोधि दया-रसाचा;
सोडी, म्हणे, "विहर जा अथवा फिराया
राहें यथा-निज मनोरथ हंस-राया ॥ २८ ॥

[मालिनी]
सुटुनि खग पळाला, बैसला शाल-शाखे,
क्षणभरि निज देही मुक्ति-विश्रांति चाखे;
स्व-जन तव तयाचे भोंवताली मिळाले,
कवळिती निज-बंधू, बाष्प-बिंदू गळाले ॥ २९ ॥

[शिखरिणी]
विसांवा घे कांही, उडुनि लवलाही परतला,
नृपाळाच्या स्कंधी बसुनि मणिबंधी उतरला
म्हणे हंस, क्षोणी-पतिस, "तुज कोणी सम नसे,
दयेचा हा ठेवा तुजजवळीं देवा, वसतसे. ॥ ३० ॥

[दिंडी]
"ऐक राया, तूं थोर दया-सिंधू,
नीति-सागरही, तूंचि दीन-बंधू;
निखंदोनी बोलिलो नको निंदू,
सकल वदसी जरि पाय तुझे वंदू ॥ ३१ ॥

"पारधीमाजी खगा मृगा राजे
करिति हिंसा जी तीच बरी साजे
तुवां दिधली मज मोकळीक, बा जे
दया केली ही कीर्ति तुझी गाजे ॥ ३२ ॥

"हंस मिळणे हें कठिण मही-लोकी,
सोनियाचा तो नवल हें विलोकी;
तशा मजलाही सोडिले तुवां कीं,
तुझा ऐसा उपकार मी न झांकीं ॥ ३३ ॥

"किति रावे असतील तुझ्या धामी,
किति कोकिलही, सारिका, तसा मी.
चित्त लागियले तूझिया लगामीं,
नृपा, योजी मज आपुलिया कामीं ॥ ३४ ॥

"तुझा करपंजर होय मला थारा
तुझ्यां वचनांचा ओघ दुग्धधारा
तुझे मानस बहु थोर गा उदारा
सत्य लोकेशहि तूंचि गुणागारा ॥ ३५ ॥

[वसंततिलका]
"हें पांखरूं मजसि येइल काय कामा,
ऐसे, नृपा, न वद, पूरित-लोककामा;
मोले उणे व्यजन ते धरितां पुढारीं
छाया करी, तपन-दीप्तिसही निवारी !" ॥ ३६ ॥

- रघुनाथ पंडित

# झुक झुक झुक झुक अगीनगाडी

झुक झुक झुक झुक अगीनगाडी
धुरांच्या रेघा हवेत काढी
पळती झाडे पाहूया,
मामाच्या गावाला जाऊया

मामाचा गाव मोठा
सोन्याचांदीच्या पेठा
शोभा पाहुनी घेऊया

मामाची बायको गोरटी
म्हणेल कुठली पोरटी
भाच्यांची नावे सांगूया

मामाची बायको सुगरण
रोज रोज पोळी शिकरण
गुलाबजामुन खाऊया

मामा मोठा तालेवार
रेशीम घेईल हजार वार
कोट विजारी लेऊया

- ग. दि. माडगूळकर

# आई म्हणोनी कोणी

आई ! म्हणोनि कोणी, आईस हांक मारी
ती हांक येई कानी, मज होय शोककारी
नोहेच हांक, माते, मारी कुणी कुठारी
आई कुणा म्हणू मी? आई घरी न दारीं !
ही न्यूनता सुखाची, चित्ता सदा विदारी
स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी. ॥ १ ॥

चारा मुखी पिलांच्या, चिमणी हळूच देई
गोठ्यांत वासरांना, ह्या चाटतात गाई
वात्सल्य हे पशूंचे, मी रोज रोज पाहीं
पाहून अंतरात्मा, व्याकूळ हाय होई
वात्सल्य माउलीचे, आम्हां जगांत नाही
दुर्भाग्य याविना का? आम्हांस नाहीं आई. ॥ २ ॥

शाळेतुनी घराला, येतां धरील पोटीं
काढून ठेविलेला, घालील घास ओठीं
उष्ट्या तशा मुखाच्या, धांवेल चुंबना ती
कोणी तुझ्याविना गे, का ह्या करील गोष्टी?
तूझ्याविना न कोणी, लावील सांजवाती
सांगेल ना म्हणाया, आम्हां 'शुभं करोति' ॥ ३ ॥

ताईस या कशाची, जाणीव काहीं नाहीं
त्या सान बालिकेला, समजे न यांत कांहीं
पाणी तरारतांना, नेत्रांत, बावरे ही
ऐकूनी घे परंतू, "आम्हांस नाही आई"
सांगे तसे मुलींना, "आम्हांस नाही आई"
ते बोल येति कानीं, "आम्हांस नाही आई" ॥ ४ ॥

आई! तुझ्याच ठायीं, सामर्थ्य नंदिनीचें
माहेर मंगलाचे, अद्वैत तापसांचें
गांभीर्य सागराचे, औदार्य या धरेचें
नेत्रांत तेज नाचे, त्या शांत चंद्रीकेचें
वात्सल्य गाढ पोटी, त्या मेघमंडळाचें
वात्सल्य या गुणांचे, आई, तुझ्यांत साचे ॥ ५ ॥

गुंफुनी पूर्वजांच्या, मी गाईलें गुणांना
सार्या सभाजनांनीं, या वानिले कृतीला

साहित्य प्रतिष्ठान®

*आई! करावया तूं, नाहीस कौतुकाला*
*या न्यूनतेमुळे ही, मज त्याज्य पुष्पमाळा*
*पंचारती जनांची, ना तोषवी मनाला*
*परी जीव बालकाचा, तव कौतुका भुकेला ॥ ६ ॥*

*येशील तूं घराला, परतून केधवां गे ?*
*दवडूं नको घडीला, ये ये निघून वेगें*
*हे गुंतले जिवाचे, पायी तुझ्याच धागे*
*कर्तव्य माउलीचे, करण्यास येइं वेगें*
*रुसणार मी न आतां, जरि बोलशील रागें*
*ये रागवावयाही, परी येइं येइं वेगें ॥ ७ ॥*

- यशवंत

# असाच

वेगळीच जात तुझी;
वेगळाच ताल
तूं अफाट वाट तुझी
एकटाच चाल.

एकटाच चालत जा
दूर दूर दूर
गात गात तूंच तुझा
एकटाच सूर

एकटाच चालत जा
उंच आणि खोल;
बोल आणि ऐक पुन्हा
तूं तुझाच बोल.

तूं असाच झिंगत जा
विस्मरून पीळ
तूं असाच फुंकीत जा
अर्थशून्य शीळ

अंतरात पाहत जा
भास तूं तुझेच;
शांततेत ऐकत जा
श्वास तूं तुझेच.

खोल या दरीत अशा
गर्द साऊलीत
हो निमग्न तूंच तुझ्या
मंद चाहुलीत.

--ना. घ. देशपांडे

# सांगा कसं जगायचं?

सांगा कस जगायचं?
कण्हत कण्हत की गाणं म्हणत
तुम्हीच ठरवा!

डोळे भरुन तुमची आठवण
कोणीतरी काढतंच ना?
ऊन ऊन दोन घास
तुमच्यासाठी वाढतंच ना?
शाप देत बसायचं की दुवा देत हसायचं
तुम्हीच ठरवा!

काळ्याकुट्ट काळोखात
जेव्हा काही दिसत नसतं
तुमच्यासाठी कोणीतरी
दिवा घेऊन उभं असतं
काळोखात कुढायचं की प्रकाशात उडायचं
तुम्हीच ठरवा!

पायात काटे रुतुन बसतात
हे अगदी खरं असतं;
आणि फुलं फुलून येतात
हे काय खरं नसतं?
काट्यांसारखं सलायचं की फुलांसारखं फुलायचं
तुम्हीच ठरवा!

पेला अर्धा सरला आहे
असं सुद्धा म्हणता येतं
पेला अर्धा भरला आहे
असं सुद्धा म्हणता येतं
सरला आहे म्हणायचं की भरला आहे म्हणायचं
तुम्हीचं ठरवा!

सांगा कस जगायचं?
कण्ह्त कण्ह्त की गाणं म्हणत
तुम्हीचं ठरवा!

## - मंगेश पाडगांवकर

*ही कविता बालभारतीमधली आहे का?*
*असं सुद्धा विचारता येतं*
*ही बालभारतीमधली कविता नाही का?*
*असं सुद्धा विचारता येतं*

*होती म्हणायचं, कि नाही म्हणायचं,*
*काय करायचं तुम्हीच ठरवा!!*

# जयोऽस्तुते

जयोऽस्तुते श्री महन्मंगले शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवती, त्वामहं यशोयुतां वंदे ॥धृ॥

राष्ट्राचे चैतन्य मूर्त तू नीति संपदांची
स्वतंत्रते भगवती, श्रीमती राज्ञी तू त्यांची
परवशतेच्या नभात तूची आकाशी होशी
स्वतंत्रते भगवती, चांदणी चमचम लखलखशी

गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गालीं
स्वतंत्रते भगवती, तूच जी विलसतसे लाली
तू सूर्याचे तेज, उदधिचे गांभिर्यही तूची
स्वतंत्रते भगवती, अन्यथा ग्रहण नष्ट तेची

मोक्षमुक्ति ही तुझीच रूपे तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती, योगिजन परब्रह्म वदती
जे जे उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर ते ते
स्वतंत्रते भगवती, सर्व तव सहचारी होते

हे अधम रक्तरंजिते, सुजन पुजिते,
श्री स्वतंत्रते ! श्री स्वतंत्रते! श्री स्वतंत्रते!
तुजसाठी मरण ते जनन
तुजवीण जनन ते मरण
तुज सकल चराचर शरण
भरतभूमिला दृढालिंगना कधी देशील वरदे ॥१॥

हिमालयाच्या हिमसौधाचा लोभ शंकराला
क्रीडा तिथे करण्याचा का तुला वीट आला
होय आरसा अप्सरांना सरसें करण्याला
सुधाधवल जान्हवीस्त्रोत तो का गे त्वां त्याजिला
स्वतंत्रते, या सुवर्णभूमित कमती काय तुला
कोहिनूरचे पुष्प रोज घे ताजे वेणीला

ही सकल श्री संयुता, अमुची माता, भारती असता
का तुवा ढकलुनी दिधली
पूर्वीची ममता सरली
परक्याची दासी झाली
जीव तळमळे, का तू त्याजिले उत्तर याचे दे
स्वतंत्रते भगवती, त्वामहं यशोयुतां वंदे ॥२॥

- स्वा. विनायक दामोदर सावरकर

साहित्य प्रतिष्ठान ®

# हरिणान्योक्ति

*[शार्दूलविक्रिडित]*

*जाळे तोडुनियां बळें हरिण तो टाळोनि दावाग्निला,*

*व्याधाचे चुकवूनि बाणहि महावेगें पुढें चालिला,*

*तों घाईंत उडी फसूनि पडला आडामधें बापडा;*

*होती सर्वहि यत्न निष्फ़ळ, जरी होई विधी वांकडा.*

**- कृष्णशास्त्री चिपळूणकर**

# नीतीशतकांतील वेंचे :१

*भर्तृहरीच्या "शृंगार", "नीति", आणि "वैराग्य" या तीन्ही मूळ संस्कृत शतकांचे वामन पंडितांनी मराठी अनुवाद केलेत; पण पाठ्यपुस्तकांमध्ये नीतिशतकातलेच श्लोक निवडून दिले जातात. त्यापैकी काही निवडक श्लोक इथे चार भागांत विभागून दिले जातील.*

[वसंततिलका]
कीं तोडिला तरु फुटे अणखीं भरानें
तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें
जाणोनि हे सुजन ज्या दुबळीक आली
त्याशीं कधीं न करिती सहसा टवाळी !! १ !!

**[शार्दूलविक्रीडित]**
शाणोल्लेख जया असा मणि, रणि जो वीर घायाळला
सांभोगें शिणली अशी नववधू, हस्ती न मस्तावला
ज्यांची स्वच्छ शरदृतूंत पुलिने त्या निम्नगा, चंद्रही
विजेची, प्रभु पात्रदत्तधन जो— हे शोभती सर्वही ॥२ ॥

**[उपजाति]**
तृणें मृगाला सोलिलें झषाला
संतोष हे वृत्ति महाजनाला
तयांस निष्कारण सिद्ध वैरी
किरात-कैवर्तक-दुष्ट भारी ॥ ३ ॥

**[शिखरिणी]**
महिपृष्ठी केव्हां अवचट पलंगी पहुडलो
क्षुधेतें शाकान्ने अवचट सदन्ने निवटितो
कधीं कंथाधारी अवचट सुवस्त्री मिरवितो
मनस्वी कार्यार्थी किमपि सुखदुःखे न गणितो॥४॥

**[शार्दूलविक्रीडित]**
लज्जेने जड, दांभिक व्रतिपणे, कापट्य शौचें गणी
शौर्ये निर्दय, आर्जवें लुडबुड्या, कीं दीन सद्भाषणीं
मानेच्छा तरि मूर्ख, कीं बडबड्या वक्ता, निकामी भला
ऐसा तो गुण कोणता खल-जनी नाहीच जो निंदिला ? ॥५ ॥

***[वसंततिलका]***

*मी जीस चिंतित असें न रुचें तिला मी*
*माने तिला अपर तो नर अन्यगामी*
*संतुष्ट मद्धिषयिं आन वधूच पाहीं*
*धिक तीस, त्यास, मदनास, इला, मलाही ॥ ६ ॥*

***[द्रुतविलंबित]***

*दुबळिकेंत पसा यव इच्छितो*
*प्रभुपणीं धरणी तृण मानितो*
*म्हणुनियां कृपणत्व उदारता*
*घडतसे समयोचित तत्वतां ॥ ७ ॥*

*[शार्दूलविक्रीडित]*

*तोयाचें परि नांवही न उरतें संतप्त लोहावरी,*
*ते भासे नलिनीदलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी,*
*तें स्वातीस्तव अब्धिशुक्तिपुटकीं मोतीं घडे नेटकें,*
*जाणा उत्तममध्यमाधम दशा संसर्गयोगें टिके !!८!!*

वामन पंडित

# शूर आम्ही सरदार

शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती,
देव,देश अन् धर्मापायी प्राण घेतलं हाती||

आईच्या गर्भात उमगली झुंजाराची रीत,
तलवरीशी लगीन लागलं, जडली वेडी प्रीत,
लाख संकट झेलून घेईल अशी पहाडी छाती||
देव देश अन धर्मापायी..

जिंकावे वा कटून मरावं हेच आम्हाला ठावं,
लढून मरावं मरून जगावं हेच आम्हाला ठावं,
देशासाठी सारी विसरू माया-ममता-नाती||
देव देश अन धर्मापायी..

---शांता शेळके

# झाडाखाली बघुनी सावली

झाडाखाली बघुनी सावली बसतो चांभार
ठावुक आहे मजला याचा सर्व कारभार

आरी घेवून देई शिवुनी जोड़े तुटलेले
टाच सांधणे नाल ठोकणे सर्वकाळ चाले

रापी याची लखलख करते चराचरा चाले
धुर विडीचा मधून केंव्हा खुशालित बोले

पोचे येवून जुने जाहले डबडे पाण्याचे
तेच परंतु सोबत करते प्रामाणिक साचे

धंदा याचा पायतणाचा परंतु जन्मात
नवे पायतण कधी न घातले याने पायात

--अज्ञात

# भय इथले संपत नाही...

भय इथले संपत नाही...मज तुझी आठवण येते...
मी संध्याकाळी गातो...तू मला शिकविली गीते...

हे झरे चंद्रसजणांचे, ही धरती भगवी माया
झाडांशी निजलो आपण, झाडांत पुन्हा उगवाया

त्या वेली नाजूक भोळ्या, वाऱ्याला हसवून पळती
क्षितीजांचे तोरण घेऊन, दारावर आली भरती

तो बोल मंद हळवासा आयुष्य स्पर्शुनी गेला
सीतेच्या वनवासातील जणू अंगी राघव शेला

देऊळ पलिकडे तरीही, तुज ओंजळ फुटला खांब
थरथरत्या बुबूळांपाशी, मी उरलासुरला थेंब

संध्येतील कमळफुलासम, मी नटलो श्रृंगाराने
देहाच्या भवती रिंगण, घालती निळाईत राने

स्त्रोत्रात इंद्रिये अवघी, गुणगुणती दु:ख कुणाचे
हे सरता संपत नाही, चांदणे तुझ्या स्मरणाचे

ते धुके अवेळी होते, की परतायाची घाई
मेंदुतून ढळली माझ्या, निष्पर्ण तरुंची राई

**--ग्रेस**

# गवताचं पातं

गवताचं पातं वाऱ्यावर डोलतं
डोलताना म्हणतं खेळायला चला //ध्रु//

झऱ्यातलं पाणी खळा खळा हसतं
हसताना म्हणतं खेळायला चला
निळं निळं पाखरू आंब्यावर गातं
गाताना म्हणतं नाचायला चला //१//

झिम्माड पावसात गारांची बरसात
बरसात म्हणते वेचायला चला
छोटासा मोती लपाछपी खेळतो
धावताना म्हणतो शिवायाला चला //२//

मनिच पिल्लू पायाशी लोळतं
लोळताना म्हणतं जेवायला चला
अहो,जेवायला चला
तुम्ही जेवायला चला //३//

-कुसुमाग्रज

# जीर्ण पाचोळा

*आडवाटेला दूर एक माळ*
*तरु त्यावरती एकला विशाळ*
*आणि त्याच्या बिलगूनिया पदास*
*जीर्ण पाचोळा पडे तो उदास*

*उषा येवो शिंपित जीवनाशी*
*निशा काळोखी दडवू द्या जगासी*
*सूर्य गगनातुनी ओतू द्या निखारा*
*मूक सारे हे साहतो बिचारा*

*तरूवरची हसतात त्यास पाने*
*हसे मूठभर ते गवतही मजेने*
*वाटसरू वाट तुडवीत त्यास जात*
*परी पाचोळा दिसे नित्य शांत*

*आणि अंती दिन एक त्या वनांत*
*येई धावत चौफेर क्षुब्ध वात*
*दिसे पाचोळा घेरूनी तयाते*
*नेई उडवुनि त्या दूर दूर कोठे*

*आणि जागा हो मोकळी तळाशी*
*पुन्हा पडल्या वरतून पर्ण राशी*

\- कुसुमाग्रज

साहित्य प्रतिष्ठान ®

# हिरकणी

गोपनारी हिरकणी गडा गेली
दूध घालाया परत झणी निघाली
पायथ्याशी ते वसे तीचे गाव
घरी जाया मन घेई पार धाव//ध्रु//

शिवप्रभुंचा निर्बंध एक होता
तोफ व्हावी अस्तास सूर्य जाता
सर्व दरवाजे अचूक बंद व्हावे
कुठे कोणा जाऊ-न-येऊ द्यावे//१//

सर्व दरवाजे फिरून परत आली
तिला भेटे ना तेथ कुणी वाली
कोण पाजील तरी तान्हुल्यास आता
विचारे या बहुदुःख होय चित्ता//२//

मार्ग सुचला आनंद फार झाला
निघे वेगे मग घरी जावयाला
नसे रक्षक ठेविला जेथ ऐसा
तेथ होता पथ रायगादी खासा//३//

गडा तुटलेला कडा उंच नीट
घरी जाया उतरली पायवाट
पाय चुकता नेमका मृत्यु येई
परी माता ती तेथुनीच जाई//४//

उतरू लागे मन घरी वेधलेले
शुद्ध नाही जरी तनुस लागलेले
अंग खरचटले वस्त्र फ़ाटलेले
अशा वेषे ती घरा प्रति चाले//५//

वृत्त घडले शिवभूप कर्णि जाता
वदे आनंदे धन्य धन्य माता
कड्यावरती त्या बुरुज बांधियेला
नाव दिधले हिरकणी बुरुज त्याला//६//

--अज्ञात

# फुलपांखरे

धरूं नका ही बरे,
फुलांवर उडती फुलपांखरे ॥ धृ.॥

काल पाकळ्या रात्री निजल्या
सकाळ होतां सगळ्या उठल्या
आणि त्याच का उडूं लागल्या
पंख फुटुन गोजिरे,
फुलांवर उडती फुलपांखरे ॥ १ ॥

मजेमजेचे रंग तयांचे
संध्याकाळी जसे ढगांचे
ऊन कोवळे त्यांवर नाचे
सकाळचे हांसरे,
फुलांवर उडती फुलपांखरे ॥ २ ॥

फुलाफुलाशीं हांसत खेळत
फिरती भवती पिंगा घालित
बघा दुरूनच त्यांची गंमत
दृश्य मनोहर खरे,
फुलांवर उडती फुलपांखरे ॥ ३ ॥

हात लावतां पंख फाटतिल
दोरा बांधुन पायहि तुटतिल
घरी कशी मग सांगा जातिल ?
दूर तयांची घरे,
फुलांवर उडती फुलपांखरे ॥ ४ ॥

उगाच धरितां त्यांस कशाला ?
अपाय करितां मुक्या जिवाला
आवडेल का हे देवाला ?
हिं देवाची मुलें,
फुलांवर उडती फुलपांखरे ॥ ५ ॥

-अ. ज्ञा. पुराणिक

# आईपणाची भीती

आजच्या इतकी आईपणाची भीती कधीच वाटली नव्हती
अगतिकतेची असली खंत मनात कधीच दाटली नव्हती.

विचारलेस आज मला"आई कोणती वाट धरू?"
गोळा झाले कंठी प्राण आणि डोळे लागले झरू.

कोणती दिशा दाखवू मी तुला? पूर्व? पश्चिम्? दक्षिण? उत्तर?
माझ्यासारख्याच भीतीने या चारी दिशा झाल्या फ़त्तर.

कोठे ज्ञान, यश, सुख? काय त्यांच्या खाणाखुणा?
या-त्या रुपात दिसतो सैतानच वावरताना.

जळी, स्थळी, आकाशीही अणूबॉम्ब झाकला आहे
प्रत्येक रस्ता माणसाच्या रक्ताने रे माखला आहे.

आज आईच्या कुशीत सुद्धा उरला नाही बाळ निवारा
द्रौणीच्या अस्त्रासारखा हिरोशिमाचा बाधेल वारा.

कोठेतरी गेलेच पाहिजे गतीचीही आहेच सक्ती
जायचे कसे त्याची मात्र कुणीच सांगत नाही युक्ती.

खचू नको, शोध बाळा तुझा तूच ज्ञानमार्ग
कोणतीही दिशा घे पण माणुसकीला जाग.

धीर धर, उचल पाय, आता मात्र कर घाई
आणखी एक लक्षात ठेव प्रत्येकालाच असते आई.

- पद्मा गोळे

# मामाची गाडी

माझ्या मामाची रंगीत गाडी हो
तिला खिल्लाऱ्या बैलांची जोडी हो

कशी दौडत दौडत येई हो
मला आजोळी घेऊन जाई हो
नाही बिकट घाट,
सारी सपाट वाट,
मऊ गालीचे ठायी ठायी हो

शीळ घालून मंजूळ वाणी हो
पाजी बैलांना ओहोळ पाणी हो
गळा खुळखुळ घुंगुर माळा हो
गाई किलबील विहंग मेळा हो
बाजरीच्या शेतात,
करी सळसळ वात,
कशी घुमली अंबेराई हो

कोण कानोसा घेऊन पाही हो
कोण लगबग धावून येई हो
गहिवरून धरून पोटी हो
माझे आजोबा चुंबन घेती हो
लेक एकुलती,
नातू एकुलता,
किती कौतुक कौतुक होई हो

- ग. ह. पाटील

# आला क्षण!

गडबड घाई जगांत चाले,
आळस डुलक्या देतो; पण
गंभीरपणे घड्याळ बोले-
'आला क्षण-गेला क्षण!'

घड्याळास या घाई नाही,
विसावाही तो नाही; पण
त्याचे म्हणणे ध्यानी घेई-
'आला क्षण-गेला क्षण!'

कर्तव्या जे तत्पर त्यांचे
दृढ नियमीत व्हावयास मन,
घड्याळ बोले अपुल्या वाचे-
'आला क्षण-गेला क्षण!'

कर्तव्याला विमुख आळशी
त्यांच्या हृदयी हाणित घण,
काळ-ऐक! गातो अपुल्याशी-
'आला क्षण-गेला क्षण!'

लवाजम्याचे हत्ती झुलती
लक्ष त्यांकडे देतो कोण,
मित रव जर हे सावध करिती-
'आला क्षण-गेला क्षण!'

कवी - केशवसुत

# आमची मांजरी

[शार्दूलविक्रीडित]

शोभे वर्तुल तोंड गोंडस जिचें, नासाप्रभा तांबडी
डोळे नीलविलोल गोल दिसती प्रत्यक्ष पाचू खडी;
जीचे छान लहान कान गमती गोकर्णिकेचीं फुलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें !!१!!

भाटी हे, परि नीट लंब फुटती ओठीं मिशा पांढऱ्या;
अंगी लोंकर फार ती मृदु उशी ही सांवरीची खऱ्या,
कोटें लाल, मधून शुभ्र ठिपके देहीं जिच्या शोभले,
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें !!२!!

वाटे शेंपुट लंब फार मृदुसें रेशीम-गोफापरी;
रागानें परि त्यास जी फुगवितां येते ब्रशाची सरी,
जातां धांवतही कधींहि न जिचीं तीं वाजती पावलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें !!३!!

पंजे शुभ्र जिचे असून वरतीं काळीं नखे भासती
जेवीं पूर्ण-शशांक-बिंबि दिसती ते डाग रम्याकृती,
पट्टा चंदन-शुभ्र गंध जणुं हे भाळीं असे रेखिले
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें!!४!!

आणी दूध जधीं सकाळिं गवळी, येई तधीं धावुनी,
त्याचे भोंवती नाचुनी शिरुनियां पायीं तनू घासुनी
'म्यां म्यां' ओरडुनी सुखें पय पिई जें भूवरी सांडलें
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें !!५!!

येतां अंबररत्नबिंब उदया जाऊन कौलांवरी,
घेवोनी नवमित्ररश्मि अपुल्या देहीं, सुखातें वरी,
तेथें निर्मल सर्व अंग करिते जी चाटुनी आपुलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें !!६!!

नेमें साधुनि भोजनावसर जी बैसोनि पानापुढे
राही स्वस्थ भली उगाच न पळे पंक्तींत चोहोंकडे,
घालूं भूवर भात खात तितका, चित्राहुती ना गिळे
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें !!७!!

खोडी एक परंतु होय तिजला, सोडी न तीतें जरा,
नाहीं तूप, न भात खात अगदीं कांहिंहि तुम्ही करा;
हुंगोनी नुसतेंच अन्न बसती राही उपाशी, बळें
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें !!८!!

होतां भोजन अंगणीं मग तनू टाकूनियां आडवी
डोळे झांकुन, शांत निश्र्चल मनें चारी पदां लांबवी
साधूनी स्वसमाधि साधुस असे मागें जिनें टाकिलें
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें !!९!!

ऐशी घेउनियां जरा सुखकरा जी नित्य विश्रांतिला
डोळ्यांतें उघडी, पदांस अखडी, सोडीच भूमीतला
देई जांभइ जी उठूनि तनुला देवोनि आळेपिळे
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें!!१०!!

पाहोनी मग अंगणांत चिमणी घाली झणीं झांपडी
जातां ती उडुनी हताश बनुनी बैसे धरोनी दडी
लावी निश्र्चल अंगणीं टक, जिचें क्रोधें मन क्षोभलें
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें !!११!!

येंता ती चिमणी पुन्हां उचलुनी जी मागले पाय ते
घेई भार पदीं पुढील, सहसा वेगें उडी मारते,
जातां भक्ष्य परी भरारुनि, जिचें हो तोंड ओशाळलें
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें!!१२!!

केव्हा पुच्छ धरी पुढील चरणीं चावी स्वदंतांकुरें
येतांची कळ तें त्यजी गरगरां नाचे, स्फुरे, गुर्गुरे;
भूमीते खरडी स्वकीय नखरीं मध्येंच जोरें पळे,
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें!!१३!!

राहेना पळही कधीं चपळ जी एके स्थळीं सुस्थिर,
धांवे धूम, उडे, मधेंच उसळे; धुंडीत सारें घर,
चाळे दाखविते अनेक, धरिती पाठीस जेव्हां मुलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें!!१४!!

कांहीं खुड्खुड्लें, तरी धडपडे, नाचे पडे बागडे,
कोठें आड दडे, मधें वर उडे, घे धांव चोहोंकडे,
जी झाडावर वेंधतां खग-कुळें होती भय-व्याकुळें;
ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें!!१५!!

*रात्रीं जी न मनी जुमानित तमा धैर्यें फिरे मंदिरीं,*
*टेहाळी करि, संधि साधुनि उडी टाकावया उंदिरीं;*
*या कृत्यें ज्वर-राज-मानसिं जणूं शल्यापरी जी सले !*
*ऐशी सुंदर मांजरी बघुनिया मच्चित्त हें लोभलें!!१६!!*

बाळकृष्ण अनंत भिडे

साहित्य प्रतिष्ठान ®

# माझ्या गोव्याच्या भूमीत

माझ्या गोव्याच्या भूमीत
गड्या नारळ मधाचे,
कड्या-कपाऱ्यां मधुन
घट फ़ुटती दुधाचे//

माझ्या गोव्याच्या भूमीत
आंब्या-फ़णसाची रास,
फ़ुला फळांचे पाझर
कळी फ़ुलांचे सुवास//

माझ्या गोव्याच्या भूमीत
वनश्रीची कारागिरी,
पाना-फ़ुलांची कुसर
पशु-पक्ष्यांच्या किनारी//

माझ्या गोव्याच्या भूमीत
उन्हाळ्यात खारा वारा,
पावसात दारापुढे
सोन्याचांदीच्या रे धारा//

माझ्या गोव्याच्या भूमीत
येते चांदणे माहेरा,
ओलावल्या लोचनांनी
भेटे आकाश सागरा//

माझ्या गोव्याच्या भूमीत
चाफ़ा पानाविण फ़ुले,
भोळा भाबडा शालीन
भाव शब्दाविण बोले//

माझ्या गोव्याच्या भूमीत
गडे साळीचा रे भात,
वाढी आईच्या मायेने
सोन-केवड्याचा हात//

माझ्या गोव्याच्या भूमीत
सागरात खेळे चांदी,
आतिथ्याची, अगत्याची
साऱ्या षडरसांची नांदी//

\- बा. भ. बोरकर

# माझा गाव

निळ्या खाडीच्या काठाला
माझा हिरवाच गाव.
जगात मी मिरवितो
त्याचे लावुनिया नाव !

पूल ओलांडिता पुढे
रस्ता येईल तांबडा.
घरी आणील सरळ
जरी दिसला वाकडा.

माणसांच्या जागीसाठी
दाटी करितात माड.
गर्द मधेच एखादे
आंब्या फणसाचे झाड.

असो झाडी किंवा वाडी
सुने नाही वाटायचे.
नादी आपुल्याच कोणी
तेथे गात असायचे.

थोडया पायवाटा हिंडा
लालतांबडया वाकडया.
होडया उपडया झालेल्या
तशा बघाल टेकडया.

जेथे होईल माध्यान्ह
तेथे पान वाढलेले.
काळोखात कुणीतरी
ज्योत घेउन आलेले.

गोव्यातला माझा गाव
असा ओव्यांतच गावा.
तेथे जावून राहून
डोळे भरून पाहावा.

- बा. भ. बोरकर

# प्रेमाचा गुलकंद

बागेतुनि वा बाजारातुनि कुठुनि तरी 'त्या'ने
गुलाबपुष्पे आणुनि द्यावित 'तिज'ला नियमाने!

कशास सांगू प्रेम तयाचे तिजवरती होते?
तुम्हीच उकला बिंग यातले काय असावे ते!

गुलाब कसले? प्रेमपत्रिका लालगुलाबी त्या!
लाल अक्षरे जणु लिहिलेल्या पाठपोट नुसत्या!

प्रेमदेवता प्रसन्न होई या नैवेद्याने!
प्रेमाचे हे मार्ग गुलाबी जाणति नवतरणे!

कधी न त्याचा ती अवमानी फुलता नजराणा!
परि न सोडला तिने आपुला कधिही मुग्धपणा!

या मौनातच त्यास वाटले अर्थ असे खोल!
तोहि कशाला प्रगत करी मग मनातले बोल!

अशा तऱ्हेने मास लोटले पुरेपूर सात,
खंड न पडला कधी तयाच्या नाजुक रतिबात!

अखेर थकला! ढळली त्याचि प्रेमतपश्चर्या,
रंग दिसेना खुलावयाचा तिची शांत चर्या!

धडा मनाचा करुनि शेवटी म्हणे तिला, 'देवी!
(दुजी आणखी विशेषणे तो गोंडस तिज लावी.)

'बांधित आलो पूजा मी तुज आजवरी रोज!
तरि न उमगशी अजुनि कसे तू भक्तांचे काज?

गेंद गुलाबी मुसमुसणारे तुला अर्पिलेले
सांग तरी सुंदरी, फुकट का ते सगळे गेले?'

तोच ओरडुनि त्यास म्हणे ती, 'आळ वृथा हा की!
एकही न पाकळी दवडली तुम्ही दिल्यापैकी'

असे बोलूनी त्याच पावली आत जाय रमणी
क्षणात घेउनि ये बाहेरी कसलीशी बरणी!

म्हणे, 'पहा मी यात टाकले ते तुमचे गेंद,
आणि बनविला तुमच्यासाठी इतुका गुलकंद!

कशास डोळे असे फिरविता का आली भोंड?
बोट यातले जरा चाखुनी गोड करा तोंड!'

क्षणैक दिसले तारांगण त्या,-परि शांत झाला!
तसाच बरणी आणि घेउनी खांद्यावरि आला!!

'प्रेमापायी भरला' बोले, 'भुर्दंड न थोडा!
प्रेमलाभ नच! गुलकंद तरी कशास हा दवडा?'

याच औषधावरी पुढे तो कसातरी जगला,
हृदय थांबुनी कधीच नातरि तो असता 'खपला'!

तोंड आंबले असेल ज्यांचे प्रेमनिराशेने
'प्रेमाचा गुलकंद' तयांनी चाटुनि हा बघणे!

प्र. के. अत्रे

# थोर तुझे उपकार

थोर तुझे उपकार !!
आई, थोर तुझे उपकार !! ध्रु०!!

वदत विनोदें हांसत सोडी !!
कोण दुधाची धार !!१!!

नीज न आली तर गीत म्हणे !!
प्रेम जिचे अनिवार !!२!!

येई दुखणे तेव्हा मजला!!
कोण करी उपचार!!३!!

कोण कड़ेवर घेऊनि फिरवी!!
चित्ती लोभ अपार!!४!!

बाळक दुर्‌बळ होतों तेव्हा!!
रक्षण केले फार!!५!!

त्वांचि शिकविले वाढविले त्वां!!
आहे मजवर भार!!६!!

स्मरण तुझ्या या दृढ़ ममतेचें!!
होंते वारंवार!!७!!

नित्य करावे साह्य तुला मीं!!
हा माझा अधिकार!!८!!

भास्कर दामोदर पाळंदे.

# परमेश्वराची प्रार्थना

[श्लोक : कामदाछंद]

आस ही तुझी फार लागली!!
दे दयानिधे बुद्धि चांगली!!
देवूं तूं नको दुष्ट वासना!!
तूंच आवरीं माझिया मन!!१!!

देह देउनी तूंच रक्षिसी!!
अन्न देउनी तूंच पोशिशी!!
बुद्धि देउनी काम सांगशी!!
ज्ञान देउनी तूंच तारिशी!!२!!

वागवावया सर्व सृष्टिला!!
शक्ति बा असे एक तूजला!!
सर्वशक्ति तूं सर्वदेखना!!
कोण जाणिजे तुझिया गुणा!!३!!

नाम रूप हें तूजला नसे!!
तय तुला मुखें वर्णावे कसें!!
आदि अंत ना मध्य ही तुला!!
तूंच दाविशी मार्ग आपुला!!४!!

माणसे आम्ही सर्व लेकरें!!
माय बाप तूं हें असे खरें!!
तुझिया कृपेवीण इश्वरा!!
आसरा आम्हा नाहीं दूसरा!!५!!

तूंच आहासी आमची गती!!
देईं आमुतें उत्तमा मती!!
प्रर्थितों तुला जोडुनी करां!!
हे दयानिधे कीं कृपा करा!!६!!

--अज्ञात

# जिकडेतिकडे पाणीच पाणी

जिकडेतिकडे पाणीच पाणी
खळखळणारे झरे,
झुळझुळणारे गवत पोपटी
लवलवणारे तुरे.

नवी लकाकी झाडांवरती
सुखात पाने-फुले नाहती,
पाऊसवारा झेलित जाती
भिरभिरती पाखरे,
जिकडेतिकडे पाणीच पाणी
खळखळणारे झरे.

हासत भिजती निळसर डोंगर
उड्या त्यांतुनी घेती निर्झर,
कडेकपारी रानोरानी
नाद नाचरा भरे,
जिकडेतिकडे पाणीच पाणी
खळखळणारे झरे.

मधेच घेता वारा उसळी,
जरी ढगांची तुटे साखळी,
हिरव्या रानी ऊन बागडे
हरिणापरी गोजिरे,
जिकडेतिकडे पाणीच पाणी
खळखळणारे झरे.

- शंकर वैद्य

# आभाळाची आम्ही लेकरे

आभाळाची आम्ही लेकरे,
काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हां
धर्म वेगळा नाही

श्रमगंगेच्या तीरावरती
कष्टकऱ्यांची आमुची वसती
नाव वेगळे नाही आम्हां
गाव वेगळा नाही

इमान आम्हां एकच ठावे
घाम गाळुनी काम करावे
कर्म वेगळे नाही आम्हां
मार्ग वेगळा नाही

माणुसकीचे अभंग नाते
आम्हीच आमुचे भाग्याविधाते
पंथ वेगळा नाही आम्हां
संत वेगळा नाही

कोटि कोटि हे बळकट बाहू
जगन्नाथ-रथ ओढुन नेऊ
श्वास वेगळा नाही आम्हां
ध्यास वेगळा नाही

**- वसंत बापट**

# फुलात न्हाली पहाट ओली

*फुलात न्हाली पहाट ओली, क्षितिजावरती चंद्र झुले*
*नभात भिजल्या केशरियाचे रंग फुलांवर ओघळले*

*रंग फुलांवर ओघळतांना असे जुईला लदबदले*
*गालावरचे निळे गोंदणे पदराभवती घुटमळले*

*निळ्या तिच्या डोळ्यांत कथाई, कुणाकुणाच्या आठवणी*
*एक झोपडी साक्षीमधली करीत बसली साठवणी*

*अशी झोपडी बोलघेवडी पांथस्थाचा पाय अडे*
*दाट जोंधळ्या रानामधला हुरडा पाहून भूल पडे*

*आज तिने कुठल्या सजणाला दूर नभातुन बोलविले*
*भरात येउनी नग्न शरीरी उघड्यावरती भोग दिले*

*काचोळीची गाठ सावरित हळू तयाला सांगितले*
*तिचियापोटी पाचघडीचे लख्ख चांदणे अवघडले*

*फुलात न्हाली पहाट ओली, कळीत केशर साकळते*
*गंधवतीच्या मनात राजस एक पाखरु भिरभिरते!*

## - ना. धों. महानोर

साहित्य प्रतिष्ठान®

# बघ आई आकाशात

बघ आई आकाशात सूर्य हा आला/
पांघरून अंगावरी भरजरी शेला//

निळ्या याच्या महालाला खांब सोनेरी/
मोतीयांच्या लावियेल्या आत झालरी//

केशराचे घातलेले सडे भूवरी/
त्यावरून येई त्याची डौलाने स्वारी//

डोंगराच्या आडून हा डोकावे हळू/
आणि फुले गुलाबाची लागे ऊधळू//

नभातून सोनियाच्या ओती तो राशी/
गुदगुल्या करी कश्या कळ्या फुलांसी//

पाखरांच्या संगे याची सोबत छान्/
गाती बघ कशी याला गोड गायन्//

मंद वारा जागवीतो साऱ्या जगाला/
म्हणतसे ऊठा ऊठा मित्र हा आला//

- शांता शेळके

# जन पळभर म्हणतील

जन पळभर म्हणतील 'हाय हाय'
मी जाता राहिल कार्य काय?

सूर्य तळपतील, चंद्र झळकतील,
तारे अपुला क्रम आचरतील,
असेच वारे पुढे वाहतील,
होईल काहि का अंतराय?

मेघ वर्षतील, शेतें पिकतील,
गर्वाने या नद्या वाहतील,
कुणा काळजी की न उमटतील
पुन्हा तटावर हेच पाय?

सखेसोयरे डोळे पुसतील,
पुन्हा आपुल्या कामि लागतील
उठतील, बसतील, हसुनि खिदळतील
मी जातां त्यांचे काय जाय?

रामकृष्णही आले, गेले
त्यांविण जग का ओसचि पडले?
कुणी सदोदित सूतक धरिले?
मग काय अटकले मजशिवाय?

अशा जगास्तव काय कुढावे?
मोहि कुणाच्या कां गुंतावे?
हरिदूता कां विन्मुख व्हावे?
कां जिरवुं नये शांतीत काय?

भा. रा. तांबे

# गाऊ त्यांना आरती

*संगरी वीराग्रणी जे धैर्यमेरू संकटी,*
*जन्मले या भारती*
*राष्ट्रचक्रोद्धारणी कर्णापरी ज्यांना मृती,*
*गाऊ त्यांना आरती*

*कोंदला अंधार मार्गी खाचखड्डे मातले,*
*तस्करांनी वेढिले*
*संभ्रमी त्या जाहले कृष्णापरी जे सारथी,*
*गाऊ त्यांना आरती*

*स्वार्थहेतूला दिला संक्षेप ज्यांनी जीविती,*
*तो परार्थी पाहती*
*आप्तविस्तारांत ज्यांच्या देशही सामावती,*
*गाऊ त्यांना आरती*

*देश ज्यांचा देव, त्याचे दास्य ज्यांचा धर्म हो*
*दास्यमुक्ति ध्येय हो*
*आणि मार्कंडेयसे जे जिंकिती काळाप्रती,*
*गाऊ त्यांना आरती*

*देह जावो, देह राहो; नाहि ज्यांना तत्क्षिती,*
*लोकसेवा दे रती*
*आणि सौभद्रापरी देतात जे आत्माहुती,*
*गाऊ त्यांना आरती*

*जाहल्या दिङ्मूढ लोकां अर्पिती जे लोचने,*
*क्षाळुनी त्यांची मने*
*कोटिदीपज्योतिशा ज्यांच्या कृती ज्यांच्या स्मृती,*
*गाऊ त्यांना आरती*

*नेटके काही घडेना, काय हेतु जीवना,*
*या विचारी मन्मना*
*बोधितो की "एवढी होवो तरी रे सत्कृती,*
*गा तयांची आरती."*

**- यशवंत**

# जे उरात उरते

जो गंध फुलांतून झरतो,
वा-याच्या उरी उतरतो;
होउन लेखणी वारा,
मग भवतालावर लिहितो.

जी वाफ जलाची होते,
ती मनी नभाच्या शिरते,
बेधुंद सरींनी गाणे
धरतीवर उपडे होते.

नभ वा-याचेच असे हे
औदार्य असावे थोर
नि:संग किती घेताना,
देताना नसतो घोर.

मी भरून घेतो सारे
हृदयाच्या काठोकाठ,
शब्दांतून देताना का
पाझरता होतो माठ?

शब्दांतून देऊन सुध्दा
जी उरात उरते काही;
ती प्रेरक शक्ती मजला
जगण्याची देते ग्वाही.

- शेख गुरूजी

# गोष्टी घराकडिल

गोष्टी घराकडिल मी वदता गड्या रे
झाले पहा कितिक हे विपरीत सारे!
आहे घरासचि असे गमते मनास
ह्या येथल्या सकल वस्तु उगीच भास! १

ही देख म्हैस पडवीमधि बांधलेली
रोमंथभाग हळु चावित बैसलेली
मित्रा! गजामधुनि या पडवीचिया रे
मौजा पहा क्षणभरी रजनीचिया रे!- २

डोळ्यांत बोट जरि घालुनि पाहशील
अंधार तो अधिकची तुजला दिसेल!
अंधार जो फलक होतसे अम्हास
चेतोनिबद्ध जनचित्र लिहावयास!३

आवाज किर्र रजनी वदतेच आहे
घों घों असा पवन नादहि बोलताहे
ऐके पलिकडूनि बेडुक शेतभाती
पर्जन्यसूक्त सगळे मनसोक्त गाती! ४

ही चारपाच चढुनी हळु पायठाणे
या ओसरीवर अता जपुनीच येणे!
हे ऐक रे टकटका करिते घड्याळ
या शांततेत गमते कुटतेच टाळ! ५

डावीस हा बघ निरखुनि एक माचा
निद्रिस्त त्यावरि पिता अतिपूज्य माझा
त्याचा खरोखर न मी क्षणपुत्र शोभे
तो सर्वदा जरी म्हणे मज पुत्र लोभे! ६

तातास या बघुनि या हृदयांत खाते
होऊन हे हृदय विव्हळ सर्व जाते!
त्याच्या तरी पदयुगावरी या पडूनी
न्हाणू तयास मग का वद आसवांनी? ७

*ताताचिया बघ गड्या उजव्या कडेला*
*बापू असे तिथ बरे अमुचा निजेला*
*अज्ञान तो चपलधी परि बाळ आहे*
*त्याचेविशी मम मनी अतिलोभ राहे! ८*

*बापू गड्या ध्वज उभा करशील काय?*
*तू देशकारण करू झटशील काय?*
*बापू जनात दिवटी धरशील काय?*
*स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय? ९*

*मित्रा! धरी सुदृढ हस्त मदीय फ़ार*
*दारास आडसर घट्ट असेल थोर*
*दाराचिया तर फटीतुन आत जाऊ*
*सानंद सुस्थित घरांतिल सर्व गाऊ! १०*

*मित्रा इथे कितितरी मज हर्ष होई*
*येथे हवा मधुर निश्वसनांत येई*
*नाही कधी हि बुधवारवनात जैशी*
*वाटेवरी चतरशिंगिचिया न तैशी! ११*

*मित्रा असा हळुच ये उजवेकडेस*
*खोली पहा पघळ ही किती ऐसपैस;*
*निद्रावश स्वजन येथ, बघूनि यास*
*हर्षाचिया न उकळ्या फुटती कुणास? १२*

*ती एक खाट समोर अवलोक आता*
*आहे सुषुप्तिवश तेथ मदीय माता*
*तीचे कुशीत निजली दिसते मदीय*
*भीमा स्वसा, बघुनी ती मज हर्ष होय. १३*

*मत्कारणे स्तवुनी देव, निजावयाते*
*आलीस तू खचित गे असशील माते!*
*मोठे त्वदीय उपकार जरा तरी ते*
*जातील का फिटुनिया तव पुत्रहस्ते? १४*

*खाली मदीय भगिनी दिसती निजेल्या*
*गोष्टी जयास कथिता न पु-याच झाल्या!*
*ती कोण दिसते? -निजली असुनी*
*जी श्वास टाकित असे अधुनी मधूनी! १५*

*कान्ताच ही मम! अहा! सखये मदीय*
*स्वप्ने अता तुज गडे दिसतात काय?*
*आता असो,! पण पुढे तुजला दिसेन*
*स्वप्ने तुझी मग समग्र तुला पुसेन! १६*

*मागील दारि सखया! तुळशीस आता*
*वन्दू, जिला मम जनी नमिला स्वमाथा!*
*सोडूनि गांव वळणे अमुच्या घराचे,*
*येऊ घरा परत खासगिवालियाचे! १७*

- केशवसुत

# माझी कन्या

गाई पाण्यावर काय म्हणुनि आल्या ?
कां गं गंगायमुनाहि या मिळाल्या ?
उभय पितरांच्या चित्तचोरटीला
कोण माझ्या बोलले गोरटीला ?

उष्ण वारे वाहती नासिकांत
गुलाबाला सुकविती काश्मिरात,
नंदनातिल हलविती वल्लरीला,
कोण माझ्या बोलले छबेलीला ?

शुभ्र नक्षत्रे चंद्र चांदण्याची
दूड रचलेली चिमुकली मण्यांची
गडे ! भूईवर पडे गडबडून,
का ग आला उत्पात हा घडून ?

विभा-विमला आपटे-प्रधानांच्या
अन्य कन्या श्रीमान कुलीनांच्या
गौर चैत्रींची तशा सजुनि येती,
रेशमाची पोलकी छिटे लेती.

तुला 'लंकेच्या पार्वती' समान
पाहुनीया, होवोनि साभिमान
काय त्यातिल बोलली एक कोण
'अहा ! आली ही पहा, भिकारीण!'

मुली असती शाळेतल्या चटोर;
एकमेकीला बोलती कठोर;
काय बाई ! चित्तांत धरायाचे
शहाण्याने ते शब्द वेडप्यांचे ?

रत्न सोने मातीत जन्म घेते,
राजराजेश्वर निज शिरी धरी ते;
कमळ होते पंकांत, तरी येते
वसंतश्री सत्कार करायाते.

पंकसंपर्के कमळ का भिकारी ?
धूलिसंसर्गे रत्न का भिकारी ?
सूत्रसंगे सुमहार का भिकारी ?
कशी तूही मग मजमुळे भिकारी ?

बालसरिता विधुवल्लरी समान
नशीबाची चढतीच तव कमान;
नारिरत्ने नरवीर असामान्य
याच येती उदयास मुलातून.

भेट गंगायमुनास होय जेथे,
सरस्वतिही असणार सहज तेथे;
रूपसद्‌गुणसंगमी तुझ्या तैसे,
भाग्य निश्चित असणार ते अपैसे.

नेत्रगोलातुन बालकिरण येती,
नाच तेजाचा तव मुखी करीती;
पाच माणिक आणखी हिरा मोती
गडे ! नेत्रां तव लव न तुळो येती.

लाट उसळोनी जळी खळे व्हावे,
त्यात चंद्राचे चांदणे पडावे;
तसे गाली हासता तुझ्या व्हावे,
उचंबळुनी लावण्य वर वहावे !

गौर कृष्णादिक वर्ण आणि त्यांच्या
छटा पातळ कोवळ्या सम वयांच्या
सवे घेउनि तनुवरी अद्‌भुतांचा
खेळ चाले लघु रंगदेवतेचा !

काय येथे भूषणे भूषवावे,
विविध वसने वा अधिक शोभवावे ?
दानसीमा हो जेथ निसर्गाची,
काय महती त्या स्थली कृत्रिमाची !

खरे सारे ! पण मूळ महामाया
आदिपुरुषाची कामरूप जाया
पहा नवलाई तिच्या आवडीची
सृष्टीशृंगारे नित्य नटायाची.

त्याच हौसेतुन जगद्रूप लेणे
प्राप्त झाले जीवास थोर पुण्ये;
विश्वभूषण सौंदर्यलालसा ही
असे मूळातचि, आज नवी नाही !

नारि मायेचे रूप हे प्रसिद्ध,
सोस लेण्यांचा त्यास जन्मसिद्ध;
तोच बीजांकुर धरी तुझा हेतू,
विलासाची होशील मोगरी तू !

तपःसिद्धीचा 'समय' तपस्व्याचा,
'भोग' भाग्याचा कुणा सभाग्याचा;
पुण्यवंताचा 'स्वर्ग' की, कुणाचा,
'मुकुट' कीर्तीचा कुण्या गुणिजनाचा.

'यशःश्री' वा ही कुणा महात्म्याची,
'धार' कोण्या रणधीर कट्यारीची;
दिवसमासे घडवीतसे विधाता
तुला पाहुनि वाटते असे चित्ता !

तुला घेइन पोलके मखमलीचे,
कुडी मोत्यांची, फूल सुवर्णाचे,
हौस बाई ! पुरवीन तुझी सारी,
परी आवरि हा प्रलय महाभारी !

ढगे बळकट झाकोनि चंद्रिकेला,
तिच्या केले उद्विग्न चांदण्याला,
हास्यलहरींनी फोडुनी कपाट
प्रकाशाचे वाहवी शुद्ध पाट !

प्राण ज्यांचेवर गुंतले सदाचे,
कोड किंचित पुरविता न ये त्यांचे;
तदा बापाचे हृदय कसे होते,
न ये वदता, अनुभवि जाणती ते !

माज धनिकाचा पडे फिका साचा,
असा माझा अभिमान गरीबाचा
प्राप्त होता परि हे असे प्रसंग
हृदय होते हदरोनिया दुभंग !

*देव देतो सद्‌गुणी बालकांना*
*काय म्हणुनी आम्हास करंट्याना ?*
*लांब त्याच्या गावास जाउनीया*
*गूढ घेतो हे त्यास पुसोनीया !*

*"गावि जातो," ऐकता त्याच काली*
*पार बदलुनि ती बालसृष्टि गेली !*
*गळा घालुनि करपाश रेशमाचा*
*वदे "येते मी" पोर अज्ञ वाचा !*

कवी बी

# झिणिझिणि वाजे बीन

झिणिझिणि वाजे बीन
सख्या रे, अनुदिन चीज नवीन

कधी अर्थावीन सुखद तराणा
कधी मंत्रांचा भास दिवाणा
सूर सुना कधी केविलवाणा
शरणागत अतिलीन

कधी खटका कधी रुसवा लटका
छेडी कधी प्राणांतिक झटका
कधी जीवाचा तोडून लचका
घेते फिरत कठीण

रोमांचातुनि कधी दीपोत्सव
कधी नेत्रांतून पुष्पांचे स्त्रव
कधी प्राणांतून सागरतांडव
अमृतसिंचित जीण

सौभाग्ये या सुरांत तारा
त्यातून अचपळ खेळे पारा
अलख निरंजन वाजविणारा
सहजपणात प्रवीण

बा.भ.बोरकर

# चाफा बोलेना, चाफा चालेना

चाफा बोलेना, चाफा चालेना,
चाफा खंत करी काही केल्या फुलेना ॥ध्रु०॥

गेले आंब्याच्या वनी
म्हटली मैनासवे गाणी
आम्ही गळ्यात गळे मिळवून.

गेले केतकीच्या बनी
गंध दर्वळला वनी
नागासवे गळाले देहभान.

आले माळ सारा हिंडुन
हुंबर पशूंसवे घालुन
कोलाहलाने गलबले रान.

कडा धिप्पाड वेढी
घाली उड्यावर उडी
नदी गर्जुन करी विहरण.

मेघ धरू धावे
वीज चटकन लवे
गडगडाट करी दारुण.

लागुन कळिकेच्या अंगा
वायु घाली धांगडधिंगा
विसरुनी जगाचे जगपण.

सृष्टि सांगे खुणा
आम्हा मुखस्तंभ राणा
मुळी आवडेना ! रे आवडेना !!

चल ये रे ये रे गड्या !
नाचु उडु घालु फुगड्या
खेळु झिम्मा, झिम् पोरी झिम्-पोरी झिम् !

हे विश्वाचे आंगण

आम्हा दिले आहे आंदण
उणे करू आपण दोघेजण

जन विषयाचे किडे
यांची धाव बाह्याकडे
आपण करू शुद्ध रसपान.

दिठी दीठ जाता मिळुन
गात्रे गेली पांगळुन
अंगी रोमांच आले थरथरून

चाफा फुली आला फुलून
तेजी दिशा गेल्या आटुन
कोण मी-चाफा ? कोठे दोघे जण ?

-बी

# आव्हान

छळून घ्या संकटानो,
संधी पुन्हा मिळणार नाही,
कर्पुराचा देह माझा
जळून पुन्हा जळणार नाही.

साहेन मी आनंदाने तुमचे वर्मी घाव
असाच नेईन किनाऱ्याशी चुकलेली नाव
मार्ग बिकट आला तरी मागे मी वळणार नाही ॥१॥

निराश मी होणार नाही, झुंजता तुमच्या सवे
मनी माझ्या जागतील आकांक्षांचे लाख दिवे
वेदना झाल्या तरीही अश्रू मी गाळणार नाही ॥२॥

आव्हान माझे तुम्हांला चालून या माझ्यावरी
धैर्याची कट्यार माझी पाजळेन तुमच्यावरी
संकटानो सावधान गाफील मी असणार नाही ॥३॥

कवी- अशोक थोरात

# ऋणाईत

स्वत:वरचा जगावरचा विश्वास जेव्हा उडून जातो..
माउलीची कूस बनून शब्दच मला जवळ घेतात ...
लाजिरवाणे असे जीणे अपमानाचे जगत जातो..
प्राण चुम्बुन घुसमटलेले शब्द सखेच धीर देतात...

अंधारून येतात दिशा..चार भिंती एक छप्पर..
काळोखात बुडून जाते..झाडे खातात मुकाट मार..
चिकचिक माती रपरप पाय..ठणकणारी जखम जशी..
असे होते मन आणि शब्दच होतात सहप्रवासी..

प्रवासाच्या सुरुवातीला वळणवेड्या मार्गावरून मरण येते
कवेत घेउन माझ्या आधी शब्दच त्याचे स्वागत करतात
ऋणाईत मी शब्दांना सर्वस्वाने ओलीस जातो..
प्रारब्धाच्या प्रकाशधारांत ऋणाईत गाणे गातो...

केशव मेश्राम

# चैत्र पाडवा

शुभारंभ करी शक गणनेचा
करुनी पराभव दुष्ट जनांचा
शालिवाहन नृपति आठवा
चैत्रमासिचा गुढीपाडवा

किरण कोवळे रविराजाचे
उल्हासित करते मन सर्वांचे
प्रेमभावना मनी साठवा
हेचे सांगतो गुढीपाडवा

घराघरांवर उभारुया गुढी
मनामनांतील सोडून अढी
संदेश असा हा देई मानवा
चैत्र प्रतिप्रदा-गुढीपाडवा

जुन्यास कोणी म्हणते सोने
कालबाह्य ते सोडून देणे
नव्या मनूचे पाईक व्हा
हेच सांगतो गुढीपाडवा

नववर्षाचा सण हा पहिला
वसंत ऋतूने सुरू जाहला
प्रण करुया मनी नवा
हेच सांगतो गुढीपाडवा

- मंगला गोखले

# अमर हुतात्मे

ते देशासाठी लढले
ते अमर हुतात्मे झाले!
सोडिले सर्व घरदार
त्यागिला मधुर संसार
ज्योतीसम जीवन जगले
ते देशासाठी लढले !

तो तुरुंग, ते उपवास
ते साखळदंड तनूस
कुणी फासावरती चढले
ते देशासाठी लढले !

झगडली-झुंजली जनता
मग स्वतंत्र झाली माता
हिमशिखरी ध्वज फडफडले
ते देशासाठी लढले !

कितिकांनी दिले प्राणास
हा विसरु नका इतिहास....
पलित्याची ज्वाला झाले
ते देशासाठी लढले !

हा राष्टध्वज साक्षीला
करु आपण वंदन याला
जयगीत गाऊया अपुले
ते देशासाठी लढले !

- वि. म. कुलकर्णी

# हिरीताचं देनं घेनं

*नको लागू जीवा सदा मतलबापाठी*
*हिरीताचं देनं घेनं नही पोटासाठी*

*उभे शेतामधी पिक*
*ऊन वारा खात खात*
*तरसती कव्हा जाउ,*
*देवा, भुकेल्या पोटात,*

*पेटवा रे चुल्हा आता, मान्डा ताटवाटी,*
*नको लागू जीवा सदा मतलबापाठी*

*पाहीसनी रे लोकाचे,*
*यवहार खोटे नाटे*
*तव्हा बोरी बाभयीच्या*
*आले आन्गावर काटे*

*राखोयीच्यासाठी झाल्या शेताले कुपाटी,*
*नको लागू जीवा सदा मतलबापाठी*

*किती भरला कनगा*
*भरल्यान होतो रिता*
*हिरिताच देन घेनं*
*नही डाडोरा करता*

*गेली देही निंघीसनी नाव रे शेवटी*
*नको लागु जीवा सदा मतलबापाठी*

- बहिणाबाई चौधरीं

# खेळणी (दशपदी)

*खेळणी सुंदर लहानपणी माझ्यापाशी होती नाना तऱ्हेची*
*काही पेरकुंडी स्वतः केलेली काही पितळी काही लाकडाची*

*चिनीच्या बाहुल्या जरी नव्हत्या तरी होते दोन मातीचे बैल*
*काही कळसुत्री करामती होत्या कमान ज्यांची पडते सैल*

*पुढे हाती आल्या काचेच्या गोटया भोवरे चक्र्या एकएका मागे*
*पतंग लहान मोठे लढवाया घोटले मजेत मांज्यांचे धागे*

*फोडली मोडली किती खेळणी फुटून आपोआप गेली*
*थोडे रडू आले पण त्यातूनच नव्यानव्याची हौस वाढली*

*खेळण्यांच्या जागी खेळ आले आणि जीवनाचाही खेळ झाला काही*
*बाळखेळण्यांमधुन मन अजून निघता निघत नाही !*

## - अनिल

# बापुजींची प्राणज्योती

*ती पहा, ती पहा, बापुजींची प्राणज्योती*
*तारकांच्या सुमनमाला देव त्यांना वाहती*

*झुंजला राजासवे हा, रंगला रंकासवे हा*
*पेटता देहेही आता, दिव्यता दावून जाती*

*चंदनाचे खोड लाजे, हा झिजे त्याहूनही*
*आज कोटी लोचनींच्या अश्रुमाला सांडताती*

*पृथ्वीच्या अक्षांशि लाली, पृथ्विच्या रेखांशि लाली*
*चार गोळ्या ज्या उडाल्या, दशदिशांना कापताती*

*नाव ज्याचे ऐकुनीया थरकली सिंहासने*
*ना जरी तलवार हाती, हा अहिंसेचा पुजारी*

*सत्य मानी देव आणि झुंजला खोट्यासवे हा*
*मृत्युच्या अंतीम वेळी, नाम रामाचे मुखी*

*सिंधु गंगा आणि यमुना, धन्य झाली अस्थिनी*
*राख तूझी भारताच्या, तिलक झाली रे ललाटी*

- मनमोहन नातू

# चिंतातुर जंतु

*''निजलें जग; कां आतां इतक्या तारा खिळल्या गगनाला ।*
*काय म्हणावें त्या देवाला?''''वर जाउनी म्हण जा त्याला.''।।1।।*

*'' तेज रवीचें फुकट सांडते उजाड माळावर उघडया ।*
*उधळणूक ती बघवत नाही --'' ''डोळे फोडुनी घेच गडया'' ।।2।।*

*''हिरवी पानें उगाच केली झाडांवर इतकीं कां ही ।*
*मातिंत त्यांचे काय होतसें?-'' '' मातिस मिळुनी जा पाही !'' ।।3।।*

*''पुराबरोबर फुकटावारी पाणी हें वाहुनी जात ।*
*काय करावें जीव तळमळे -'' '' उडी टाक त्या पूरांत'' ।।4।।*

*''ही जीवांची इतकी गर्दी जगांत आहे का रास्त ।*
*भरती मूर्खांचीच होत ना ?'' ''एक तूंच होसी जास्त'' ।। 5।।*

*देवा, तो विश्वसंसार राहूं द्या राहिला तरी ।*
*या चिंतातुर जंतुना एकदां मुक्ति द्या परी ।। 6।।*

**- राम गणेश गडकरी**

साहित्य प्रतिष्ठान ®

# श्रावणमास

*श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे,*
***क्षणांत येते सर सर शिरवे क्षणांत फिरुनि ऊन पडे***

*वरति बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे*
*मंगल तोरण काय बांधले नभोमंडपी कुणी भासे*

*झालासा सुर्यास्त वाटतो, सांज अहाहा तो उघडे*
*तरुशिखरांवर उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे*

*उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा*
*सर्व नभावर होय रेखिले सुंदरतेचे रुप महा*

*बलाकमाला उडता भासे कल्पसुमांची माळचि ते*
*उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते*

*फडफड करुनि भिजले अपुले पंख पांखरे सांवरिती*
*सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निजबाळांसह बागडती*

*खिल्लारे ही चरती रानी गोपही गाणी गात फिरे*
*मंजूळ पावा गाई तयांचा श्रावणमहिमा एकसुरे*

*सुवर्णचंपक फुलला विपिनी रम्य केवडा दरवळला*
*पारिजातही बघता भामा रोष मनीचा मावळला*

*सुंदर परडी घेऊनि हाती पुरोपकंठी शुध्दमती*
*सुंदर बाला या फुलमाला रम्य फुले पत्री खुडती*

*देवदर्शना निघती ललना हर्ष मावेना ह्रदयात*
***वदनी त्यांच्या वाचून घ्यावे श्रावण महिन्याचे गीत***

- *बालकवी*

साहित्य प्रतिष्ठान®

# मन

मन वढाय वढाय
उभ्या पिकातल ढोर
किती हाकलं हाकलं
फिरी येते पिकावर

मन पाखरू पाखरू
त्याची काय सांगू मात
आता व्हत भुइवर
गेल गेल आभायात

मन लहरी लहरी
त्याले हाती धरे कोन
उंडारल उंडारल
जस वारा वाहादन

मन जह्यरी जह्यरी
याच न्यार रे तन्तर
आरे इचू साप बरा
त्याले उतारे मन्तर

मन एव्हड एव्हड
जस खसखसच दान
मन केवढ केवढ
आभायतबि मावेन

देवा आस कस मन
आस कस रे घडल
कुठे जागेपनी तुले
अस सपन पडल

- बहीणाबाई चौधरी

# रिकामे मधुघट

मधु मागशि माझ्या सख्या, परिं
मधुघटचि रिकामे पडति घरीं !

आजवरी कमळाच्या द्रोणी
मधू पाजिला तुला भरोनी,
सेवा हि पुर्वीची स्मरोनी,
करी रोष न सखया, दया करी

नैवेद्याची एकच वाटी
अतां दुधाची माझ्या गांठीं;
देवपुजेस्तव ही कोरांटी
बाळगी अंगणीं कशी तरी

तरुण-तरुणिंची सलज्ज कुजबुज
वृक्षझऱ्यांचे गूढ मधुर गुज,
संसाराचे मर्म हवे तुज,
मधु पिळण्या परी रे बळ न करी

ढळला रे ढळला दिन सखया
संध्याछाया भिवविती हृदया,
अतां मधुचे नांव कासया?
लागले नेत्र रे पैलतिरी

- भा. रा. तांबे (१९३३,ग्वाल्हेर)

# उगवले नारायण

उगवले नारायण, उगवले गगनांत
प्रभा सोनीयाची फांके उन्हें आली अंगणात ।। १।।

उन्हें आली अंगणात, उन्हें आली ओटीवर
सोनपावलांनी देवा, उजळले माझे घर ।। २।।

उजळले माझे घर, झळाळले ग, कळस
डुलुं लागे आनंदाने वृंदावनींची तुळस ।। ३।।

वृंदावनींची तुळस, दिसे हिरवी अंजिरी
वारियाच्या झुळुकिने हंसे मंजिरी मंजिरी ।। ४।।

हंसे मंजिरी मंजिरी, प्राजक्ताच्या पावलाशीं
सडा फुलांचा घालतो, मोती-पोवळ्याच्या राशी ।।५।।

मोती-पोवळ्याच्या राशी, वैभवाला नाही अंत
सुख वेचितें संसारी, माउली मी भाग्यवंत ।। ६।।

- बहिणाबाई चौधरी

# घाल घाल पिंगा वाऱ्या

घाल घाल पिंगा वाऱ्या, माझ्या परसात
माहेरी जा, सुवासाची कर बरसात !

"सुखी आहे पोर"- सांग आईच्या कानात
"आई, भाऊसाठी परी मन खंतावतं !

विसरली का ग, भादव्यात वर्स झालं,
माहेरीच्या सुखाला ग, मन आचवलं.

फिरुन-फिरुन सय येई, जीव वेडावतो
चंद्रकळेचा ग, शेव, ओलाचिंब होतो.

काळ्या कपिलेची नंदा खोडकर फार,
हुंगहुंगुनिया करी कशी ग, बेजार !

परसात पारिजातकाचा सडा पडे,
कधी फुलं वेचायला नेशील तू गडे ?

कपिलेच्या दुधावर मऊ दाट साय
माया माझ्यावर दाट जशी तुझी, माय ... !"

आले भरून डोळे पुन्हा गळा नि दाटला
माउलीच्या भेटीसाठी जीव व्याकूळला !

- कृ. ब. निकुंब

# केवढे हे क्रौर्य!

## (पृथ्वी)

क्षणोक्षणि पडे, उठे, परि बळे, उडे बापडी,
चुके पथहि, येउनी स्तिमित दृष्टिला झापडी.
किती घळघळा गळे रुधिर कोमलांगातुनी,
तशीच निजकोटरा परत पातली पक्षिणी.

म्हणे निजशिशूंप्रती, "अधिक बोलवेना मला,
तुम्हांस अजि अंतीचा कवळ एक मी आणिला,
करा मधुर हा! चला, भरविते तुम्हां एकदां,
करो जतन यापुढे प्रभु पिता अनाथां सदा!

अहा! मधुर गाउनी रमविले सकाळी जना,
कृतघ्न मज मारितील नच ही मनी कल्पना,
तुम्हांस्तव मुखी सुखे धरुन घांस झाडावरी
क्षणैक बसले न तों शिरे बाण माझ्या उरीं

निघून नरजातिला रमविण्यांत गेले वय,
म्हणून वधिले मला! किती दया! कसा हा नय!
उदार बहु शूर हा नर खरोखरी जाहला
वधूनि मज पाखरा निरपराध की दुर्बला!

म्हणाल, भुलली जगा, विसरली प्रियां लेकरां
म्हणून अतिसंकटे उडत पातले मी घरा,
नसे लवहि उष्णता, नच कुशीत माझ्या शिरा,
स्मरा मजबरोबरी परि दयाघना इश्वरा.

असो, रुधिर वाहुनी नच भिजो सुशय्या तरी
म्हणून तरुच्या तळी निजलि ती द्विजा भूवरी.
जिवंत बहु बोलकें किति सुरम्य ते उत्पल,
नरे धरुन नाशिले, खचित थोर बुध्दिबल.

## (वसंततिलका)

मातीत ते पसरिले अतिरम्य पंख,
केले वरी उदर पांडुर निष्कलंक,
चंचू तशीच उघडी पद लांबवीले,
निष्प्राण देह पडला! श्रमही निमाले!

- ना.वा.टिळक

साहित्य प्रतिष्ठान®

# कणा

*ओळखलंत का सर मला, पावसात आला कोणी*
*कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी*

*क्षणभर बसला, नंतर हसला, बोलला वरती पाहून*
*गंगामाई पाहुणी आली गेली घरट्यात राहून*

*माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतींत नाचली*
*मोकळ्या हाती जाईल कशी बायको मात्र वाचली*

*भिंत खचली, चूल विझली होते नव्हते गेले*
*प्रसाद म्हणुन पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले*

*कारभारणीला घेऊन संगे सर आता लढतो आहे*
*चिखलगाळ काढतो आहे, पडकी भिंत बांधतो आहे*

*खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला*
*पैसे नकोत सर जरा एकटेपणा वाटला*

*मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा*
*पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा!*

*- कुसुमाग्रज*

# या झोपडीत माझ्या

*राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली*
*ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या॥१॥*

*भूमीवरी पडावे, तार्‍यांकडे पहावे*
*प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या॥२॥*

*पहारे आणि तिजोर्‍या, त्यातूनी होती चोर्‍या*
*दारास नाही दोर्‍या, या झोपडीत माझ्या॥३॥*

*जाता तया महाला, 'मज्जाव' शब्द आला*
*भिती न यावयाला, या झोपडीत माझ्या॥४॥*

*महाली मऊ बिछाने, कंदील शामदाने*
*आम्हा जमीन माने, या झोपडीत माझ्या॥५॥*

*येता तरी सुखे या, जाता तरी सुखे जा*
*कोणावरी न बोजा, या झोपडीत माझ्या॥६॥*

*पाहून सौख्यं माझे, देवेंद्र तोही लाजे*
*शांती सदा विराजे, या झोपडीत माझ्या॥७॥*

- संत तुकडोजी महाराज.

# पाऊस कधीचा पडतो

*पाऊस कधीचा पडतो, झाडांची हलती पाने*
*हलकेच जाग मज आली, दुःखाच्या मंद सुराने*

*डोळयात उतरले पाणी, पाण्यावर डोळे फिरती*
*दुःखाचा उतरला पारा, या नितळ उतरणीवरती*

*पेटून कशी उजळेना, ही शुभ्र फुलांची ज्वाला*
*तार्‍यांच्या प्रहरापाशी पाऊस असा कोसळला*

*संदिग्ध ढगांच्या ओळी आकाश ढवळतो वारा*
*माझ्याच किनार्‍यावरती लाटांचा आज पहारा*

**-कवी ग्रेस**

# पैठणी

फडताळात एक गाठोडे आहे
त्याच्या तळाशी अगदी खाली
जिथे आहेत जुने कपडे
कुंच्या टोपडी शेले शाली
त्यातच आहे घडी करुन
जपून ठेवलेली एक पैठणी
नारळी पदर जरी चौकडी
रंग तिचा सुंदर धानी

माझी आजी लग्नामध्ये
हीच पैठणी नेसली होती
पडली होती सा-यांच्या पाया
हाच पदर धरून हाती
पैठणीच्या अवतीभवती
दरवळणारा सुक्ष्म वास
ओळखीची.. अनोळखीची..
जाणीव गूढ आहे त्यास

धूर कापूर उदबत्त्यांतून
जळत गेले किती श्रावण
पैठणीने जपले
एक तन.. एक मन..
माखली बोटे
पैठणीला केव्हा पुसली
शेवंतीची चमेलीची
आरास पदराआडून हसली

वर्षामागुन वर्षे गेली
संसाराचा सराव झाला
नवा कोरा कडक पोत
एक मऊपणा ल्याला
पैठणीच्या घडीघडीतून
अवघे आयुष्य उलगडत गेले
सौभाग्य मरण आले
आजीचे माझ्या सोने झाले

साहित्य प्रतिष्ठान ®

*कधीतरी ही पैठणी*
*मी धरते ऊरी कवळुन*
*मऊ रेशमी स्पर्शामध्ये*
*आजी भेटते मला जवळुन*
*मधली वर्षे गळुन पडतात*
*कालपटाचा जुळतो धागा*
*पैठणीच्या चौकड्यानो*
*आजीला माझ्या कुशल सांगा*

-शांता शेळके

# हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे

हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे
आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

कर्तव्यदक्ष भूमी सीतारघुत्तमाची
रामायणे घडावी, येथे पराक्रमाची
शिर उंच उंच व्हावे, हिमवंत पर्वताचे
आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

येथे नको निराशा, थोडया पराभवाने
पार्थास बोध केला येथेच माधवाने
हा देश स्तन्य प्याला गीताख्य अमृताचे
आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

जेथे परंपरांचा सन्मान नित्य आहे
जन शासनातळीचा पायाच सत्य आहे
येथे सदा निनादो जयगीत जागृताचे
आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

गीतकार :ग. दि. माडगुळकर

# आवडतो मज अफ़ाट सागर

आवडतो मज अफ़ाट सागर, अथांग पाणी निळे
निळ्या जांभळ्या जळात केशर सायंकाळी मिळे

फेस फुलांचे सफेत शिंपित, वाटेवरती सडे
हजार लाटा नाचत येती, गात किनाऱ्याकडे

मऊ मऊ रेतीत रे कधी मी, खेळ खेळतो किती
दंगल दर्यावर करणाऱ्या वाऱ्याच्या संगती

तुफान केंव्हा भांडत येते सागर ही गर्जतो
त्यावेळी मी चतुरपणाने दूर जरा राहतो

संथ सावळी दिसती जेंव्हा क्षितिजावर गलबते
देश दूरचे बघावयाला जावेसे वाटते

क्षितिजावर मी कधी पाहतो मावळणारा रवी,
ढगाढगाला फुटते तेव्हा सोनेरी पालवी

प्रकाशदाता जातो जेव्हा जळाखालच्या घरी
नकळत माझे हात जुळोनी येती छातीवरी

-कुसुमाग्रज

# अरे खोप्यामधी खोपा

अरे खोप्यामधी खोपा
सुगरनीचा चांगला
देखा पिलासाठी तिनं
झोका झाडाले टांगला..

पिलं निजले खोप्यात
जसा झूलता बंगला
तिचा पिलामधि जीव
जीव झाडाले टांगला..!

सुगरिन सुगरिन
अशी माझी रे चतुर
तिले जल्माचा सांगाती
मिये गन्यागम्प्या नर

खोपा इनला इनला
जसा गिलक्याचा कोसा
पाखराची कारागिरी
जरा देख रे मानसा !

तिची उलूशीच चोच,
तेच दात, तेच ओठ
तुले देले रे देवानं
दोन हात दहा बोटं ?

- बहीणाबाई चौधरी

# पिपांत मेले ओल्या उंदिर

पिपांत मेले ओल्या उंदिर
माना पडल्या, मुरगळल्याविण;
ओठांवरती ओठ मिळाले;
माना पडल्या, आसक्तीविण.
गरिब बिचारे बिळांत जगले,
पिपांत मेले उचकी देउन;
दिवस सांडला घाऱ्या डोळीं
गात्रलिंग अन धुऊन घेउन.

जगायची पण सक्ती आहे;
मरायची पण सक्ती आहे.

उदासतेला जहरी डोळे,
काचेचे पण;
मधाळ पोळें
ओठांवरती जमलें तेंही
बेकलाइटी, बेकलाइटी!
ओठांवरती ओठ लागले;
पिपांत उंदिर न्हाले! न्हाले!

- बा.सी.मर्ढेकर

# दुपार

*माथ्यावरती उन्हे चढावी*
*पावलांत सावल्या विराव्या*
*घाटावरती शुभ्र धुण्यांच्या*
*पाकोळ्या अन् मंद झुलाव्या*
*डोंगर व्हावे पेंगुळलेले*
*पोफळबागा सुस्त निजाव्या*
*अंगणातल्या हौदावरती*
*तहानलेल्या मैना याव्या*
*लुकलुकणारे गोल कवडसे*
*लिंबाच्या छायेत बसावे*
*खारीचे बावरे जोडपे*
*बकुळीखाली क्षणिक दिसावे*
*कुरणाच्या हिरवळीत ओल्या*
*ऊनही हिरवे होऊन जावे*
*कुठे कधीचे नांगरलेले*
*शेत पावसासाठी झुरावे.*

**- सदानंद रेगे**

# जिंकू किंवा मरू

माणुसकीच्या शत्रुसंगे,
युद्ध आमुचे सुरू
जिंकू किंवा मरू

लढतिल सैनिक, लढू नागरिक,
लढतिल महिला, लढतिल बालक
शर्थ लढ्याची करू,
जिंकू किंवा मरू

देश आमुचा शिवरायाचा,
झाशीवाल्या रणराणीचा
शिर तळहाती धरू,
जिंकू किंवा मरू

शस्त्राघाता शस्त्रच उत्तर,
भुई न देऊ एक तसूभर
मरू पुन्हा अवतरू,
जिंकू किंवा मरू

हानी होवो कितीहि भयंकर,
पिढ्या-पिढ्या हे चालो संगर
अंती विजयी ठरू,
जिंकू किंवा मरू

- ग. दि. माडगूळकर

# जाग जाग भारता

जाग जाग भारता, काळ कठीण ये अतां
शत्रुसैन्य पातलें, खडग उचल स्वागता

समरीं ज्वाळ पेटली, कैक घेतले बळी
थोर आपुल्यांतली, दाखवी मृगेंद्रता

कोटि देह एक प्राण, एक लक्ष्य एक आण
हिंदभूस वाचवूं, ना विचार अन्यथा

थांब लाल राक्षसा, निश्चय बघ रे कसा
लक्ष बिंदु सांडवूं, एक बिंदु सांडता

बेईमान जो तया, दाखवूं नको दया
देशनिष्ठ राहिला, तोच बंधू आपुला

वागवीं अता तरी, बोध एक अंतरी
ध्येय शांतिचे तरी, रक्ष रक्ष वीरता

- यशवंत देव

# थांब जरासा बाळ !

सुंदर खाशा प्रभातकाळीं,
चहूंकडे हीं फुलें उमललीं,
बाग हांसते वाटे सगळी !
शीतल वारा, या जलधारा कारंजाच्या छान !
थांब जरासा बाळ !

रम्य तडागीं निर्मळ पाणी,
गातीं पांखरे गोजिरवाणीं,
आनंदाची बसलीं ठाणीं,
खरें असे रे ! तरी नको रे मारुं लाडक्या धांव !
थांब जरासा बाळ !

पाहुनी सौख्याचा ठेवा !
सुष्टि करिलही माझा हेवा !
माझ्यापासुनी फसवुनी न्यावा,
यत्न परोपरि, करितील सारीं ! भुलशिल तूं
लडिवाळ !
थांब जरासा बाळ !

तऱ्हे-तऱ्हेची फुलें विकसलीं,
रंगी बेरंगीहीं सगळीं,
तूंही शिरतां त्यांच्या मेळी;
माझें मग तें, फूल कोणतें कसें ओळखूं सांग ?
थांब जरासा बाळ,

बघ सुटला हा मोठा वारा,
वायुवृत्ती तव देहही सारा !
उडवुनी नेईल तुला भरारा !
दिगंतराला, जातां बाळा ! पुन्हा कसा मिळणार ?
थांब जरासा बाळ !

स्वच्छ तडागीं प्रतिबिंबातें,
पाहुनी वेडया धरावयातें,
चुकुनी जाशिल पाताळातें,
तयासारखा, क्षणीं पारखा, होशिल बा आम्हांस !

थांब जरासा बाळ !

किती बुडबुडे पाण्यावरती,
इकडून तिकडे तरंगताती,
चंचल लहरी, तूं त्या साथी,
क्षणांत बा रे, लपाल सारे, काळाच्या उदरांत !
थांब जरासा बाळ !

फूलपांखरें ही स्वछंदी,
तूंही त्यांच्यासम आनंदी,
क्षणांत पडशिल त्यांच्या फंदीं !
त्यांच्या संगें, त्यांच्या रंगें, जाशिल उडुनी दूर !
थांब जरासा बाळ !

अशा तुला मग बागडतांना,
भरभर वाऱ्यावर फिरतांना,
फुलांत दडतां कीं उडतांना,
कवण उपायीं, आणूं ठायीं, पुन्हां? लाडक्या सांग !
थांब जरासा बाळ !

शब्दवांचुनी मंजुळ गाणें,
अर्थ तयाचा देवची जाणे !
गाईन माझें गोजिरवाणें,
सप्तसुरांपरी या वाऱ्यावरी विरुनी जाशिल पार !
थांब जरासा बाळ !

बालरवीचे किरण कोवळे,
कारंजावर पड़ती मोकळे,
रंग खेळती हिरवे पिवळे,
धरावयासी, त्या रंगांसी जाशिल बाळा खास !
थांब जरासा बाळ !

जडावेगळी अमूर्त मूर्ति,
कल्पकतेची कीं तूं स्फूर्ति,
पुण्याची मम आशापूर्ति,
रविकिरणांवरी, जलधारांतरी, तन्मय होशिल पार !
थांब जरासा बाळ !

- राम गणेश गडकरी

# मृग

*माउलीच्या दुग्धापरी*
*आले मृगाचे तुषार,*
*भुकेजल्या तान्ह्यासम*
*तोंड पसरी शिवार*

*तुकोबाच्या अभंगाला*
*मंद चिपळ्याची साथ,*
*भरारतो रानवारा*
*तसा झाडाझुडूपांत*

*पिऊनीया रानवारा*
*खोंड धांवे वारेमाप,*
*येतां मातीचा सुगंध*
*स्तब्ध झाले आपोआप*

*अवखळ बाळापरी*
*पक्षी खेळती मातींत,*
*उभारल्या पंखावरी*
*थेंब टपोरे झेलीत*

*धारा वर्षतां वरुन*
*बैल वशिंड हालवी,*
*अवेळीच फुटे पान्हा*
*गाय वत्साला बोलवी*

*गावानेच उंच केला*
*हात दैवी प्रासादास*
*भिजूनिया चिंब झाला*
*गावदेवीचा कळस.*

**- ग. दि. माडगुळकर**

साहित्य प्रतिष्ठान ®

# आता उठवू सारे रान

आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान
शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण

किसान मजूर उठतील, कंबर लढण्या कसतील
एकजुटीची मशाल घेउनि पेटवतिल सारे रान

कोण आम्हा अडवील, कोण आम्हा रडवील
अडवणूक त्या करणाऱ्यांची उडवू दाणादाण

शेतकऱ्यांची फौज निघे, हातात त्यांच्या बेडि पडे
तिरंगि झेंडे घेती, गाती स्वातंत्र्याचे गान

पडून ना राहू आता, खाऊ ना आता लाथा
शेतकरी अन् कामकरी मांडणार हो ठाण

- साने गुरुजी

# सैन्य चालले पुढे

*शिंग फुंकिले रणी, वाजतात चौघडे*
*सज्ज व्हा, उठा उठा, सैन्य चालले पुढे*

*दास्यकाल संपला, शांत काय झोपला?*
*अग्नि येथ कोपला, पेटुनी नभा भिडे*

*लोकमान्य केसरी, गर्जतात वैखरी*
*माजला असे अरी, चारु त्याजला खडे*

*वीस सालचा लढा, जाहला किती बडा*
*इंग्रजास बेरडा, आणिले कसे रडे*

*तीस सालची प्रभा, उज्वला भरी नभा*
*गांधि अग्रणी उभा, ठाकला रणी पुढे*

*शीर घेउनी करी, दंग होउ संगरी*
*घालवू चला अरी, सागरापलीकडे*

**गीत - वसंत बापट**

# धमाल सुट्टी आली

फांदीवरची फूलपाखरे
आभाळात उडाली
स्वैर होऊया त्यांच्यासंगे
धमाल सुट्टी आली

नको आता हो धाक छडीचा
नकोत ती गणिते
इतिहासातील नको लढाई
नको अक्षरवृत्ते
मैदानावर खेळायाची आता घाई झाली

गृहपाठ हो नवा आता हा
आईसक्रीम खाण्याचा
मित्रासंगे हुंदडण्याचा
डिस्को गाण्याचा
एकाऐवजी दोन-दोन चोंकलेट ठेवूया गाली

मित्रमैत्रिणी मिळूनी सारे
हिंदू चौपाटी
बाबांच्याही लागू पाठी
भेलपुरीसाठी
बेत किती हो रचले आम्ही मनाच्या महाली

- प्रवीण दवणे

# बाभळी

*लवलव हिरवीगार पालवी काट्यांची वर मोहक जाळी*
*घमघम करिती लोलक पिवळे फांदी तर काळोखी काळी*

*झिरमिर झरती शेंगा नाजूक वेलांटीची वळणे वळणे*
*त्या सार्‍यातूनी झिरमिर झरती रंग नभाचे लोभसवाणे*

*कुसर कलाकृती अशी बाभळी तिला न ठावी नागररिती*
*दूर कुठेतरी बांधावरती झुकून जराशी उभी एकटी*

*अंगावरती खेळवी राघू लागट शेळ्या पायाजवळी*
*बाळ गुराखी होऊनीया मन रमते तेथे सांज सकाळी*

*येथे येऊन नवेच होऊन लेऊन हिरवे नाजूक लेणे*
*अंगावरती माखूनी अवघ्या धुंद सुवासिक पिवळे उटणे*

## - इंदिरा संत

# अस्मान कडाडून गेला

ही अशी उडी बघताना,
कर्तव्य मृत्यु विस्मरला
बुरुजावर फ़डफ़डलेला,
झाशितील घोडा हसला
वासुदेव बळवंताच्या,
कंठात हर्ष गदगदला
दामोदर डोले वरला,
मदनलाल गाली फ़ुलला
कान्हेरे खुदकन हसला
क्रांतीच्या केतूवरला -
"अस्मान कडाडून गेला"
"अस्मान कडाडून गेला"

दुनियेत फ़क्त आहेत
विख्यात बहाद्दर दोन
जे गेले आईकरिता,
सागरास पालांडून
हनुमंतानंतर आहे -
"ह्या विनायकाचा मान"
"ह्या विनायकाचा मान"

- मनमोहन नातू

# पिंपळाचे पान

वसंतात गळतात पिंपळाची पाने,
रंग संपून हिरवा, पान पान होते जुने...

प्रेम वाटले पानाला... काही दिवस लोटले,
'जाळीदार' पानामुळे बालमन आनंदले...

पुन्हा फुटेल पालवी - पिंपळाच्या फांदयांतून,
पान पुस्तकामधले पाहील हो डोकावून....

एका शहाण्या मुलाने एक पान उचलले,
आणि नव्या पुस्तकात हळू जपून ठेवले...

'जुन्या-नव्याचा हा खेळ' कधीपासून चालला,
दोन्हींवर प्रेम करु - पाहू आपण सोहळा !

- वि. म. कुलकर्णी

# फुंकर

बसा म्हणालीस - मी बसलो
हसलीस म्हणून हसलो
बस्स इतकेच... बाकी मन नव्हते थाऱ्यावर

दारावरचा पडदा दडपीत तू लगबग निघून गेलीस माजघरात
माझ्यासोबत ठेवून तुझ्या शुष्क संसाराच्या निशाण्या...
या जाळीच्या पडद्याआड कशाला कोरले आहेस
हे हृदय - उलटे- उत्तान?
काचेच्या कपाटात कशाला ठेवल्या आहेस भुश्याच्या
राघूमैना?
उडताहेत लाकडी फळावर कचकड्यांची फुलपाखरे
भिंतीवर रविवर्म्याची पौष्टिक चित्रे हारीने

काळ्या मखमलीवर पतीच्या नावाचा रेखीव कशिदा
त्यातला एक टाका जरी चुकली असतीस तरी मी धन्य
झालो असतो
तू विचारलेस - काय घेणार?
काय पण साधा प्रश्न - काय घेणार?
देणार आहेस ते सारे पूर्वीचे?
मला हवे आहेत चिंचेचे आकडे - ते अघाशी ओठ, ती
कुजबुज, त्या शपथा
दे झालं कसलंही साखरपाणी

तुझं आणि तुझ्या पतीचं हे छायाचित्र छान आहे
तुझ्यावरची सारी साय या फुगीर गालांवर ओसंडते आहे
बळकट बाहू, रुंद खांदे, डोळ्यांत कर्तेपणाची चमक छान
आहे
राग येतो तो तुझा
या चित्रात तू अशी दिसतेस की
जसे काही कधी झालेच नाही

मी तुला बोलणार होतो छद्मीपणाने निदान एक वाक्य - एक
जहरी बाण
ते मला जमले नाही
आणि तू तर नुसती हसत होतीस
आता एकच सांग -
उंबऱ्यावर तुझ्या डोळ्यांत पाणी आले
इतकी का तुला सुपारी लागली?
पण नकोच सांगूस
तेवढीच माझ्या मनावर एक फुंकर

**- वसंत बापट**

# जय जवान, जय किसान!

एक सूर एक ताल, एक गाऊ विजयगान
जय जवान, जय किसान!
जय जवान, जय किसान, जय जय!

अखिल देश पाठिशी 'जवान' व्हा रणी चला
किसान होऊनी कसा भूमी सस्य शामला
यौवनास योग्य रे शौर्य आणि स्वाभिमान
जय जवान, जय किसान!

शत्रू मित्र जाणुनी सावधान सर्वदा
आपल्या श्रमे करू प्रसन्न देवी अन्नदा
उभ्या जगात आपुली सदैव उंच ताठ मान
जय जवान, जय किसान!

अजिंक्य सैन्य आमचे, गाजवी पराक्रमा
भूमिदास दाखवी निर्मितीत विक्रमा
स्वतंत्र हिंद देश हा, स्वतंत्र सिंधू आसमान
जय जवान, जय किसान!

**- ग. दि. माडगुळकर**

# पाणपोई

*येइं भाई, येथ पाही घातली ही पाणपोई*
*धर्मजाती कोणती ती भेद ऐसा येथ नाही*
*संसृतीचा हा उन्हाळा तल्खली होई जिवाची*
*स्वेदबिंदू अश्रुधारा यांविना पाणीच नाही II१II*

*वायुवीची भोंवतीं आंदोलुनी त्या वंचिताती*
*झोंबती अंगी झळा अन् मूर्छना ये ठायिंठायीं*
*सांवली नाही कुठेंही, तापतो मार्तंड डोईं*
*श्रांत पांथा ! बांधली ही तूझियासाठीं सराईII२II*

*आद्य जे कोणी कवी तत्स्फूर्तिच्या ज्या सिंधु गंगा*
*आणिल्या वाहून खांदीं कावडी त्यांतील कांही*
*पांथसेवासाधनीं हें व्हावयातें गार पाणी*
*मृत्तिकेचे मात्र माझे कुंभ, ही माझी नवाईII३II*

*ओंजळी, दों ओंजळी, आकंठ घेईं वा पिऊनी*
*हो जरा ताजा तवाना, येउं दे सामर्थ्य पायीं*
*पावतां तृप्ती मना, संचारतां अंगीं उमेदी*
*जो दुवा देशील पांथा तेवढी माझी कमाई II४II*

- यशवंत

# वाट

मला आवडते वाट वळणाची
दाट झाडीची नागमोडीची
ही अलिकडची, नदीच्या थडीची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
सरघसरणीची पायफसणीची
लवणावरची पानबसणीची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
अशी भुलवणीची हुलकावणीची
निसर्गवेळूच्या भर रानीची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
जरा अडचणीची चढउतरणीची
घाटमाथ्याची ती पलीकडची
मला आवडते वाट वळणाची

मला आवडते वाट वळणाची
इथची तिथची कधी कुणीकडची
क्षितिजाकडची पुढची पुढची
मला आवडते वाट वळणाची

- आ. रा. देशपांडे (अनिल)

# आजारीपण (पडुं आजारी)

*पडुं आजारी,*
*मौज हीच वाटे भारी II ध्रु. II*

*नकोच जाणे मग शाळेला,*
*काम कुणी सांगेल न मजला,*
*मऊ मऊ गादी निजावयाला,*
*चैनच सारी..... मौज हीच वाटे भारी II १ II*

*मिळेल सांजा, साबुदाणा,*
*खडिसाखर, मनुका बेदाणा,*
*संत्री, साखरलिंबू आणा;*
*जा बाजारी..... मौज हीच वाटे भारी II २ II*

*भवती भावंडांचा मेळा,*
*दंगा थोडा जरि कुणि केला,*
*मी कावुनि सांगेन तयाला,*
*'जा बाहेरी'..... मौज हीच वाटे भारी II ३ II*

*कामे करतील सारे माझी,*
*झटतिल ठेवाया मज राजी,*
*बसेल गोष्टी सांगत आजी,*
*मज शेजारी..... मौज हीच वाटे भारी ! II ४ II*

*असलें आजारीपण गोड*
*असूनि कण्हती कां जन मूढ ?*
*हें मजला उकलेना गूढ -*
*म्हणून विचारी..... मौज हीच वाटे भारी II ५ II*

**- भानुदास**

# माणूस

प्रवासी मी दिगंताचा
युगे युगे माझी वाट
मज चालायचे असो
सुख दुःख माळ घाट

झेप गरुडाची अंगी
शस्त्र विज्ञानाचे हाती
श्रम शास्त्राच्या युतीने
पृथ्वी करीन थांबती

चंद्र सूर्य ग्रह तारे
तुडवीन पायदळी
स्वर्गातून सुरासुर
पाठवीन मी पाताळी

वारा करीन गुलाम
वर्षा बांधीन दाराशी
माझे वैभव पाहून
लक्ष्मी लाजेल स्वतःशी

जे जे असेल अज्ञात
घेता करुनीया ज्ञात
पाठीवरी मात्र हवा
कुण्या प्रेमळाचा हात

- राम मोरे

# निज नीज माझ्या बाळा

बां नीज गडे नीज गडे लडिवाळा !
निज नीज माझ्या बाळा.
रवि गेला रे, सोडुनि आकाशाला
धन जैसे दुर्भाग्याला.
अंधार वसे चोहिंकडे गगनात,
गरिबाच्या जेविं मनात.
बघ थकुनि कसा निजला हा इहलोक
मम आशा जेविं अनेक,
खडबड हे उंदिर करिती,
कण शोधायाते फिरती,
परि अंती निराश होती;
लवकरि हेही सोडितील सदनाला,
गणगोत जसे आपणांला ।। १ ।।

बहु दिवसांच्या जुन्या कुडाच्या भिंती,
कुजुनी त्या भोके पडती.
त्यांमधुनी त्या दाखविती जगताला
दारिद्र्य आपुले बाळा.
हे कळकीचे जीर्ण मोडके दार
कर कर कर वाजे फार;
हे दुःखाने कण्हुनि कथी लोकांला
दारिद्र्य आपुले बाळा.
वाहतो फटींतूनि वारा;
सुकवीतो अश्रूधारा;
तुज नीज म्हणे सुकुमारा !
हा सूर धरी माझ्या या गीताला
निज नीज माझ्या बाळा ! ॥ २ ॥

जोंवरतीं हें जीर्ण झोपडें अपुलें
दैवानें नाही पडलें,
तोंवरतीं तूं झोप घेत जा बाळा;
काळजी पुढे देवाला !
जोंवरतीं या कुडीत राहिल प्राण,
तोंवरि तुज संगोपीन;
तदनंतरची करू नको तूं चिंता;
नारायण तुजला त्राता.
दारिद्र्या चोरिल कोण?

आकाशा पाडिल कोण?
दिग्वसना फाडिल कोण?
त्रैलोक्यपती आतां त्राता तुजला !
निज नीज माझ्या बाळा ! ॥ ३ ॥

तुज जन्म दिला, सार्थक नाही केलें,
तुज कांहिं न मी ठेविलें.
तुज कोणी नसे, छाया तुज आकाश;
धन दारिद्र्याची रास;
या दाही दिशा वस्त्र तुला सुकुमारा;
गृह निर्जन रानीं थारा;
तुज ज्ञान नसे अज्ञानाविण कांहिं;
भिक्षेविण धंदा नाहिं.
तरि सोडू नको सत्याला,
धन अक्षय तेच जीवाला,
भावें मज दिनदयाळा,
मग रक्षिल तो करुणासागर तुजला,
निज नीज माझ्या बाळा ! ॥ ४ ॥

- दत्तात्रय कोंडो घाटे (सन १८९७)

# चाड चातुर्यातें जिणें (विवेकसिंधु)

*वेदशास्त्रांचा मथितार्थु । मर्‍हाटिया जोडे फलितार्थु*
*तरी चतुरीं परमार्थु । कां नेघावा ॥ १ ॥*

*चाड चातुर्यातें जिणें । यैसें बोलती स्याहाणे*
*तरी येथिंचिये परमार्थु खुणे। ग्राहिक कां न होआवे॥२॥*

*धुळी आंतिल रत्न । जरी भेटे न करितां प्रेत्न*
*तरि चतुरीं येत्न । कां न करावा ॥ ३ ॥*

*जर्‍हि रुईचिये झाड़ीं भरती । मधाचिया कावडी*
*तर्‍हि हिंडावेयाची आडपाडी । कां पडों द्यावी ॥ ४ ॥*

*जर्‍हि हे आरुष बोल । परी रोकडें ब्रह्मज्ञान हैं नवल*
*तर्‍हि अवज्ञा कवण करिल । येथ विषई ॥ ५ ॥*

*ऊंस किरू दिसे काळा । परी घेपे रसाचा गळाळा*
*तैसे आरुष बोल परि झळाळा । दिसे विवेकाचा ॥ ६ ॥*

- मुकुंदराज (आद्यकवी)

# नदी आणि कवी

[उपजाति]
असो कवीचें कुल अप्रसिद्ध
होई कवीच्या कवनें प्रसिद्ध
तसा नदीच्या उगमस्थलाला
नदीमुळे गौरवलाभ झाला ॥१॥

काव्यें कवीचीं जगतांत गावी;
त्यांचे न त्यांच्या परि चोज गांवीं.
नदी सुदूरुस्थ जनां पवित्र
विटाळिती तीर्थ तिचेच पुत्र ॥२॥

बाल्यात उच्छृंखलवृत्ति दोन्ही
ठावा नसे आडथळा म्हणोनी;
लागो दरी खोल, उभा पहाड,
जातात तीं धांवत धाड धाड ! ॥३॥

जाई जसे अंतर होत खोल
गांभीर्य ये वृत्ति निवे विलोल.
रेखून मार्ग क्रमितात संथ
करीत कल्याण जगी अनंत ॥४॥

अभंग त्यांच्या हृदयीं तरंग
नीःसंग ते त्यांत सदैव दंग,
गाऊन गाणीं भ्रमतात रानीं,
ते धन्य ज्यांच्या पडतात कानीं ॥५॥

स्वजीवनानें उगवून दाणे,
नदी जिवां दे चिर जीवदानें.
तैसें कवीच्या कविताप्रवाहें
जीवांत संजीवन दिव्य लाहे ॥६॥

राष्ट्रे बुडालीं नृप थोर गेले;
नदी कवी मात्र अनंत ठेले !
भागीरथीला खळ लेश नाही
अखंड रामायण लोक गाई ॥७॥

*महाकवी थोर नदाप्रमाणें;*
*मी बापडा ओघळ अल्प जाणें.*
*धाकें न ओढा झुळझूळ वाहे*
*माझी तशी ही गुणगूण आहे ! II८II*

- विनायक

# माधुकरी

*गरिब बिचारा माधुकरी, दुःख तयाला जन्मभरी ॥ ध्रु. ॥*

*कडक उन्हानें जीव घाबरे, कपोल सुकले घर्मे भिजले*
*पायी चटके; तापे डोके, धांपा टाकीत पळे जरी ॥१ ॥*

*बुरबुर लागे पाऊसधारा, चिखल माखला अंगी सारा*
*घट्ट तपेली, झोळी धरिली, धांवत जातो घरोघरी ॥ २ ॥*

*भणभण झोंबे वारा अंगा, बधीर गात्रें पायीं भेगा*
*हात कांपती, दांत वाजती, कुडकुडतो हा घडी घडी ॥ ३ ॥*

*विटक्या अपुऱ्या मुकट्यावांचुनी, वस्त्र दुपारी अंगी कोठुनि*
*हि धार्मिकता लोकांकरितां, नित्य सोशितो कष्ट जरी ॥ ४ ॥*

*सण आनंदी घरोघरी जरि, नित्य कपाळी सुटे न वारी*
*शिळी बुरसली, खवट आंबली, अशीच नशिबी सदा भाकरी॥५॥*

*'उशीर' कोठे कुठें 'संपले' मिळे कालवण भाग्य उदेले*
*नांवा धरिली करी तपेली, अश्रू तोंडी, घांस गिळी ॥ ६ ॥*

*झोळी थोडिहि अजुनि न भरली, शाळेची तर घंटा झाली*
*मुख हिरमुसले, घांस कोंबले; दप्तर घेउनि पळे जरी ॥ ७ ॥*

*शिळे त्यांतले रात्रीकरितां, निजे उपाशी अपुरे पडतां*
*कुणा कळवळा येई बोला, दुःख तयाचे अणूपरी ॥ ८ ॥*

*नंबर गेला एक खालती, जाईल नादारी ही भीती*
*सांजसकाळी अभ्यासच करि, फुरसत खेळा कुठे तरी ॥ ९ ॥*

*गोसावी, भट, धन्य भिकारी, तेलंग्याचे भाग्य कितीतरि*
*पैसा दूरच, पुस्तक धोतर, जुने द्यावया नसे घरी ॥ १० ॥*

*निजे कुणाच्या ओटीवरती, अर्धे धोतर खाली वरती*
*एकच सदरा तोच उशाला; दया न येते जगा परी ॥ ११ ॥*

*यजमानाला पलंग गिरदी, आंत उकडते खुपते गादी*
*पोटी धरुनी पाय जुळवुनी, कुडकुडतो हा रात्रभरी ॥ १२ ॥*

*पुण्यांत आला अभ्यासाला, पदोपदी जग अडवी त्याला*
*विद्या करितो, हाल सोशितो, शूर नव्हे का खरोखरी*
*गरिब बिचारा माधुकरी ॥ १३ ॥*

**- श्रीधर बाळकृष्ण रानडे**

साहित्य प्रतिष्ठान ®

# केवळ माझा सह्यकडा

*भव्य हिमालय तुमचा अमुचा केवळ माझा सह्यकडा
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनांत पूजीन रायगडा*

*तुमच्या अमुच्या गंगा यमुना केवळ माझी भिंवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यार मला छाती निधडी
मधुगुंजन लखलाभ तुम्हांला, बोल रांगडा प्यार मला
ख्रिस्त बुद्ध विश्वाचे शास्ते तुकयाचा आधार मला
धिक तुमचे स्वर्गही साती
इथली चुंबीन मी माती
या मातीचे कण लोहाचे, तृणपात्यांना खड्गकळा
कृष्णेच्या पाण्यातून अजुनी वाहतसे लाव्हा सगळा*

*कबीर माझा, तुळसी माझा, ज्ञानेश्वर परी माझाच
जयदेवाचा जय बोला परी माझा नाम्याचा नाच
जनीं जनार्दन बघणारा तो "एका" हृदयी एकवटे
जनाबाईच्या ओवीमध्ये माझी मजला खूण पटे
इंद्रायणीच्या डोहामधली गाथा ओली ती ओली
ती माझी मी तिचाच ऐसी; जवळीक कायमची झाली
भक्तीचा मेळा दाटे
चोख्याची पैरण फाटे
निर्गुण मानवतेची पूजा करणारे करू देत भले
माझ्यासाठी भीमाकांठी भावभक्तीची पेठ खुले*

*रामायण तर तुमचें माझें भारत भारतवर्षाचें
छत्रपतींची वीरकहाणी निधान माझ्या हर्षाचें
रजपुतांची विक्रमगाथा तुमच्यापरी मजला रुचते
हृदयाच्या हृदयांत; परंतू बाजी बाजीची सुचते
अभिमन्यूचा अवतारच तो होता माझा जनकोजी
दत्ताजीचा शेवटचा तो शब्द अजुन हृदयामाजीं
बच जाये तो और लढे
पाउल राहील सदा पुढे
तुम्हास तुमचें रुसवेफुगवे घ्या सगळा नाजुक नखरा
माझ्यासाठी; राहील गांठी; मराठ्यांचा हट्ट खरा*

*तुमचेंमाझें ख्यालतराणे दोघे ऐकू गझला
होनाजीची सोनलावणी वेड लावते; परी मजला
मृदुंग मोठा सुमधुर बोले, मंजुळ वीणा अन मुरली
थाप डफावर कडकडतां परी बाही माझी फुरफुरली
कडाडणारा बोल खडा जो दरी दरीमधुनी घुमला
उघडुनी माझ्या हृदयकवाडा तोच पवाडा दुमदुमला
तटातटा तुटती बंद
भिंवईवर चढते धुंद
औट हात देहांत अचानक वादळ घुसमटुनी जातें
उचंबळे हृदयात पुन्हा तें इतिहासशी दृढ नातें*

*कळे मला काळाचे पाउल द्रुतवेगानें पुढती पडे*
*कळे मला क्षितिजाचे वर्तुळ क्षणोक्षणी अधिकची उघडे*
*दहा दिशांचे तट कोसळले, ध्रुव दोन्ही आले जवळी*
*मीही माझे बाहू पसरून अवघ्या विश्वातें कवळी*
*माझ्या घरची विशाल दारे, खुशाल हीं राहोत खुली*
*मज गरीबाची कांबळवाकळ सकळासाठी आंथरली*
*मात्र भाबडया हृदयांत*
*तेवत आहे जी ज्योत*
*ती विझवाया पहाल कोणी मुक्त करून झंझावात*
*कोटी कोटी छात्यांचा येथे कोट उभारू निमिषांत*

- वसंत बापट (१९५७)

# मीच माझा एककल्ली

मीच माझा एककल्ली एकटा चालीत गेलो
आडवाटेने पिसाटाच्यापरी बेहोश झालो

ना कुठे आधार आणिक ना गतीला अंत होता
मात्र पायींच्या बळाला जागता आवेग होता

ना क्षिती होती कशाची मी मला उधळीत गेलो
अन् धुळीच्या लक्तरांची लाज गुंडाळून आलो

मज कळेना चालतांना दुःख कैसे फूल झाले
अन् कुणाचे दिव्य आशीर्वाद मज घेऊन आले

अक्षरे चुरगाळिता मी अमृताचे कुंभ प्यालो
अन् उद्याच्या जीवनाची सांगता घेऊन आलो.

- ना. धों. महानोर

# जोगिया

*कोन्यात झोपली सतार, सरला रंग
पसरली पैंजणे सैल टाकूनी अंग,*

*दुमडला गालिचा, तक्के झुकले खाली
तबकात राहीले देठ, लवंगा, साली*

*झुंबरी निळ्या दीपात ताठली वीज
का तुला कंचनी, अजुनी नाही नीज?*

*थांबले रसिकजन होते ज्याच्यासाठी
ते डावलूनी तू दार दडपिले पाठी*

*हळुवार नखलिशी पुनः मुलायम पान
निरखीशी कुसर वर कलती करुनी मान*

*गुणगुणसि काय ते? गौर नितळ तव कंठी
स्वरवेल थरथरे, फूल उमलले ओठी.*

*साधता विड्याचा घाट उमटली तान
वर लवंग ठसता होसि कशी बेभान?*

*चित्रात रेखिता चित्र बोलले ऐने
"का नीर लोचनी आज तुझ्या गं मैने?"*

*त्या अधरफुलांचे ओले मृदुल पराग
हालले, साधला भावस्वरांचा योग*

*घमघमे जोगिया दवांत भिजुनी गाता
पाण्यात तरंगे अभंगवेडी गाथा*

*मी देह विकुनिया मागून घेते मोल
जगविते प्राण हे अर्पुनीया 'अनमोल'*

*रक्तांत रुजविल्या भांगेच्या मी बागा
ना पवित्र, देही तिळाएवढी जागा*

शोधीत एकदा घटकेचा विश्राम
भांगेत पेरुनी तुळस परतला श्याम

सावळा तरुण तो खराच गं वनमाली
लाविते पान... तो निघून गेला खाली

अस्पष्ट स्मरे मज वेडा त्याचा भाव
पुसलेही नाही मी मंगल त्याचे नाव

बोलला हळू तो दबकत नवख्यावाणी
'मम प्रीति आहे जडली तुजवर राणी'

नीतिचा उघडिला खुला जिथे व्यापार
बावळं तिथें हा इष्कां गणितो प्यार;

हासुनी म्हणाले, 'दाम वाढवा थोडा...
या पुन्हा, पान घ्या... निघून गेला वेडा!

राहिलें चुन्याचे बोट, थांबला हात
जाणिली नाहि मी थोर तयाची प्रीत

पुनःपुन्हा धुंडिते अंतर आता त्याला
तो कशास येइल भलत्या व्यापाराला?

तो हाच दिवस, हीच तिथी, ही रात
ही अशीच होत्यें बसलें परि रतिक्लांत

वळुनी न पाहतां, कापित अंधाराला
तो तारा तुटतो - तसा खालती गेला

हा विडा घडवुनी करितें त्याचे ध्यान
त्या खुळ्या प्रीतिचा खुळाच हा सन्मान;

ही तिथी पाळितें व्रतस्थ राहुनि अंगे
वर्षात एकदा असा 'जोगिया' रंगे

**- ग. दि. माडगुळकर**

# विद्यार्थ्याप्रत

*महत्व भारी आहे या पृथ्वीचे,*
*त्याहुनी अतिशय या सगळ्या विश्वाचे*
*परि तुजमध्ये महतीचे जे बीज*
*त्याहुनी काही मोठी नाही चीज*
*ठसव मनी हे साचे,*
*बाबा !*
*हे वच बहु मोलाचे.*

*अग्नी असे हा तेजस्वी रे फार,*
*त्याहुनी भारी सूर्य नभीचा थोर;*
*परि किरण जो तुजमध्ये सत्याचा*
*प्रकाश सर्वोत्तम तो आहे त्याचा;*
*घोक सदा हे वाचे,*
*बाबा !*
*हे वच बहु मोलाचे.*

*पृथ्वीमध्ये रत्ने बहु आहेत;*
*आकाशी तर असंख्य दिसताहेत;*
*परि एक रत्न तुजमध्ये जे सच्छील*
*कोणाला नच सर त्याची येईल; _*
*स्मरण असू दे याचे,*
*बाबा !*
*हे वच बहु मोलाचे.*

*स्नायूंमध्यें पुष्कळ आहे शक्ति,*
*नृपवेत्री तर फारच आहे म्हणती;*
*परि एक एक जो नवा शब्द तूं शिकसी*
*शक्ति तयाची उलथिल सर्व जगासी !_*
*पठन तर करी त्याचे,*
*बाबा !*
*जग हे बदलायचे.*

**- केशवसुत (समग्र केशवसुत)**

# तयास मानव म्हणावे का ?

ज्ञान नाही विद्या नाही
ते घेणेची गोडी नाही
बुध्दी असुनि चालत नाही
तयास मानव म्हणावे का ?

दे रे हरी पलंगी काही
पशूही ऐसे बोलत नाही
विचार ना आचार नाही
तयास मानव म्हणावे का ?

पोरे घरात कमी नाहीत
तयांच्या खाण्यासाठीही
ना करी तो उद्योग काही
तयास मानव म्हणावे का ?

सहानुभूती मिळत नाही
मदत न मिळे कोणाचीही
पर्वा न करी कशाचीही
तयास मानव म्हणावे का ?

दुसऱ्यास मदत नाही
सेवा त्याग दया माया ही
जयापाशी सदगुण नाही
तयास मानव म्हणावे का ?

ज्योतिष रमल सामुद्रीकही
स्वर्ग नरकाच्या कल्पनाही
पशुत नाही त्या जो पाही
तयास मानव म्हणावे का ?

बाईल काम करीत राही
ऐतोबा हा खात राही
पशू पक्षात ऐसे नाही
तयास मानव का म्हणावे ?

*पशु-पक्षी माकड माणुसही*
*जन्ममृत्यु सर्वांनाही*
*याचे ज्ञान जराही नाही*
*तयास मानव म्हणावे का ?*

-- सावित्रीबाई फुले

साहित्य प्रतिष्ठान®

# देवाजीनें करुणा केली (भाताचा हंगाम)

'देवाजीनें करुणा केली
भातें पिकुनी पिवळी झाली'
देवाजीच्या नांवा घेऊनी
तयार व्हा रे करु कापणी
पहांट होता जाउं चला रे
पचंग बांधुनि तयार व्हा रे
खसाखसा मग विळा चालवा
चूड कापुनि घाला आडवा
चूडावरती चूड ठेवुनी
कडपें बनवा, खपा कसूनी
कापा ! कापा ! झटुनी सारे
कडपांचे मग बांधू भारे
उचलुनि डोकीवर ते घेउं
चला खळ्यावर झप झप जाउं
एकावरती दुसरा चढवा
भाऱ्यांची ह्या उडवी बनवा

सांठवणी हि आज संपली
पुढे झोडणी करणें आली
देवाजीच्या नांवा घेतां
बरकत येते बहुतची भाता
झोडा भारे खळें भरेल
भाताची मग रास पडेल
शाबास तुमची ! भले बहादर !
काम उडवुनी द्याच भराभर
भाताची ही रास पडतसे
माचुंड्यांचा ढीग होतसे
घ्या घ्या आतां हाती सुपाला
वारा वाहे वारवण्याला
पाळींज, कचरा उडुनी जाई
निवळ खालती भातच राही
मोजुनि ते कणग्यांत सांठवा
देवाचे उपकार आठवा

*देवाजीनें करुणा केली*
*रोजचीच पण 'बस' हि आली*
*जणू पायाने हरिणीच्या अन*
*शिरस्तांतलीं कामें झाली*
*घराघरांतील चूल पेटली*
*चहा उकळूनी काळा झाला*
*जरा चढवितां दुसरें भांडे*
*भातही शिजुनी होईल पिवळा*
*घरी परततां, भाजीवाली*
*समोर दिसली, भरली थैली;*
*दो दिडक्यांची कडू दोडकी*
*जरी पिकूनी झाली पिवळी*
*उजाडतां जें उजाड झाले*
*झोपीं गेलें, मावळतां ते*
*करील जर का करुणा देव*
*बिचकुनी होतील हिरवी भातें*

-- बा. सी मर्ढेकर

# फुलपांखरू

*(जाति-अंजनी)*
*जेथें हिरवळ फार विलसते,*
*लताद्रुमांची शोभा दिसते,*
*तेथें फुलपांखरू पहा हें -*
*सुंदर बागडतें !*

*कलिकांवरुनी, पुष्पांवरुनी,*
*गंधयुक्त अवकाशामधुनी,*
*पुष्पपरागा सेवित हिंडे -*
*मोदभरें करुनी !*

*तरल कल्पना जशी कवीची,*
*सुंदर विषयांवरुनी साची*
*भ्रमण करी, गति तशीच वाटे -*
*फुलपांखराची !*

*वा मुग्धेची जैशी वृत्ति*
*पतिसहवास स्वप्नावरती*
*विचरे, फुलपांखराची तशी -*
*हालचालही ती !*

*निर्वेधपणें इकडे तिकडे*
*वनश्रींतुनी अहा ! बागडे;*
*त्याचा हेवा हृदयीं उपजुनी -*
*मन होई वेडें !*

*तिमिरीं आम्हीं नित्य रखडणें,*
*विवंचनांतचि जिणें कंठणें,*
*पुष्पपतंगस्थिति ही कोठुनि -*
*आम्हांला मिळणें !*

*असे यास का चिंता कांही ?*
*यास 'उद्या'चा विचार नाहीं,*
*अकालींच जो आम्हां न्याया -*
*मृत्युमुखीं पाही !*

*बहु सौख्याची कुसुमित सृष्टि,*

तींत वसे हें, न कधीं कष्टी,
ग्रीष्मांचें खर रुप विलोकी -
नच याची दृष्टि !

'सर्व विनाशी असती प्राणी,'
ही मज खोटी वाटे वाणी;
फुलपांखरुं मरण पाहिलें -
आहे का कोणीं ?

[वसंततिलका]
जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे;
गाणें मनांत मग होय सवेंचि जागें;
गातों म्हणून कवनीं फुलपांखरातें,
व्हायास सौख्य मम खिन्न अशा मनातें.

– केशवसुत

# तूं तर चाफेकळी!

"गर्द सभोंती रान साजणी, तूं तर चाफेकळी
काय हरवले सांग शोधिसी, या यमुनेच्या जळी?॥ध्रु ॥

ती वनमाला म्हणे, "नृपाळा, हे तर माझे घर,
पाहत बसते मी तर येथे, जललहरी सुंदर.
हरिणी माझी, तिला आवडे फारच माझा गळा;
मैना माझी गोड बोलते, तिजला माझा लळा"
घेउनि हाती गोड तिला त्या कुरणावरती फिरे
भाऊ माझा, मंजुळवाणे गाणे कधी न विरे" ॥ १ ॥

"रात्रीचे वनदेव पाहुनी, भुलतिल रमणी ! तुला;
तूं वनराणी, दिसे न भुवनी तुझिया रुपा तुला
तव अधरावर मंजुळ गाणी, ठसली कसली तरी ?
तव नयनीं या, प्रेमदेवता धार विखारी भरी
क्रिडांगण जणु चंचल सुंदर भाल तुझे हे गडे,
भुरुभुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळ उडे ॥ २ ॥

अर्धस्मित तव मंद मोहने, पसरे गालांवरी;
भूललें तुजला हृदय साजणी, ये चल माझ्या घरीं"
सांज सकाळी हिमवंतीचे सुंदर मोती घडे
हात लाविता परि नरनाथा तें तर खालीं पडे
ती वनमाला म्हणे नृपाळा "सुंदर मी हो खरी"॥३॥

-- बालकवी

# माझी बाहुली

लहान माझी बाहुली
मोठी तिची साऊली
घारे डोळे फिरवीते
लुकूलुकू हि पहाते

नकटे नाक उडवीते
गुबरे गाल फुगाविते
दांत काही घासत नाही
अंग काही धूत नाही

भात केला, करपून गेला !
पोळया केल्या, कच्च्या झाल्या !
वरण केले पातळ झाले
तूप सगळे सांडून गेले

असे भुकेले नक्का जाउं
थांबा करते गोड खाऊ

केळीचे शिकरण करायला गेली
दोनच पडले दांत
आडाचें पाणी काढायला गेली
धपकन पडली आत !

(अज्ञात कवी)

# एक खेडें

*(जाति -दिंडी)*

*सह्यगिरिच्या पायथ्याला सुपीक*
*रम्य खोरें कोंकणामधीं एक;*
*नदी त्यामधुनी एक वाहताहे,*
*एक खेडें तीवरी वसुनि राहे. ॥ १ ॥*

*वरुनि सुंदर मंदिरें न त्या ठायीं,*
*परी साधीं झोपडीं तिथें पाहीं;*
*मंदिरांतुनि नांदते रोगराई,*
*झोपड्यांतुनि रोग तो कुठुनि राही ? ॥ २ ॥*

*रोग आहे हा बडा कीं मिजासी,*
*त्यास गिर्द्यांवरि हवें पडायासी;*
*झोंपड्यांतील घोंगड्यांवरी त्यास,*
*पडुनि असणें कोठलें सोसण्यास ? ॥ ३ ॥*

*उंच नाहिंत देवळें मुळी तेथें,*
*परी डोंगर आहेत मोठमोठे;*
*देवळीं त्या देवास बळें आणा,*
*परी राही तो सृष्टिमधें राणा. ॥ ४ ॥*

*उंच डोंगर ते, उंच कडे भारी,*
*पडे धो! धो! ज्यांचियावरुनि वारी,*
*भोंवतालें रान तें दाट आहे;*
*अशा ठायीं देव तो स्वयें राहे ! ॥ ५ ॥*

*स्तोत्र ओढे थांबल्यावीण गाती,*
*सूर वारे आपुला नित्य देती,*
*वृक्षगण तो हालुनी डुल्लताहे;*
*अशा भक्तीच्या स्थळीं देव राहे ! ॥ ६ ॥*

अशी नैसर्गिक भव्यता उदास
तया खेड्याच्या असे आसपास;
तसा खेड्याचा थाट तोहि साधा
भव्यतेला त्या करितसे न बाधा. ॥ ७ ॥

सरळ साधेपण, असे निसर्गाचें
मूल आवडतें; केंवि तें तयाचें
भव्यतेला आणील बरें बाधा ?
निसर्गाचा थाटही असे साधा. ॥ ८ ॥

लहान्या तया गांवांत झोंपड्यांत
भले कुणबी लोक ते राहतात;
खपोनीयां ते सदा सुखें शेतीं,
सरळ अपुला संसार चालवीती. ॥ ९ ॥

अहा ! अज्ञात स्थळीं अशा, मातें,
एक गवतारु खोप रहायातें,
शेतवाडी एक ती खापायाला,
लाधतीं, तर किति सौख्य मन्मनाला ! ॥ १० ॥

तरी नसतों मी दरिद्री धनानें,
तरी नसतों मी क्षुद्र शिक्षणानें,
तरी होतीं तीं स्वर्गसुखें थोडी,
तरी नसती कीर्तिची मला चाडी ! ॥ ११ ॥

कीर्ति म्हणजे का हो ? - एक शिंग:
प्रिय प्राणांहीं आपुलियां फुंक
रखाडीला जा मिळूनियां वेगे;
शिंगनादहि जाईल मरुनि मागें ! ॥ १२ ॥

कीर्ति म्हणजे काय रे ? - एक पीस :
शिरीं लोकांच्या त्यास चढायास,
छरे पडती पक्ष्यास खावयास;
मागुनी तें गळणार हेंहि खास ! ॥ १३ ॥

पुढें माझें चालेल कसें, ऐशी
तेथ चिंता त्रासिती न चित्तासी;
नीच लोकांला मला नमायास
वेळ पडती थोडीच त्या स्थळास ! ॥ १४ ॥

शेत नांगरणें पेरणें सुखानें,
फूलझाडें वाडींत शोभवीणें;
गुरेंढोरें मी बाळगुनी कांही,
दूधदुभतें ठेवितों घरीं पाहीं. ॥ १५ ॥

कधीं येता पाहुणा जर घराला,
"तुझे घर हें" वदतोंच मी तयाला;
गोष्टि त्याच्या दूरच्या ऐकुनीयां,
थक्क होतों मी मनीं तया ठाया – ॥ १६ ॥

“असे जग तें एवढें का अफाट !
त्यांत इतुका का असे थाटमाट !”
असें वदतों मी त्यास विस्मयेंसी,
स्वस्थिती तरि तुळितों न मी जगाशीं ॥ १७ ॥

स्वर्गलोकीं संपत्ति फार आहे,
इथें तीचा कोट्यंश तोहि नोहे;
म्हणुनि दु:खानें म्हणत 'हाय ! हाय !'
भ्रमण अपुलें टाकिते धरा काय ? ॥ १८ ॥

तरी, स्वपथा जातात सोडुनियां,
कुणी तारे तेजस्वि फार व्हाया;
तधीं तेजाचा लोळ दिसे साचा,
परी अग्नी तो त्यांचिया चितेचा ! ॥ १९ ॥

वीरविजयांच्या दिव्य वर्तमानीं
कृष्ण कदनें पाहतों न त्या स्थानी;
भास्कराच्या तेजाळपणीं मातें
डाग काळे दिसते न मुळीं तेथे ! ॥ २० ॥

सूर्यचंद्रादिक दूर इथुनि तारे,
तसें जग हें मानितों अलग सारें;
जसे नेच्छूं त्यांवरी चढायास,
इच्छितों नच या जगीं यावयास ! ॥ २१ ॥

*तेथ गरजा माझिया लहान्या त्या*
*सहजगत्या भागुनी सदा जात्या;*
*म्हणुनि माझें जग असें तेंचि खोरें*
*सुखी मजला राखितें चिर अहा रे ! ॥ २२ ॥*

- केशवसुत

# उठ मुला (निजलेल्या मुलास)

*उठ मुला, उठ मुला,*
*बघ हा अरुणोदय झाला*
*नवरंगी किरणांनी,*
*भूषविली बघ ही अवनी*

*मोद भरें, रान भरें,*
*मंद सुगंधातें विखरे*
*शितल हा, वात पहा,*
*आळस हरण्या येत अहा*

*किलबिलती बागडती,*
*झाडांवरती पक्षी किती*
*रव करिती भृंगतती,*
*पुष्पांचा मकरंद पिती*

*फुलांवरी, फळांवरी,*
*पतंग मोदें मजा करी*
*झटकन बसे, पटकन उठे,*
*उंच भराऱ्या घेत सुटे*

*आनंदे, नभ कोंदे,*
*हरुनी आळसा तरतरि दे*
*पूर्वेला, रवि आला,*
*मुला उठाया कथित तुला*

- बालकवी

# बालभारती: पहिली आवृत्ती
## काही प्रतिक्रिया

*One of my friend today sent me attachment of "Balbharati – athavanitalya kavita" through email. While going through it -my first reaction was – "I burst into tears" remembering my school days and realized, what I have missed in my life, which will never come again.*

*I whole heartedly appreciate the efforts taken by you and your friends in making this available to the people like us in this world, who have enjoyed real life in the schooldays.*

*Shashikant Dhale*

Aapla balbharticha sangrah kunya eka adnyat vyaktikadun milala. pan to milalyane ek khajinach milalyacha aanand zala. shala shikat astanna sagale pustak nit thewale jat nahit , varsha sample ki ti pustaka bajula padtat an navi yetat. pan tyatlya aathwani vishesh karun kavita visarata yet nahit. Mi ek marathichi wachak aahe. an mala nehmi ase watayche ki aapan aata kamawato balbhartiche sagale pustake (pahili te dahawichi) vikat gheyuya..................karan mi aaj kamawate....................tevdhe vikat ghenyache aarthik kuwat aahe. punyatch aslyane balbhartichya karyalaywarun jatanna ha vichar anekda aala asel pan aat jaun chaukashi karane yala kharach wel milala nahi...........................tumchya shabdat mhanayache tar ' yantramanwasarkhe' fakt ghadyalawar chalnare aayushya aahe. pan tyat tumchya sankalancha khajina nakkich jan aanil ase watate.

mi ek IT field madhe kam karnari professor aahe. fakt yantrik,
mechanical jag baghun khup waait watate. watate sagalich duniya bhavna, tya vyakta karnare kavya an te jopasanare lok, lihinare kavi sagale visarle ka pan .....................nahi ................sagal aahe tasach aahe fakt aamchyasarkhya lokaanna wel dyayla wel nahi.....................he maze dukkha tumhi mumbaikar janu shaktat, mhanun ha likhanacha khatatop.........................

aso.......................khupch khup aabhar tumchya surekh sankalanche an mazya dokyat asnari idea e- form madhe utravanyache.......................................

**Shallu Kulkarni**

*"बालभारती आठवणीतील कविता" ची प्रत पाहिली आणि एकदम खजिना गवसल्यासारखं झालं. शाळेत असताना वाचलेल्या कितीतरी कविता यात आहेतच पण एक विशेष आवडती कविता - "उठा उठा चिऊताई" - माझे बाबा मला सकाळी उठायला उशीर झाला की माझ्यासाठी म्हणत असत, ती वाचून बालपण आठवले. तुमच्या या ईपुस्तकामुळे खूप साऱ्या आठवणी जाग्या झाल्या.*

धन्यवाद
**कांचन कराई**
**ठाणे**

ह्या कवितांनी दिले बळ मज,
जगावया
ह्या कवितांनी दिले पंख मज,
उडावया
ह्या कवितांनी दिले शब्द मज,
लिहावया
ह्या कवितांनी दिले सर्व मज,
पुजावया !

**-डॉ.अशोक कुलकर्णी**
**(काव्यांजली)**
**औरंगाबाद**

Got balbharati PDF from esahitya and it is really a nostalgic collection for persons like me who have studied in Marathi and love this great language. Great job well done. Keep it up.

**Chandrashekhar B. Marathe**
**3650 Kaneff Crescent Apt # 701**
**Mississauga Ontario L5A 4A1**
**Canada**

Hya sangrahatil kavitechi suchi (anukramanika) pahunach dolyat pali aale…
Hya kavita vachtana…amrut pyalyacha anand hoto…
Hya kaviteche spurak(KAVI) , sanchayak…ani Tumchya sarakhe vitarak….yache samajavar anant upkar aahet…
AAI bhavani apana sarvans udand ayushya ani prachand samrthya padan karo..hi tichya charni prathana

**Anil Salunkhe ( Jakarta)**

आपल्या धावपळीच्या जगण्यात बालभारतीच्या कविताच तर आपला प्राणवायू आहे. बालभारती कुमारभारती पाठ्यपुस्तकातील दुर्मिळ कविता उपलब्ध करुन दिल्याबद्दल आभार. सरावाच्या ठरलेल्या सोप्प्या वाटांनी सगळेच जातात त्या गर्दित कश्याला भर म्हणून आपण आमच्या पिढीसाठी दिलेली ही अनमोल देणगीच आहे. नव्या भाषेत सांगायचं तर गिफ्टच!
आपण हाती घेतलेल्या उपक्रमास आमची नवी पिढी अगदी भरभरुन स्विकारेल आणि आमचाही सहभाग असेल.

**प्रा .पुरु पाटील**
**आय आय टी पवई**

Thanks for sending me 'Aathavanitlya kavitancha theva'.
You have send me these so many poems but yet I am searching for some more. If you get please send me.

We had our kavita vaachan program on 1st of october here, arrenged by me that time some of them from this sangrah are read by participents.

Regards,

**Smita Upadhye**
**New Zealand**

Many many thanks for the innovative idea of collection of these beautiful poems.
I would call it the TREASURE in Marathi literature.

I am sending it as a gift to my little sweet niece in USA.

**Sneha Mahajan**

Kudos…….Salute, khup khup bar vatalay…….keep it up.
While reading these proems, majya dolya phudhe tya kavitateli (pustakatali) ‘chitra’ hi ali. (for ex. ‘Khandya’ – dhivar pakshi)
Thanks & Regards,

**Sanjay Luzar**

*वास्तव आणी स्वप्न, यातील फरक लहा[illegible]च काय, तर आपल्यासारख्या जाणकारांना सुद्धा कळा[illegible]हा हेतु या बालभारती संकलनामागचा आहे. भावुक आणि कोडग[illegible]किंवा उर्मट  हा जो फरक आहे तो नव्या पिढीला कळावा हाही  हेतु [illegible]हे. एवढ्या जुन्या कविता, त्यातील व्याकरण, अर्थपुर्ण शब्द, याकडे [illegible]भ्यासू वृत्तीने पहायला हवे. या कविता कुठेही एकाच ठिकाणी सहज उपलब्ध नाहित.  श्री. सुरेश शिरोडकर व ई-सहित्य प्रतिष्ठानने त्या  विनामुल्य उपलब्ध करुन दिल्या आहे. त्यांचे आभार व कौतुक!*

***Ms. Rajani Arankalle (काव्यांजली)***

'Tumchya ya sunder ani kautukaspad kamasathi amchya pidhiche shatashah dhyanywad.'

I our get together or in picnic we all used recollec those poems but no one used remember the whole wordings. And no one has thought of doing collection of those poems. Really thank you very much for your efforts. Whatever was their in our mind which we couldn't do it You have done it and gave us real enjoyment of our life.

**'विश्वजालात ई-साहित्य प्रकाशन' हे मराठीचे भविष्य आहे.**
श्री शिरोडकर (शिरवाडकर-बंधू!) यांचा उपक्रम स्तुत्य आहे.

**पण दोन गोष्टी खटकल्या** :
(१) रचनेत (ह्रस्व - दीर्घ) कडे लक्ष दिले असते तर पुस्तक 'निष्कलंक' झाले असते. ई-पुस्तकांतील चुका पण 'चिरंजीव' होतात याचे भान ठेवले पाहिजे.
(२) अनुक्रमणिकेला काही-तरी सुसंवाद हवा होता. देवनागरी "क, च, ट, त प" नव्हे तर
इंग्रजी "A-Z" असा क्रमही चालला असता, व कोणतीही कविता शोधणे सोपे झाले असते.
[९९% वाचक हे पुस्तक एका विशिष्ट कवितेच्या शोधातच वाचणार हे लक्षात येणे अवघड नव्हते.]

मराठी-ई प्रेमी
गणेश विनायक सावरचौदाखडीकर

I can only thank you for all the commendable efforts your team has taken.

It is a great collection.

As my current focus is exposing my 3 year old child to marathi language and culture, I am looking more for child oriented poems and found quite a few in your collection.

May **I suggest** ( since you have mentioned suggestions are welcome)

Can be divided in different groups like children, bhakti, desh prem etc
It is equally important to pass on the heritage and treasure to younger generation. Unfortunately as we all are aware , in this tv/computer culture, audiovisual media are more useful to impress their minds and get them interested. Learning to read write marathi will take time, but we need to stimulate interest. and nothing like simple sweet songs in AV media. What I am trying to say is that , some of these songs are available in AV formats on different websites and I am using them and have found my child finding instant liking to them even though she was then just 'ONE' year old ( Bye the way, I live in UK, so hardly any marathi exposure). So a link can be included , if available.

Dr Shrirang Dabhade
GP , Liverpool, UK

# सर्वात्मका शिवसुंदरा

सर्वात्मका, शिवसुंदरा
स्वीकार या अभिवादना
तिमिरातूनी तेजाकडे
प्रभू आमुच्या ने जीवना ॥ धृ. ॥

सुमनांत तू, गगनांत तू
तार्‍यांमध्ये फुलतोस तू
सद्धर्म जे जगतामध्ये
सर्वांत त्या वसतोस तू
चोहीकडे रूपे तुझी
जाणीव ही माझ्या मना ॥ १ ॥

श्रमतोस तू शेतामध्ये
तू राबसी श्रमिकांसवे
जे रंजले अन् गांजले
पुसतोस त्यांची आसवे
स्वार्थाविना सेवा जिथे
तेथे तुझे पद पावना ॥ २ ॥

न्यायार्थ जे लढती रणी
तलवार तू त्यांच्या करी
ध्येयार्थ जे तमी चालती
तू दीप त्यांच्या अंतरी
ज्ञानार्थ जे तपती मुनी,
होतोस त्या तू साधना ॥ ३ ॥

करुणाकरा, करुणा तुझी
असता मला भय कोठले?
मार्गावरी पुढती सदा
पाहीन मी तव पाउले
सृजनत्व या हृदयामध्ये
नित जागवी भीतीविना ॥ ४ ॥

**- कुसुमाग्रज**

# पसायदान

*आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।*
*तोषोनिं मज द्यावे । पसायदान हें ॥*

*जें खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी-रती वाढो।*
*भूतां परस्परे जडो । मैत्र जीवांचें ॥*

*दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।*
*जो जे वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात ॥*

*वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।*
*अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥*

*चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गाव ।*
*बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥*

*चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।*
*ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥*

*किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकी ।*
*भजिजो आदिपुरुषी । अखंडित ॥*

*आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।*
*दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।*

*येथ म्हणे श्री विश्वेशरावो । हा होईल दान पसावो ।*
*येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥*

रचना - संत ज्ञानेश्वर

# ई साहित्य प्रतिष्ठान

## बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ

चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना पावणे दोनशेहून अधिक दर्जेदार मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ना धों महानोर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. सुमारे चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दहशतवाद अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी संगीत कानसेनचे ई वर्ग चालवले. नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकांची मालिका “दुर्ग दुर्गट भारी” द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची उभारी दिली. लवकरच आमचा ई-यत्ता हा ज्ञानवेध घेणारा उपक्रम सुरू होईल तर मराठीचं वैभव जे ज्ञानदेव तुकाराम अशा संतांच्या पुस्तिकांची एक मालिका आपल्या भेटीला येईल. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील. तर तरुणांमध्ये नव्या जगाला सामोरं जाण्याची हिंमत जागवणारं “उनाड” लवकरच आपल्या भेटीला येणार आहे.

सव्वा लाखभर रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही वाटत आपल्याला? आणि त्यासाठी काही फ़ार करायची गरज नाही बंधो. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल? जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा. असे लोक ज्यांनी मराठी साहित्य वाचावे अशी आपली इच्छा आहे. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार?

*बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य पाठीराखे म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल.*

***तर होणार ना ई साहित्यचे पाठीराखे ?***

*फ़क्त आपल्या खास मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी खालील पत्त्यावर पाठवा.*

esahity@gmail.com

*खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.*

*अधिक माहितीसाठी संपर्क :*

www.esahity.com